सभापतीस्थानी - माननीय उप सभापती

पृ.शी/मु.शी. : तोंडी उत्तरे

राज्यातील शेतक-यांना विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी शेतक-यांना एक लाखापर्यंत पीक कर्ज शून्य टक्के व्याजाने व ३ लाखा पर्यंत कर्ज २ टक्क्याने देण्याबाबत

(१) ***२६२७१ प्रा.सुरेश नवले, श्री.राजन तेली*** **:** सन्माननीय ***सहकार मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांना विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी शेतक-यांना एक लाखापर्यंत पीक कर्ज शून्य टक्के व्याजाने व ३ लाखापर्यंत कर्ज २ टक्याने देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हर्षवर्धन पाटील : (१) नाही. तथापि, शासनाने दिनांक १९.१०.२०११ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेची व्याप्ती वाढवून त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा यंत्रणा, राष्ट्रीयकृत बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका इ. बँकाकडून घेतलेल्या व विहित मुदतीत परतफेड केलेल्या रू. एक लाखापर्यंतच्या अल्प मुदतीत पीक कर्जासाठी वार्षिक तीन टक्के दराने व रू.एक लाखावरील परंतु रू. तीन लाखापर्यंत अल्प मुदती पीक कर्जासाठी वार्षिक दोन टक्के दराने व्याज सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे.

(२) व (३) या योजनेचा लाभ सन २०११-१२ या हंगामापासून पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना होणार असल्याने योजनेच्या व्यापक प्रसिद्धीसाठी शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे. तसेच या बाबतचा शासन निर्णय विभागाचे क्षेत्रीय अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडे माहितीस्तव पाठविण्यात आला आहे.

सभापती महोदय,पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

याठिकाणी पहिल्या क्रमांकाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"एक लाख रुपया पर्यंतच्या अल्प मुदतीत पीक कर्जासाठी वार्षिक तीन टक्के दराने" त्याऐवजी एक लाख रुपयापर्यंत "शून्य टक्के दराने" आणि तीन लाखापर्यंतच्या पीक कर्जासाठी दोन टक्के दराने" सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे."अशा प्रकारे उत्तरामध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, हा महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न आहे आणि माननीय राज्यपाल यांनी काल जे अभिभाषण केले आहे, त्यामध्ये याबाबत उल्लेख करण्यात आला आहे की, "डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजने अंतर्गत" नियमित कर्ज .....

ता.प्र.क्र.26271 . . . .

प्रा.सुरेश नवले . . ..

परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याज सवलतीचा लाभ मिळण्यासाठी माझ्या शासनाने, त्यांच्या पीक कर्जाच्या कमाल मर्यादेत वाढ केली आहे. त्यामुळे आता नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 1 लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्के व्याज दराने व त्यापुढील 3 लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज केवळ एक टक्का व्याज दराने उपलब्ध झाले आहे." सभापती महोदय, मी महाराष्ट्र शासनाचा मन:पूर्वक आभारी आहे. याबाबतीत शासनाचे करावे तेवढे अभिनंदन कमीच आहे आणि याबाबत शासनाने अतिशय पुरोगामी आणि दूरदृष्टीने घेतलेला निर्णय आहे.त्यामुळे माननीय सहकार मंत्री श्री.हर्षवर्धन पाटीलसाहेब यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे. कारण आपण माझ्या प्रश्नाचे उत्तर अतिशय सांगोपांग आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना अपेक्षित असे दिलेले आहे याबद्दल मी आपल्याला मन:पूर्वक धन्यवाद देतो आणि या प्रश्नाच्या उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी सरकारच्या निर्णयाबद्दल कौतुक केले हे खरे आहे. पण 3 टक्के व्याज राज्य शासन देते आणि 3 टक्के व्याज केंद्र शासन देत आहे. त्यानुसार राज्य शासनाकडून पैसे उपलब्ध झाले परंतु केंद्र शासनाकडून पैसे न मिळाल्यामुळे आज बँका डबघाईस आल्या आहेत. त्यामुळे केंद्र शासनाकडून पैसे उपलब्ध होईपर्यंत राज्य शासन हे पैसे उपलब्ध करुन देणार आहे काय ? कारण जर बँकाकडे पैसेच नसतील तर ते वाटप कसे करणार आहेत हा मुद्दा आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र. 26271. . . .

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा रास्त आहे. या संदर्भतील सवलत देण्याकरिता केंद्राचे पैसे येण्यास विलंब होतो, ही गोष्ट खरी आहे. या संदर्भात राज्य शासनाने एक जी.आर. काढलेला आहे. जिल्हा मध्यवर्ती बँक असो, अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक असो वा राज्य सहकारी बँक असो या बँकांनी शेतकऱ्यांच्या पीक कर्जावर व्याज आकारावयाचे नाही, शेतकऱ्यांनी फक्त मुद्दल भरावयाचे अशी ही कर्जफेड व्याज सवलत योजना आहे. शेतकऱ्यांनी घेतेलेले पीक कर्ज दिलेल्या मुदतीत, एका वर्षामध्ये फेडले तर त्या शेतकऱ्यांना एक लाख रुपयापर्यंतच्या कर्जावर व्याज भरण्याची आवश्यकता नाही. सभापती महोदय, या निमित्ताने मी आपल्या माध्यमातून शेतकऱ्यांना जाहीरपणे सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांनी फक्त मुद्दल भरावयाचे आहे, व्याज भरावयाचे नाही. मुदतीत पैसे भरले नाहीत तर ही योजना त्यांना लागू होणार नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांना मी धन्यवाद देऊ इच्छितो. परंतु दिनांक 31 मार्चपर्यंतची मुदत दिनांक 30 जून पर्यंत वाढविण्यात येणार आहे काय, तसेच गेल्या आर्थिक वर्षात या राज्यात किती पीक कर्जाचे वाटप झालेले आहे आणि वाटप केलेल्या कर्जाची वसुली किती झालेली आहे?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, पीक कर्जाकरिता ही मुदत एक वर्षाची आहे. दिनांक 31 मार्च ही एका वर्षाच्या पीक कर्जा करिता मुदत आहे. दुसरा मुद्दा असा की, परवाच मी दिल्लीला जाऊन या संदर्भात मागणी केलेली आहे. ऊसाचे पीक कर्ज 16 महिन्याच्या आणि 11 महिन्याच्या मुदतीचे असते. द्राक्षाचे पीक कर्ज 16 महिन्याच्या आणि 18 महिन्याच्या मुदतीचे असते. राज्य शासनाच्या पीक सवलत योजनेमध्ये मुदतवाढ देण्यात आलेली आहे पण केंद्र शासनाच्या पीक कर्ज सवलत योजनेमध्ये फक्त 12 महिने ही सवलत लागू आहे. दिनांक 31 मार्च हा केंद्र शासनाच्या पीक कर्ज सवलत योजनेतील एक वर्षाचा कालखंड आहे. राज्य शासनाच्या पीक कर्ज सवलत योजनेच्या मुदतवाढीचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी मागच्या वर्षी एकूण किती पीक कर्जाचे वाटप करण्यात आलेले आहे अशा प्रकारचा प्रश्न विचारलेला आहे. यावर्षीची दिनांक 05-03-2012 पर्यंतची आकडेवारी माझ्याकडे आहे. साधारणत: 16,331 कोटी रुपये पीक कर्जाचे वाटप करण्यात आलेले आहे. गेल्या वर्षी हेच वाटप 11,590

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र. 26271. . . .

श्री. हर्षवर्धन पाटील....

कोटी रुपये करण्यात आलेले आहे. त्याच्या पाठीमागच्या वर्षी 13, 150 कोटी रुपये पीक कर्जाचे वाटप करण्यात आलेले आहे. सन 2008-2009 या वर्षी 6,400 कोटी रुपये पीक कर्जाचे वाटप करण्यात आलेले आहे. म्हणजे जवळ जवळ कर्ज वाटपामध्ये तिप्पटीने वाढ केलेली आहे. पुढच्या वर्षी 20,000 कोटी रुपये अल्प मुदतीचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार आहे.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, महाराष्ट्र शासन की यह एक क्रान्तिकारी योजना है. मेरे केवल 2 प्रश्न हैं. मेरा कहना यह है कि विदर्भ में किसानों की आत्महत्या अभी भी नहीं रुक रही है. यवतमाल जिले में किसानों की आत्महत्या अभी भी हो रही हैं. इस योजना को लागू करने के लिए केन्द्र सरकार की तरफ से 1 साल के लिए सब्सिडी दी जाती है, कम से कम विदर्भ के किसानों के लिए इसको बढ़ाकर 2 साल किया जाए. इस योजना के अन्तर्गत किसानों को एक लाख रुपए तक का कर्ज 1 साल के लिए शून्य ब्याज दर पर दिया जाता है तो इसमें मुद्दल वापस करने की समय सीमा बढ़ाई जाए. मेरा दूसरा प्रश्न यह है कि यह योजना लागू होने के बाद और किसानों को कम ब्याज दर पर कर्ज देने के बाद भी आत्महत्या नहीं रुक रही है, इसके क्या कारण हैं ? क्या शासन ने इस बारे में जानकारी लेने की कोशिश की है ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही योजना संपूर्ण राज्या करिता लागू करण्यात आलेली आहे. विशेषत: विदर्भातील सहा जिल्हयांसाठी जेथे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत तेथे एक वेगळी योजना सहकार विभागाने तयार केलेली आहे. त्या योजनेमध्ये तेथील विविध कार्यकारी सेवा सोसायट्या यांना एक विशेष सवलत या योजनेमधून देण्याचा शासन निर्णय घेत आहे. विशेषत: ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत त्या भागामध्ये मोठया प्रमाणात कर्ज उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. आज विशेषत: सहा जिल्हयामध्ये प्राथमिक सहकारी संस्थांसाठी गोदामांची योजना तयार केलेली आहे. दुरुस्ती आणि नूतनीकरणासाठी जवळपास 100 कोटी रुपयांची योजना प्रस्थापित केलेली आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26271 ..... श्री. हर्षवर्धन पाटील ....

आणि आता जो मुद्दा उपस्थित केला त्यामध्ये त्यांना अजून काही विशेष सवलत देता येईल का याचाही सकारात्मक विचार सहकार विभाग करील.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या ठिकाणी 31 मार्चपर्यंत कर्ज भरले पाहिजे असा नियम केलेला आहे. पण मुळात शेतकऱ्यांना कर्ज मे-जून महिन्यामध्ये मिळते. मग आपण दहा महिन्यामध्ये एका वर्षाचे व्याज लावणार आहात का ? 30 जूनचा जो विषय आहे त्यामध्ये शासन आम्हाला 30 जूनपर्यंत सवलत देणार का ? कारण कर्ज महाराष्ट्र शासन देते आणि व्याज केंद्र शासन देते. यामध्ये शेतकऱ्यांचे दोन तीन महिन्यांचे नुकसान होते. शासन 31 जूनपर्यंत पैसे भरण्याची मुदत देणार का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये या विषयाच्या संदर्भात थोडी स्पष्टता होणे आवश्यक आहे. आपल्याकडे दोन योजना आहेत. राज्य सरकारची पीक कर्जाची जी योजना आहे त्याची मुदत 30 जून आहे. ती योजना आपण आपल्या राज्याच्या बजेटमधून करतो त्यामुळे त्या कर्जाची फेड करण्याकरिता 30 जूनची मुदत दिलेली आहे. त्यामध्ये मी सांगितल्याप्रमाणे 1 लाख रुपयांपर्यंत शून्य टक्के व्याज आहे. 3 लाख रुपयांपर्यंत 2 टक्के व्याज आहे आणि नियमित कर्ज फेडले तर 1 टक्के व्याजाचे कन्सेशन आहे. म्हणजे फक्त 1 टक्का व्याज पडते. दुसरा मुद्दा असा उपस्थित करण्यात आला की, आम्हाला सप्टेंबर-ऑक्टोबरला कर्ज मिळते. पीक कर्ज ही दरवर्षी लागणारी बाब आहे. त्या पिकापुरता त्या कर्जाचा कालावधी असतो. त्यामुळे ते पीक आल्यानंतर त्या कर्जाची वेळेत फेड होणे आवश्यक आहे. राज्याची परतफेडीची योजना 30 जूनपर्यंत आहे आणि केंद्राची योजना 31 मार्चपर्यंत आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. 30 जूनच्या आणि 31 मार्चच्या आत जर आम्ही कर्ज फेडले नाही तर आम्हाला शून्य टक्के व्याजाचा लाभ मिळत नाही. आम्हाला सरळ नोटीस येते की, 31 मार्चच्या आत भरले तरच तुम्हाला लाभ मिळेल. माननीय मंत्री महोदयांनी 30 जून तारीख सांगितली. त्याप्रमाणे पुन्हा आणखी खास पत्र देऊन बँकांना निर्देश देणार आहात का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

ता.प्र.क्र. 26271 .....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, स्टेट लेव्हल फायनान्स कमिटीमध्ये या संदर्भात प्रत्येक पिकाचा स्केल ऑफ फायनान्स ठरला जातो. प्रत्येक पिकाचा पीक कर्ज वाटपाचा कालावधी ठरला जातो आणि रिपेमेंटचाही कालावधी ठरला जातो. शेवटी रिझर्व्ह बँकेच्या गाईडलाईन्स प्रमाणे, नाबार्डच्या गाईडलाईन्स प्रमाणे स्टेट लेव्हलला या संदर्भातील धोरण ठरले जाते आणि त्यामध्ये विविध पिकांना आपण पीक कर्ज उपलब्ध करुन देतो. मला असे वाटते की, त्या ज्या मुदती ठरलेल्या आहेत त्या मुदतीमध्ये आपल्याला बदल करता येणार नाही.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सी वर्ल्ड प्रकल्प त्वरित पूर्ण करण्याबाबत

(२) * २६४९० *श्री.राजन तेली , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , प्रा.सुरेश नवले* : सन्माननीय ***पर्यटन मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सी वर्ल्ड प्रकल्प त्वरित पूर्ण करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या समवेत माहे नोव्हेंबर, २०११ च्या दरम्यान झालेल्या बैठकीत प्रकल्पाच्या कामाला गती देण्याबाबत निर्णय झाला, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कोकण किनारपट्टीवर सी वर्ल्ड प्रकल्प उभारण्यासाठी राज्य शासनाने सन २०११-१२ साठी व्यवहार्यता तफावत निधी म्हणून रुपये १०० कोटी मंजूर करुनही अद्याप या प्रकल्पाचे काम केले जात नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे फेब्रुवारी, २०१२ अखेर पर्यंत सदर कामासाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला वा येत आहे,

(४) असल्यास, कोकणात पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सदर प्रकल्पाचे काम त्वरित पूर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच प्रकल्पाच्या भूसंपादनाचे काम किती कालावधीत व प्रत्यक्षात सदर प्रकल्प केव्हा सुरु होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता : (१) होय.

(२) कोकणात सिंधुदुर्ग येथे सी वर्ल्ड प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित आहे तथापि सदर प्रकल्पासाठी निधी मंजूर करण्यात आलेला नाही. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुकीची कार्यवाही चालू आहे. तसेच केंद्र शासनाकडे प्राथम्यक्रमाने घेण्यात येणाऱ्या प्रस्तावात या प्रस्तावाचा समावेश करण्याबाबत केंद्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या बैठकीत विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, संपूर्ण कोकणचा कायापालट करण्याची क्षमता असलेला जागतिक पर्यटनाच्या या सी वर्ल्ड सारख्या प्रकल्पाला शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ साहेबांनी खूप प्रयत्न केले. मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. 24 जून, 2009 ला सिंधुदुर्गमध्ये जी कॅबिनेटची बैठक झाली त्यावेळी हा प्रकल्प करणार असे जाहीर केले. आज अशी परिस्थिती आहे की, अजून जागा सुध्दा ताब्यात घेतलेली नाही. या प्रकल्पाची जागा शासन नेमकी कधी घेणार आहे ? दुसरा प्रश्न असा की, अमेरिकेतील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26490..... श्री. राजन तेली ....

इंटरनॅशनल ह्युमन सोसायटी या ऑर्गनाझेशनने तक्रार केलेली आहे. त्यांनी याला आक्षेप घेतलेला आहे. तसेच आपल्या देशातील ज्या अशा बऱ्याच एनजीओ आहेत त्यातील काही एनजीओंना समुद्र काय आहे हे सुध्दा माहीत नाही पण अमेरिकेची जी ऑर्गनायझेशन आहे त्यांच्याप्रमाणे या ज्या काही दहा बारा एनजीओ आहेत त्यांनी एकाच फारमॅटमध्ये म्हणजे अमेरिकेच्या ऑर्गनायझेशनचा जो फॉरमॅट आहे त्याच फॉरमॅटमध्ये तक्रार केलेली आहे. त्यामुळे लोकांमध्ये सुध्दा संभ्रम निर्माण झालेला आहे. अशा प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या आहेत. पर्यटनाला चालना देणारा आणि कोकणामध्ये 40 ते 45 हजार रोजगार निर्माण करणारी क्षमता असणारा, महाराष्ट्रातील विकास या पर्यटनाच्या माध्यमातून वेगाने होणारा हा प्रकल्प आहे. आशिया खंडातील हा पहिला प्रकल्प आहे. या प्रकल्पाची जागा कधी ताब्यात घेणार ? आपला डीपीआर मंजूर झालेला आहे काय, असल्यास भूसंपादनाच्या कामाला कधी सुरुवात करणार आणि प्रत्यक्षात हा प्रकल्प केव्हा पूर्ण होईल ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हे खरे आहे की, 2009 च्या सिंधुदुर्गमध्ये झालेल्या कॅबिनेटच्या बैठकीमध्ये हा निर्णय घेतला की, सी वर्ल्ड असो, रोप वे असो, सी शोअरचे गॉल्फ कोर्स असो, असे वेगवेगळे पी.पी.पी. प्रोजेक्ट्स आपण निश्चितपणे विचारात घेतले पाहिजेत आणि ते डेव्हलप केले पाहिजेत.

यानंतर श्री.खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26490.... श्री.रणजित कांबळे...

हा प्रकल्प पी.पी.पी.तत्वावर कोकणामध्ये होण्याच्या दृष्टीकोनातून दिनांक 18.10.2011 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये पी.पी.पी.ला प्रिलिमिनरी ॲप्रुव्हल देण्यात आले. त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडे तफावत निधीसाठी प्रस्ताव देण्याचे ठरले. दिनांक 5.3.2012 रोजी एम.टी.डी.सी.मंडळाची बैठक झाली होती. त्या बैठकीत सायन्स ॲण्ड टेक्नोलॉजी पार्क, पुणे या संस्थेकडून डी.पी.आर.तयार करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. या संदर्भातील टी.पी.आर.आल्यानंतरच जमीन संपादनाची व बाकीची कामे सुरु होणार आहेत.

श्री.परशुराम उपरकर : हा सी वर्ल्ड प्रोजेक्ट कोणत्या गावामध्ये होणार आहे, या प्रकल्पासाठी जागा निश्चित झाली आहे काय, मागील दोन दिवसांपासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विषय सुरु आहे हे आपणा सर्वांना माहीतच आहे. तेव्हा या प्रकल्पासाठी सी.आर.झेड.ची अडचण येऊ नये यासाठी पर्यावरण विभागाची आगाऊ परवानगी घेतली आहे काय ?

श्री.छगन भुजबळ : सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे 9 वर्षापूर्वी कोकणामध्ये मंत्रिमंडळाची बैठक झाली होती. त्या बैठकीत राज्यातील पर्यटन वाढविण्यासाठी अशा अनेक गोष्टी करण्याचे ठरले होते. सायन्स ॲण्ड टेक्नोलॉजी पार्क, पुणे युनिव्हर्सिटी ही संस्था पुण्याची असली तरी ती केंद्र शासनाची आहे. त्या संस्थेला या प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल तयार करण्यास सांगितले होते. अशा प्रकारच्या कामासाठी अहवाल तयार करण्यासाठी वेळ लागतो. या संस्थेने जगात असलेले प्रोजेक्टस् व आपल्याकडे कोठे कोठे करणे शक्य आहे याबाबतचा अभ्यास करुन त्यांनी 4-5 महिन्यात अहवाल सादर केला होता. तो अहवाल माननीय मुख्यमंत्र्यांसमोर ठेवण्यात आला होता. माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत या संदर्भात पुढे जाण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबत सुसाध्यता अहवाल तयार झाला असला तरी यासाठी डी.पी.आर.तयार करणे आवश्यक आहे. यासाठी इतर कंपन्यांना नेमण्यापेक्षा भारत सरकारच्या संस्थेलाच डी.पी.आर.तयार करण्यासाठी नेमले आहे. त्यांनी प्रकल्पाची जागा निश्चित करणे, तो कसा करावयाचा, त्याचे ड्रॉईंग्ज, केंद्र शासनाच्या व इतर विभागांच्या परवानग्या त्यांनी मिळवावयाच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. त्यानंतर त्यांना फी दिली जाणार आहे. येत्या सहा महिन्यात ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर जमीन संपादनाची कार्यवाही सुरु होईल. या कामासाठी उपलब्ध असलेल्या जागेपैकी काही जागा शासनाच्या ताब्यात आहे, काही जागा पडीक आहे. ही जागा सहज संपादित करता येईल, त्यामध्ये अडचण येईल असे वाटत नाही. तसेच तेथील समुद्र जीवन , तेथील मासे व वैविध्यपूर्ण असलेली समुद्र संपत्ती अतिशय महत्वाची आहे. त्या ठिकाणी हा प्रकल्प करावयाचा आहे. त्या ठिकाणी पाणी शुध्द आहे, प्रदूषित पाणी नाही अशा प्रकारचा रिपोर्ट आल्यानंतर एक विशिष्ट जागा नजरेसमोर ठेवून या कामाला सुरुवात केली जाईल.

उप सभापती : प्रश्न क्रमांक 25096.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन 2009 मध्ये देखील हेच उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले आहे. त्यावेळच्या व आजच्या उत्तरामध्ये काहीही फरक केलेला नाही. दिनांक 13.4.2010 रोजी मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर मी वाचून दाखवितो.

यानंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26490....

श्री. भाई जगताप....

माननीय मंत्री महोदय हे आज खूप मुडमध्ये आहेत. आज सी वर्ड प्रकल्पाचा प्रश्न निकालात निघेल अशी मला खात्री आहे. 2009 मध्ये प्रकल्प सुसाध्यतेचा अभ्यास करावयास सांगितले असून, त्याचा अहवाल आल्यानंतर अंतिम करार होईल ही गोष्ट माननीय मंत्र्यांनी नुकतीच सांगितली. त्यांनी प्रकल्प सुसाध्यतेचा अहवाल सहा महिन्यात तयार करुन द्यावयाचा आहे. सहा महिन्यात अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील सहा महिन्यात प्रकल्पाचे काम सुरु होईल एवढे निश्चित सांगू इच्छितो अशी माहिती माननीय मंत्री महोदयांनी मागील अधिवेशनातील प्रश्नाच्या निमित्ताने सांगितली आहे आणि तशीच माहिती आता देखील माननीय मंत्री महोदयांकडून सांगण्यात आली आहे. सदरचा अहवाल प्राप्त झाला नाही म्हणून आपण केंद्र शासनाकडे पैशांची मागणी केली नाही अशीही माननीय मंत्री महोदयांनी पूर्वीच्या उत्तरात दिली आहे. माननीय मंत्री महोदयांनी पुढे जाऊन असेही आश्वासन दिले आहे की, या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी मिळाला नाही तर तो निधी डी.पी.डी.सी.च्या माध्यमातून उभारणार आहोत. माननीय मंत्री महोदयांनी दिनांक 13.4.2010 रोजी या सभागृहात याच प्रश्नाच्या अनुषंगाने आश्वासन दिलेले आहे. या प्रकल्पाच्या अनुषंगाने नवीन काय दिले असा माझा प्रश्न आहे. हा एक महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. जगभरातील पर्यटकांना आकर्षित करणारा हा प्रकल्प आहे. कोकणातील समुद्राला पोषक असणारा हा प्रकल्प आहे. सदरहू प्रकल्पाचे काम करण्यासाठी केंद्र शासनाने निधी उपलब्ध करुन दिला नाही तर त्यासाठी डी.पी.डी.सी.च्या माध्यमातून निधी उभारला जाईल काय ? या प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमिनीच्या संपादनामध्ये फारशी अडचण येणार नाही असे माननीय मंत्री महोदयांनी नुकतेच सांगितले आहे. या प्रकल्पाला लागणारी जमीन किती दिवसामध्ये संपादित केली जाईल, या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन तो किती कालमर्यादेमध्ये पूर्ण केला जाईल ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जी माहिती देत आहेत ती बरोबर आहे आणि मी जी माहिती देतो आहे, ती माहिती अधिक बरोबर आहे. त्याचे कारण असे आहे की, त्यावेळेला आम्ही सांगितले होते की, सायन्स टेक्नॉलॉजी इन्स्टीटयूट ही प्रकल्पासंबंधी सुसाध्यता अहवाल तयार करते. त्या इन्स्टीटयूटने फार मोठा अहवाल तयार केलेला आहे. आपल्याला या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ...

ठिकाणी काय काय करता येईल, कोकणात कोठे, कोठे काय करता येईल, कोकणातील कोणत्या भागात अशा प्रकारचा प्रकल्प उभारणे शक्य आहे, कोणत्या भागात शक्य नाही याबाबतीत त्यांनी संपूर्णपणे अभ्यास केला आहे आणि त्यासंबंधी त्यांनी शासनाला सुसाध्यता अहवाल सादर केला आहे असे मी सांगितले होते. यापुढे जाऊन मी असेही सांगितले आहे की, तो सुसाध्यता अहवाल शासनाने मान्य केला, त्यानंतर तो अहवाल माननीय मुख्यमंत्र्यांच्या समोर मांडला. त्यानंतर त्या अहवालातील चार-पाच प्रमुख गोष्टी होत्या त्या मंजूर झाल्या. सिंधुदुर्ग जिल्हयातील सदर स्थान निश्चितीनुसार टेक्नो कमर्शियल फिजिबिलिटीच्या आधारे प्रकल्पाचे पी.पी.पी.मॉडेल तयार करण्यासाठी तत्वत: मान्यता देण्यात यावी. केंद्राकडे निधी मागणीसंदर्भात प्रस्ताव पाठविण्यात यावा. राज्य शासनाच्या अर्थसंकल्पामध्ये आवश्यक तरतूद करण्यासाठी पर्यटन विभागाने प्रस्ताव सादर करावा. विहित नियमानुसार प्रकल्पाचे मॉडेल तयार झाल्यानंतर अंतिम प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

महोदय, सगळयात महत्वाची गोष्ट अशी आहे की, सुसाध्यता अहवाल झाल्यानंतर डी.पी.आर. तयार करावयाचा असतो, त्यासाठी प्रत्यक्ष त्याचे ड्रॉईंग कशा प्रकारचे राहील, त्यासाठी प्रत्यक्ष किती खर्च आहे, यासाठी कोणती यंत्रसामग्री वापरली जाणार आहे, प्रत्यक्षात ठिकाण कोठे आहे, तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या सर्व परवानग्या मिळविण्यासाठी या संस्थेला शासनाने मुखत्यारपत्र दिले आहे. याचा अर्थ असा आहे की, कार्यवाहीच्या दुसऱ्या भागाचे काम सुरु झालेले आहे. मी सभागृहात सांगितले आहे की, डी.पी.आर.हा अतिशय महत्वाचा आहे. प्रत्येक इमारतीचे ड्रॉईंग तयार करण्यात येणार आहे, त्यासाठी लागणारी इक्विपमेंट कोठून आणणार आहोत, त्याची किंमत किती आहे, या सगळया गोष्टीची व्यवस्थितपणे मांडणी होत आहे. त्यामुळे या संदर्भात थोडा जास्त वेळ लागेल. त्या कंपनीला शासनाकडून थोडा जास्त वेळ देण्यात आलेला आहे. पुढील पाच-सहा महिन्यात यासंबंधीची पूर्णपणे कार्यवाही व्हावी अशी अपेक्षा आहे. त्यानंतर भूसंपादनाचे काम सुरु होईल. दिनांक 24.6.2009 सिंधुदुर्ग जिल्हयातील ओरस या ठिकाणी मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्या बैठकीत असे ठरले की....

यानंतर श्री. भोगले....

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पी.पी.पी.च्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये सी वर्ल्ड व इतर प्रकल्प विकसित करणे, सी वर्ल्ड, गोल्फ कोर्स, थीम पार्क, बहुउद्देशीय संकुल, ॲम्फिबियन व्हेईकल अशा अनेक गोष्टी पी.पी.पी.मॉडेलमधून तयार कराव्यात असे 2009 मध्ये ठरले. त्यातील पुढचा भाग सी वर्ल्ड प्रकल्पाचा असून तो राबविण्याच्या दृष्टीने या संस्थेची मदत घेतली. त्यांचा सुसाध्यता अहवाल आला, माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये त्या अहवालाला मान्यता घेण्यात आली आणि डीपीआर तयार करण्यास सांगितले आहे. त्याचबरोबर केंद्र सरकारकडे सुध्दा प्रस्ताव पाठविण्यास सांगण्यात आले आहे. या सगळ्या गोष्टी झालेल्या आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रायगड जिल्ह्यातील रोहे-अष्टमी अर्बन बँक, गोरेगाव अर्बन बँक व पेण अर्बन बँक या बँकेतील माजी संचालकांवर सहकार विभागाने केलेल्या कारवाईबाबत

(३) * २५०९६ *श्री.जयंत प्र.पाटील , श्री.कपिल पाटील* : तारांकित प्रश्न क्रमांक २१८२३ ला दिनांक १५ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय ***सहकार मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव अर्बन बँकेची कलम ८८ ची दुसरी चौकशी केव्हा पूर्ण होणार आहे,

(२) गोरेगाव अर्बन बँकेच्या संचालका विरुध्द फौजदारी गुन्हा केव्हा दाखल करण्यात आला, दाखल झालेल्या गुन्ह्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली,

(३) तसेच, पेण अर्बन बँकेचे बाबत कलम ८८ ची चौकशी पूर्ण झाली आहे काय, नसल्यास, केव्हा पूर्ण होईल, संचालक व अधिकारी यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा केव्हा दाखल करण्यात आला, गुन्हा दाखल झाल्यानंतर पुढील कोणती कारवाई करण्यात आली वा सुरु आहे,

(४) तसेच, दि रोहा अष्टमी अर्बन बँकेची कलम ८३ ची चौकशी केव्हा झाली, कलम ८८ ची चौकशी केव्हा पूर्ण झाली, कलम ८८ ची चौकशी केव्हा पूर्ण होणार आहे,

(५) दि रोहा अष्टमी अर्बन बँकेचे प्रकरण पेण अर्बन बँकेच्या अगोदर निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(६) असल्यास, पेण अर्बन बँक घोटाळ्यातील संचालक व अधिकारी यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हे दाखल झाले आहेत, त्याप्रमाणे दि रोहा अष्टमी अर्बन बँकेच्या संचालकांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे काय, असल्यास दाखल गुन्ह्यानुसार त्यांना अटक करण्यात आली होती काय, असल्यास केव्हा ?

श्री.हर्षवर्धन पाटील : (१) गोरेगाव अर्बन बँकेची कलम ८८ अंतर्गत चौकशी माहे एप्रिल २०१२ अखेरपर्यंत पूर्ण होईल.

(२) गोरेगाव अर्बन बँकेचे संचालकांविरुध्द एफ.आय.आर.क्र. ४१/२००७ दि.१८.११.२००८, १८/२००९, दि. ३१.३.२००९, ४५८/२००८ दि.६.१२.२००८ (पनवेल) येथे गुन्हा क्र. ४०९, ४२०, ४६७, ४६८ व ३४ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. कारवाई पोलीस खात्यामार्फत सुरु आहे. गुन्हा दाखल झाल्यानुसार ७ आरोपींना अटक झालेली आहे. दिनांक १९.८.२०११ रोजी आर.सी.नंबर ६३/२०११ अन्वये चार्जशिट दाखल करण्यात आलेली आहे.

(३) कलम ८८ ची चौकशीचे कामकाज पूर्ण झालेले नाही. चौकशीचे कामकाज विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचेकडून सुरु आहे.

सर्व संचालक, संबंधित लेखापरिक्षक तसेच अधिकारी असे एकूण ४१ व्यक्तींवर पोलीस ठाणे पेण येथे गुन्हा क्र. ३४/२०११ दि.२२.०३.२०११ रोजी एफआयआर दाखल करणेत आलेला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आतापर्यंत ४५ आरोपींना अटक झालेली आहे.

(४) दि रोहे अष्टमी को-ऑप. अर्बन बँकेची कलम ८३ अन्वये चौकशी झालेली नसून थेट कलम ८८ अन्वये सदर बँकेविरुध्द कारवाई सुरु आहे. सदरील चौकशीचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असून दि. ३०.०६.२०१२ पर्यंत सदर चौकशीचे कामकाज पूर्ण करीत असल्याबाबत चौकशी अधिकारी यांनी जिल्हा उपनिबंधक, रायगड यांना कळविलेले आहे.

(५) होय.

(६) होय.

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२५०९६.....

दि.रोहा अष्टमी को-ऑप. अर्बन बँकेच्या संचालकांविरुध्द दि.१५.१०.२००७ रोजी प्रशासक यांनी पोलीस स्टेशन रोहा येथे तक्रार दाखल केलेली होती. विशेष लेखापरिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (प्रक्रिया) पेण यांनी दि. १४.१२.२०११ रोजी केलेल्या तक्रारीवरुन रोहा पोलीस स्टेशन रोहा का.गु.नं. ११३/२०११/भादवि कलम ४०९, ४१७, ४१८, ४२०, ३२ अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. पोलीस खात्यामार्फत तपास चालू आहे. अद्याप कोणालाही अटक झालेली नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी सहकार विभागाला धन्यवाद देतो. माननीय गृहमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. मागील अधिवेशनात मी हा प्रश्न उपस्थित केला होता, त्यावेळी उत्तर देण्यात आले होते की, या प्रकरणाचा तपास केला जाईल. सहकार विभागाने चांगल्याप्रकारे तपास करुन पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. परंतु पोलीस स्टेशनमधील रेकॉर्ड गहाळ झाले आहे. मागील वेळी प्रश्न उपस्थित केला होता, त्यावेळी माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते की, कोणत्याही परिस्थितीत एका महिन्यात कारवाई करण्यात येईल. ही कारवाई केव्हा पूर्ण होईल? मी हा प्रश्न गृह खात्याला उद्देशून विचारला होता. सहकार खात्याने चांगले काम केलेले आहे. परंतु पोलीस स्टेशनमध्ये प्रकरण दाखल केल्यानंतर त्यांच्याकडून कारवाई का झाली नाही? ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी कागदपत्रे गहाळ केली त्यांच्याविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाची व्याप्ती रोहे-अष्टमी अर्बन बँक, गोरेगाव अर्बन बँक आणि पेण अर्बन बँक या तीन बँकांच्या संदर्भात आहे. चौकशी करुन कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून गुन्हे दाखल केलेले आहेत. जेथे कारवाई करावयाची आहे तेथे ती झालेली आहे. पोलीस स्टेशनमधून रेकॉर्ड गहाळ झाले असे सन्माननीय सदस्य म्हणतात, त्या संदर्भात चौकशी केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर माननीय गृहमंत्र्यांनी दिले तर अधिक संयुक्तिक होईल.

श्री.हर्षवर्धन पाटील : मी माननीय गृहमंत्र्यांकडून माहिती घेऊनच उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहे. हे सरकार एकसंघ आहे.

..४

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२५०९६.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सरकार एकसंघ दिसत नाही. सन्माननीय मुख्यमंत्री वेगळे सांगतात, सन्माननीय उप मुख्यमंत्री वेगळे सांगतात. सन्माननीय मुख्यमंत्री सांगतात की, अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला जाईल. सन्माननीय उप मुख्यमंत्री यांनी याच्या विरुध्द भूमिका मांडली आहे. आम्ही यातून काय बोध घ्यायचा?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सरकार एकसंघ आहे. माननीय सदस्यांना उत्तर ऐकताना वेगळे ऐकू येत असावे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, याच विषयाच्या अनुषंगाने मी दिनांक १५.१२.२०११ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक-२१८२३ सभागृहात उपस्थित केला होता. रोहे-अष्टमी अर्बन बँकेची कलम ८३ अन्वये चौकशी पूर्ण झाली असून कलम ८८ ची चौकशी सुरु असल्याचे नमूद केले होते. या प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर क्रमांक-२ मध्ये म्हटले आहे की, रोहे अष्टमी अर्बन बँकेची कलम ८३ अन्वये चौकशी झालेली नसून थेट कलम ८८ अन्वये बँकेविरुध्द कारवाई सुरु आहे. दिनांक १५.१२.२०११ रोजी उपस्थित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक-२१८२३ ला दिलेले उत्तर आणि आज देण्यात आलेले उत्तर यामध्ये तफावत दिसून येते. नेमकी वस्तुस्थिती काय आहे? रायगड जिल्हयातील लाखो ठेवीदारांना देशोधडीला लावण्यात आले आहे. २००८ मध्ये गुन्हा नोंदविलेला असताना २०११ पर्यंत चार्जशीट दाखल झालेली नाही.

नंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25096..... श्री. संजय केळकर .....

ही तफावत कोणाच्या दबावाखाली चालू आहे, कोणत्या संचालकांना पाठीशी घालण्याचे काम चालू आहे, कारण मागील अधिवेशनात विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात सांगितले होते की, या संचालकांवर एक महिन्यात कारवाई करण्यात येईल पण त्याला सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील अद्यापही या संचालकांवर कारवाई झालेली नाही, म्हणून शासन यासंदर्भात कोणती ठोस कारवाई करणार आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार चौथ्या प्रश्नाच्या उत्तरात दिलेली बाब खरी आहे. ती म्हणजे रोहा अर्बन बँकेची चौकशी सहकार अधिनियम, कलम 83 नुसार नसून कलम 88 नुसार चौकशीचे काम चालू आहे आणि ही चौकशी दि. 30 जून, 2012 पर्यंत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर तातडीने दोषींवर कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल. तसेच ही कारवाई करताना त्यात कोणत्याही प्रकारची दिरंगाई होणार नाही याची मी ग्वाही देतो.

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, ज्या अधिकाऱ्यांनी फिर्यादीसंबंधीचे प्रकरण व रेकॉर्ड गहाळ केले त्यासंबंधीची चौकशी झाली पाहिजे ही आमची मागणी आहे. तसेच हे रेकॉर्ड गहाळ झाल्यानंतर सहकार विभागाने नव्याने रेकॉर्ड तयार करुन दिले त्याबद्दल मी सहकार विभागाला धन्यवाद देतो. कारण ऑडिटरने यामध्ये फरक काढला होता म्हणून माझी विनंती आहे की पोलीस स्टेशनमधून जे रेकॉर्ड गहाळ झाले त्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई शासन करणार आहे काय ? माननीय पालकमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार त्यांचा संबंध नाही, तसेच मला माहीत नाही असेही ते म्हणाले. पण सभागृहात सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी समजून शासनाने उचित कारवाई करणे अपेक्षित असते.

श्री. सुनील तटकरे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितली ती वस्तुस्थिती आहे. त्या बाबीची गृह विभागाने जरुर तपासणी करावी. सहकार विभागाकडून जी फिर्याद नोंदविली गेली त्यात जे जे गुन्हेगार आहेत तसेच फिर्यादीची नोंद का झाली नाही यासंबंधी सखोल चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई केली जावी अशी माझी अपेक्षा आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावती विभागातील अकोला, बुलडाणा, वाशीम या जिल्ह्यांतील योजने अंतर्गत अ,ब,क कार्यक्रमांनुसार रस्ते देखभाल दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणात झालेला भ्रष्टाचार

(4) * 25244 डॉ.रणजित पाटील , श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.नागो गाणार, श्री.भगवान साळुंखे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अमरावती विभागातील अकोला, बुलडाणा, वाशीम या जिल्ह्यांतील योजने अंतर्गत अ,ब,क कार्यक्रमांनुसार रस्ते देखभाल दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक 5 ऑगस्ट, 2011 रोजी अधीक्षक अभियंत्यांना व दिनांक 27 डिसेंबर, 2011 रोजी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांना निवदेनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुषंगाने संबंधित कंत्राटदारावर व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) असल्यास, कारवाईचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता: (1) होय, हे खरे आहे.

(2), (3) व (4) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ अमरावती यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

डॉ. रणजित पाटील : महोदय, दि. 5.8.2011 रोजी अधीक्षक अभियंता, अकोला आणि दि. 27.12.2011 रोजी मुख्य अभियंता, अमरावती विभाग यांना मी दोन पत्रे दिली. त्या पत्रात योजनेअंतर्गत अ, ब व क कार्यक्रमानुसार रस्ते देखभाल दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणात इ ालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबतची माहिती मागितली होती, हे खरे काय, तसेच आमदार म्हणून नियमानुसार 7 दिवसात माहिती मिळण्याचे अधिकार आम्हाला प्राप्त झालेले आहेत याचेही स्मरण मी करुन दिले होते, हे खरे आहे काय, तसेच यामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या तक्रारीत तथ्य असल्याचा अहवाल दिला असून संबंधित अधिकाऱ्यावर शासन कारवाई करणार काय ?

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी दि. 5.8.2011 ला अधीक्षक अभियंता, अकोला यांच्याकडे जी माहिती मागितली आहे त्यात सन 2009-10, 2010-11 व 2011-12 या तीन वर्षात बजेटमध्ये लोकल सेक्टर आणि स्टेट लेव्हलच्या अखत्यारितील 50:54 व 30:54 या कामांची सविस्तर माहिती मागितलेली आहे. त्यासोबत त्यांनी ठक्कर बाप्पा आणि अल्पसंख्यांक तसेच खनिज विकास निधी आणि नॉन प्लॅन मधील उपरोक्त तीन जिल्ह्यांची माहिती देखील अधीक्षक अभियंता, अकोला यांना मागितलेली होती. त्यानुसार सन्माननीय सदस्यांना दि. 7.9.2011 रोजी सविस्तर माहिती दिली असून त्याची पोच माझ्याकडे आहे. त्यानंतर दि. 27.12.2011 रोजी पुन्हा सन्माननीय सदस्यांनी मुख्य अभियंता, अमरावती यांच्याकडे काही माहिती मागितलेली आहे....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :25244...

श्री. रणजित कांबळे...

सन्माननीय सदस्यांनी आपल्या पत्रात असा उल्लेख केलेला आहे की, मी संबंधित माहिती मागितली होती परंतु मला संबंधित माहिती दिली गेली नाही. सन्माननीय सदस्यांना माहिती उपलब्ध करुन दिली गेली नाही, याचा अर्थ या प्रकरणामध्ये गैरव्यवहार, भ्रष्टाचार झालेला आहे, असे मला वाटते. सन्माननीय सदस्यांनी संबंधित ठेकेदार आणि अधिका-यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशा प्रकारची लेखी तक्रार केलेली आहे. सन्माननीय सदस्यांना दि. 7.9.2011 रोजी सर्व माहिती लेखी स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, अशी माहिती अधीक्षक अभियंता यांनी दिलेली आहे.

डॉ.रणजित कांबळे : सभापती महोदय, सदर माहिती सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन दिली गेली आहे, असे मंत्री महोदयांना ब्रिफींग केले गेले असावे. मी मागितलेली "अ", "ब", "क" ची माहिती मला अद्यापपर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सविस्तर माहिती उपलब्ध झाली नसेल तर ती उपलब्ध करुन देण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी या प्रकरणामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे,अशी तक्रार केलेली असल्यामुळे या प्रकरणामध्ये तिन्ही डिव्हीजनच्या कामांची तपासणी दक्षता पथकाकडून करण्यात येणार आहे,एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. यामध्ये 6911 कामे असून आपली स्पेसिफिक तक्रार असेल तर संबंधित तक्रारीनुसार सदर कामांची तपासणी दक्षता पथकाकडून केली जाईल,एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या प्रकरणामध्ये सन्माननीय सदस्यांना एकूण 188 पेजेस पाठविण्यात आलेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चंद्रपूर जिल्ह्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामात झालेली अनियमितता

(५) * २५४२४ *श्रीमती शोभा फडणवीस* : सन्माननीय ***सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १ येथील कार्यरत कार्यकारी अभियंता व पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग (रो.ह.यो.) गोंदिया यांनी रस्ते दुरूस्ती गट-अ व गट-ब मधील कामाची निविदा प्रक्रियेत अनियमितता केल्याने त्याबाबत दिनांक २७ जुलै, २०११ रोजी दक्षता व गुणनियंत्रण मंडळ नागपूर यांनी शासनास दोषारोपपत्र दाखल केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांने अनियमितता केल्याने चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, सचिव यांना दिनांक १४ जानेवारी, २०१२ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्र दिले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.छगन भुजबळ : (१) होय. अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नागपूर यांनी २७/६/२०११ रोजीच्या पत्रान्वये दोषारोपपत्रे शासनास सादर केली आहेत.

(२) होय.

(३) गोंदिया येथील अनियमिततेबाबत संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली आहे. तर चंद्रपूर येथील तक्रारीबाबत अ.अ., सा.बां.दक्षता पथक मंडळ यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य 6-6 महिने अगोदर पत्र देऊन माहिती मागवित असतात परंतु अधिका-यांकडून आम्हाला साधी पोहच देखील उपलब्ध होत नाही, चौकशी केली जात नाही. मात्र ज्यावेळी सभागृहात प्रश्न उपस्थित केला जातो त्यावेळी धावपळ करुन सर्व माहिती उपलब्ध करुन दिली जाते. यामुळे ही प्रथा बंद होण्याची आवश्यकता आहे. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर त्यांना मिळालेच पाहिजे.

गोंदिया येथील अनियमिततेच्या संदर्भात दक्षता गुण नियंत्रक मंडळ, नागपूर यांच्या बाबत मी दि. 27.6.2011 रोजी मंत्रालयात पत्र दिले होते. परंतु 9 महिने होऊनही या प्रकरणाबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही. परंतु आता उत्तरात असे म्हटले आहे की, 1979 च्या नियम 8 अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आलेली आहे. चंद्रपूरच्या तक्रारीबाबत दक्षता पथक मंडळ यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

खरे म्हणजे या प्रश्नाच्यां संदर्भात मी पुराव्यासह सर्व अधिका-यांना पत्र दिले होते परंतु त्यावर सहा महिने झाले तरी कारवाई झालेली नाही. सन्माननीय सदस्यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केल्यानंतरच शासनाकडून माहिती दिली जाणार आहे काय ? आम्ही आमच्या पत्रात पुरावे जोडत असतो. असे असतांना संबंधित प्रकरणामध्ये कार्यवाही का केली जात नाही ? मी उपस्थित केलेल्या प्रश्नाची चौकशी दक्षता मंडळाकडे देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणासाठी किती दिवसांची मुदत दिली गेली ? सदर प्रकरणाची माहिती आम्हाला कधी मिळणार व प्रत्यक्षात कारवाई केली जाणार आहे काय, आम्हाला जुलै महिन्याच्या अधिवेशनात पुन्हा हाच प्रश्न विचारावा लागणार आहे काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन कामांच्या संदर्भातील अधिका-यांची तक्रार केलेली आहे. गोंदिया जिल्हयातील अनियमिततेच्या संदर्भात प्रथमदर्शनी तथ्य आढळून आल्यामुळे नियम 8 अनुसार कारवाई सुरु करण्यात आलेली आहे. नियम 8 अनुसारची कारवाई कडक स्वरुपाची असून या कारवाईमध्ये नोकरीवरुन सुध्दा काढून टाकले जाते.

श्रीमती शाभा फडणवीस : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये एकाच अधिका-यावर कारवाई केली जाणार आहे की, सर्व संबंधित अधिका-यांवर कारवाई केली जाणार आहे ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये जे कोणी संबंधित अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाणार असून ही कारवाई सुरु झालेली आहे. दुसरे प्रकरण चंद्रपूर जिल्हयातील असून त्या संदर्भात राज्याच्या दक्षता पथकाला चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. ही चौकशी एक महिन्याच्या आत संपूवन संबंधितावर कारवाई करण्यात यावी, असे आदेश देण्यात आलेले आहेत.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पोलादपूर (जि.रायगड) पोलिसांनी बनावट कागदाच्यापत्राद्वारे खरेदी खत तयार करुन जमिनीची विक्री करणाऱ्यांवर दाखल केलेले गुन्हे

(6) * 26544 श्री.दिवाकर रावते , डॉ.दीपक सावंत : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पोलादपूर पोलिसांनी (जि.रायगड) दुय्यम निबंधक, महसूल विभाग व इतर तिघांवर बनावट कागदपत्राच्याद्वारे खरेदी खत तयार करुन जमिनीची विक्री केल्याप्रकरणी माहे जानेवारी 2012 च्या पहिल्या आठवड्यात गुन्हे दाखल केले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) होय.

तथापि सदर प्रकरणी दि.05/04/2010 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(2) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार पोलादपूर पोलीस ठाणे गु.र.नं.14/2010 भा.दं.वि.कलम 420, 419, 465, 468, 471, 34 अन्वये एकूण 15 आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिटपिटीशन क्र.2453/2011 मधील आदेशानुसार सदर गुन्हा उपविभागीय पोलीस अधिकारी, महाड यांचेकडे वर्ग करण्यात आला असून गुन्ह्याच्या तपास सुरु आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे, अशा प्रकारचा लेखी प्रश्न विचारण्यात आला आहे. चौकशीत काय आढळून आले हे लेखी उत्तरामध्ये कुठेही नमूद केलेले नाही. दुसरा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, जे कोणी अधिकारी या प्रकरणाशी संबंधित आहेत ते सध्या कार्यरत आहेत काय, त्यांचा सध्याचा स्टेटस काय आहे, हा पहिला प्रश्न आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये मोडस ऑपरेंडी अशी होती की ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी होत्या त्यांच्या घरी जाऊन त्यांचे फोटो गोळा करायचे किंवा हयात नसलेले शेतकरी किंवा मयत असेलेले शेतकरी यांचे फोटो कुठल्या तरी निमित्ताने गोळा करायचे आणि पॉवर ऑफ ॲटर्नी करून जमीन विकायची. यासंबंधी जी कारवाई करण्यात आली आहे ती लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आली आहे. या प्रकरणी 15 आरोपी निष्पन्न झाले आहेत. त्यातील 5 आरोपींना जामीन मंजूर झालेला आहे. उर्वरितांवर देखील कारवाई सुरू आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. आपण कोणाला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहात ? मृत लोकांचे फोटो लावून जमिनी लाटण्याचा हा प्रकार आहे. ही बाब गरीब शेतकऱ्यांच्या लक्षात येत नाही. कोकणात हा प्रकार सर्रास होत आहे. रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात असे प्रकार होत आहेत. या प्रकरणात गुंतलेले अधिकारी हे निर्ढावलेले आहेत. त्यामुळे त्यांना निलंबित का केले नाही, असा माझा प्रश्न आहे. या प्रकरणी माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कलम 420, 419, 465, 468, 471, 34 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. दुय्यम निबंधक, महसूल विभाग व इतर तिघांवर बनावट कागदपत्रांद्वारे खरेदी खत तयार करून जमिनीची विक्री केल्याप्रकारणी माहे जानेवारी 2012 च्या पहिल्या आठवड्यामध्ये गुन्हे दाखल झाले आहेत. तेव्हा माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, हे अधिकारी निलंबित झाले आहेत काय, नसल्यास, त्यांना कधी निलंबित करण्यात येणार आहे ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणी सामील असलेले नायब तहसीलदार यांच्यावर देखील गुन्हा दाखल झालेला आहे. 197 चा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. त्यामुळे महसूल खात्या मार्फत त्यांच्यावर निश्चितपणाने कारवाई केली जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल झाले आहेत. असे असताना शासन त्यांना निलंबित का करीत नाही ?

(दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, महसूल आणि गृह विभाग टोलवाटोलवी करीत असतील तर गरिबांच्या जमिनी जातील. त्यामुळे शासन कुठे तरी बंधन घालणार आहे की नाही ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणी कुणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्न येणार नाही. जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर येत्या 15 दिवसाच्या आत कारवाई केली जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कारवाईचे स्वरूप सांगितले पाहिजे. संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात येणार आहे किंवा नाही हे सांगितले पाहिजे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. जे मयत झाले आहेत किंवा जे लोक उदरनिर्वाहासाठी बाहेर गेलेले आहेत, त्यांचे फोटो घेऊन, मुखत्यारपत्र तयार करून त्यांच्या जमिनी एजंट बनून विकण्याचा प्रयत्न केला जात आहे. ज्यांना जमिनी विकण्यात येत आहेत त्यांची देखील फसवणूक होत आहे. तसेच ज्यांची जमीन आहे त्यांना देखील फसविले जात आहे. अशा प्रकारच्या गोष्टी या प्रकरणामुळे पुढे आलेल्या आहेत. मला या प्रकरणामध्ये काहीच लपवायचे नाही. या प्रकरणी महसूल व गृह खात्याकडे देखील दाद मागितली. पण या शेतकऱ्यांची कोणीही दाद घेतली नाही. त्यानंतर ते उच्च न्यायालयात गेले. माननीय उच्च न्यायालयाने निदेश दिल्यामुळे हे प्रकरण गतीला लागले. शेतकऱ्यांनी पहिल्यांदा पोलिसांकडे व महसूल खात्याकडे न्याय मागितल्यानंतर त्यांना न्याय का मिळाला नाही, चौकशी का करण्यात आली नाही, याची देखील चौकशी करण्याच्या सूचना मी दिलेल्या आहेत.

यानंतर सौ.रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26544 . . . .

श्री.आर.आर.पाटील .....

या सर्व प्रकरणाचा तपास ज्या गतीने झाला आहे आणि यामध्ये कोणी आरोपींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला आहे काय याची सुध्दा चौकशी केली जाईल. तसेच यामध्ये ज्या शासकीय कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे त्यांना निलंबित केले जाईल आणि त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील.

उप सभापती : याठिकाणी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील उपस्थित आहेत. त्यामुळे या प्रश्नाच्या अनुषंगाने एक गोष्ट सांगू इच्छितो की, ठाणे जिल्ह्यातील संपूर्ण भाईंदर परिसरामध्ये आणि विशेष करुन काशीमिरा पोलीस स्टेशनमध्ये बिल्डर्स् आणि पोलीस अधिकारी यांच्या संगनमताने फार मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत आहेत.याबाबतीत मी देखील पत्रे दिलेली आहेत. माझी माननीय गृह मंत्र्यांना विनंती आहे की, जे अधिकारी अडीच-अडीच, तीन-तीन वर्षे तेथील बिल्डरांशी संगनमत करुन त्याठिकाणी ठाण मांडून बसलेले आहेत, त्यांच्यावर आपण ताबडतोब जी काही योग्य कारवाई करावयाची असेल ती करावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, बिल्डर आणि पोलीस यांचे असलेले संबंध तसेच शेतकऱ्यांवर होणारा अन्याय या गोष्टी सहन केल्या जाणार नाहीत. यासंबंधातील माहिती जेथे-जेथे मिळेल, त्या बाबतीत कालबध्द कार्यक्रम आखून अशा अधिकाऱ्यांची चौकशी केली जाईल आणि त्यांच्यावर ज्या ॲक्शन घेणे आवश्यक आहे त्या घेण्यात येतील.

. . . .जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाल्याने कांदा उत्पादकांचे झालेले नुकसान

(7) *25171 श्री.सय्यद पाशा पटेल,श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.चंद्रकांत पाटील,श्री.केशवराव मानकर : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाल्याने कांदा उत्पादकांना तोटा सहन करावा लागत असल्याची बाब दिनांक 21 जानेवारी, 2012 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने इएमपी पूर्णपणे हटवून कांदा निर्यात संपूर्ण खुली करण्याची मागणी कांदा उत्पादकांनी केली आहे, हेही खरे आहे काय,

(3) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : (१) होय.

(२) होय.

(३) मा.मुख्यमंत्री महोदय व मा.मंत्री (कृषि व पणन) यांनी कांदा निर्यातीवरील किमान निर्यात मुल्याची (एमइपी) अट संपूर्णपणे हटविण्याबाबत दिनांक २३.१२.२०११ च्या पत्रान्वये केंद्रशासनास विंनती केली आहे. प्रधान सचिव (कृषि व पणन) यांनी दिनांक १०.१.२०१२ च्या पत्रान्वये संपूर्णपणे एमइपी हटविण्याबाबत केंद्रशासनास विनंती केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, गेल्या वर्षभरामध्ये कांदा पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना प्रचंड तोटा सहन करावा लागत आहे आणि माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये कबूल केले आहे की, हे खरे आहे. मी अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, 11 तारखेला महाजनवाडी, तालुका बीड,येथील श्री.तुकाराम लिंबाजी घरत, वय 45 वर्षे, या शेतकऱ्याने कांद्याच्या ढिगावर चढून बाभळीच्या झाडाला फास लावून आत्महत्या केलेली आहे.आपण असे म्हणत आहात की, यामध्ये 100 टक्के तोटा सहन करावा लागत आहे आणि माझ्याकडे गेल्या वर्षभरातील कांद्याच्या दराच्या संबंधातील मार्केट कमिटीची सर्व कागदपत्रे आहेत. जर 4000 रुपयांचा कांदा 200 रुपयाने विकला जात असेल आणि अशा वेळी जर आपण कल्याणकारी राज्य म्हणून डोळे बंद करुन बसणार असाल तर मग या शेतकऱ्यांनी कुठे जावयाचे. मी माननीय मंत्री महोदयांना या अनुषंगाने दोन प्रश्न विचारणार आहे. आज 4000 रुपयांचा कांदा 200 रुपये या प्रमाणे विकला जात आहे. तसेच माझ्याकडे नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी दोन गोष्टी सांगितल्या आहेत की, या पिकासाठी एकंदर 36 हजार रुपये खर्च होत आहे आणि 15 हजार रुपये उत्पन्न मिळत असून एकराला 21 हजार रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. या वर्षी राज्य शेतमाल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

समितीने केंद्र सरकारकडे कांद्याच्या दराची मागणी केलेली असून त्यानुसार कांद्याला 1233 रुपये इतका दर मिळाला पाहिजे. शेतकरी 200 ते 250 रुपये मजुरी देत आहेत आणि शासनाने 145 रुपये मजुरी ठरविली आहे. तसेच महिलांना 150 रुपये मजुरी द्यावयाची असतानाही शासनाने ती 106 रुपये ठरविली आहे.बियाण्यासाठी कमीतकमी 10 हजार रुपयांचा खर्च आला असताना शासनाने 900 रुपये ठरविलेला आहे. अशा प्रकारे कमीतकमी खर्च धरुन आमच्या शासनाने 1233 रुपयांची मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून शासनाला एक प्रश्न विचारावयाचा आहे की, एवढा प्रचंड तोटा सहन करुन शेतकरी कसे जगणार आहेत? आमच्या जन्मभूमीमध्ये सुध्दा कांदा आहे. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करणार आहे की, जर कांद्याच्या बाबतीत अशी परिस्थिती असेल तर कांदा उत्पादक शेतकऱ्यांना काय नुकसान भरपाई देणार आहात ? केंद्र शासनाची बाजार हस्तक्षेप योजना आहे, त्या योजनेमध्ये तूर, उडीद इ.पिकांचा समावेश आहे. त्यामध्ये कांद्याचा देखील समावेश करणार आहात काय ? तसेच माझ्यासमोर आता सर्वात महत्वाचा विषय असा आहे की, आताच्याआता तातडीने कांदा उत्पादकांना वाचविण्यासाठी काय करणार आहात ? या प्रश्नाचे उत्तर मला माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे.

उपसभापती : आता सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी प्रश्न विचारताना असे सांगितले की, आमच्या जन्मभूमीमध्ये देखील कांदे आहेत. पण आमच्याकडे अकलेचे कांदे आहेत, जे बाजारामध्ये मिळत नाहीत.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्यांकडे सगळया शेतीमालाच्या भावाच्या संदर्भातील समित्यांचे बरेच अहवाल आहेत असे वाटते. खरे म्हणजे कांदा ही नाशिवंत वस्तू असल्यामुळे केंद्र शासनाने प्रिन्सिपल कमोडीटी असल्यामुळे हमी किंमतीच्या अनुषंगाने हे पीक स्विकारलेले नाही.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

ता.प्र.क्र.25171. . . .

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील. . . .

यामध्ये कांद्याची खरीप, लेट खरीप आणि रब्बी अशी वर्गवारी होते परंतु लेट खरीप हंगामामध्ये कांद्याचे जादा उत्पादन झाल्यामुळे या कांद्याचे भाव बाजार भावाप्रमाणे आहेत. महाराष्ट्र हे कांदा उत्पादन करणरे एकमेव राज्य राहिलेले नाही. तरी देखील गेल्या वर्षी आपल्या राज्यामध्ये लेट खरिपातील कांद्याचे उत्पादन आठ लाख क्विंटल होते. या वर्षी त्याच कालावधीमध्ये तुलेनेने त्यामध्ये वाढ झाली व 22 लाख क्विंटल काद्यांचे उत्पादन झाले. गेल्या वर्षापेक्षा या वर्षी कांद्याचे उत्पादन वाढले. राजस्तानमध्ये एक लाख क्विंटल कांद्याचे उत्पादन व्हायचे ते या वर्षी सहा लाख क्विंटल कांद्याचे उत्पादन झालेले आहे. गुजरात आणि मध्यप्रदेशमध्ये हीच परिस्थिती आहे. मुळातच संपूर्ण देशामध्ये 150 लाख मे. टन कांद्याचे उत्पादन होते. निर्यात धरुन महाराष्ट्र राज्याचे कन्झम्शन केवळ 80 लाख मे.टनापेक्षा जास्त नाही. गेल्या दोन वर्षात कांद्याच्या उत्पादनात झालेली वाढ आणि बाजारपेठेत आलेली अनियमितता यातून हे प्रश्न निर्माण झालेले आहेत. तरी देखील गेल्या वर्षीच्या रब्बी हंगामाचा विचार केला तर कांद्याला प्रती क्विंटल 1200 ते 1500 रुपये भाव मिळाला आहे. कांद्याची जादा आवक झाल्याचा परिणाम व देशांतर्गत कांदा उत्पादन क्षेत्र वाढल्याचा परिणाम यामुळे आज कांद्याच्या बाबतीत अशा प्रकारचे चित्र निर्माण झालेले आहे.

सभापती महोदय, कांद्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याला अनुसरुनच राज्य शासनाने गेल्या तीन-चार वर्षात कांदा चाळीतून 10 लाख मे.टन कांदा साठवण्याची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे कांद्याचे जादा उत्पादन झाले तर तो जास्तीचा कांदा साठवता येतो तसेच कांद्याला जादा भाव मिळाल्यानंतर तो विक्रीसाठी काढता येतो. कांदा चाळीच्या बाबतीत शासनाची भूमिका अशी आहे की, शेतकऱ्यांची मागणी असेल त्या ठिकाणी कांदा चाळी बांधण्यासाठी 50 टक्के अनुदान देण्यात येते. त्यामुळे कांद्याच्या हमीभावासाठी वेगळे धोरण घेण्याची आवश्यकता नाही. तसेच प्रिन्सिपल कमॉडिटीला केंद्र शासन देखील सपोर्ट करत नाही. तूरडाळीची किंवा उडीद डाळीची तुलना कांद्याशी होऊ शकत नाही. त्यामुळे कायद्याच्या पध्दतीमध्ये बदल केला पाहिजे आणि या बाबत राज्य शासनाने अभ्यास केलेला आहे. उन्हाळी कांदा किंवा अन्य कांद्याच्या उत्पादनापेक्षा पांढऱ्या कांद्याच्या उत्पादनाला प्रोत्साहन देऊन पांढऱ्या कांद्यावर प्रक्रिया करणाऱ्या लहान-लहान उद्योगाचे जाळे निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25171.....

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील. . . .

पांढऱ्या कांद्याला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तसेच देशातंर्गत मागणी वाढत चालली आहे या दृष्टिकोनातून विचार करावा लागेल.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, माझा प्रश्न असा होता की, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना जगविण्याच्या दष्टिकोनातून शासन काही उपाययोजना करणार आहे का? कांदा साठविण्याकरिता चाळ बांधून काय उपयोग आहे? कांद्याला प्रती क्विंटल 1200 रुपये भाव शासनाला मान्य आहे. महाराष्ट्र हे कल्याणकारी राज्य आहे असे आपण म्हणतो तेव्हा कांद्याला आणखी 200 रुपये भाव वाढवून दिला पाहिजे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करावी असे शासनाचे मत आहे का? कांदा उत्पादक शेतकरी आत्महत्या करीत आहेत हे खरे असेल, कांद्याचे दर कमी झाले आहेत हे खरे असेल तर शेतकऱ्यांना जगविण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे? कांदा साठविण्यासाठी केवळ चाळी बांधून हा कांदा उत्पादक शेतकरी जगणार नाही. संपूर्ण जगातील कांद्याचे दर मी काढलेले आहेत. जवळपास दहा ते पंधरा देशातील कांद्याचे दर माझ्या जवळ उपलब्ध आहेत. जगामध्ये कांद्याचे दर एक डॉलरपेक्षा कुठेही कमी नाहीत. जगामध्ये ज्या वर्षी कांद्याला मागणी असते त्यावेळी निर्यातबंदी करुन कांद्याचे दर कमी करण्यात येतात आणि ज्या वर्षी कांद्याचे उत्पादन जास्त होते त्या वर्षी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्यात येते. तूट असली की लूट आणि मुबलकता असली की लिलाव अशा प्रकारचे धोरण आखण्यात येते. कुठले तरी एक धोरण असले पाहिजे. जगामध्ये ज्यावेळी कांद्याची मागणी होती त्यावेळी निर्यात बंदी करुन शेतकऱ्यांना मारलेले आहे. आता कांद्याचे उत्पादन जास्त झालेले आहे त्यामुळे हा कांदा खरेदी करण्यात यावा, तो खाण्यात यावा अन्यथा या कांद्याचे काय करावयाचे ते करावे पण कांदा उत्पादक शेतकऱ्याला न्याय मिळाला पाहिजे, तो कसा देणार याचे उत्तर सभागृहाला मिळाले पाहिजे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : कांद्याची निर्यात बंदी उठविण्याच्या बाबतीत राज्य शासनाने प्रयत्न केले म्हणूनच आज 125 डॉलर मिनिमम सपोर्ट प्राईस आहे. या ठिकाणी भावनिक प्रश्न निर्माण करुन हा प्रश्न सुटणार नाही. (काही सन्मानीय सदस्य एकाच वेळी बोलतात) सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. ...

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25171.....

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, जेव्हा जगामध्ये कांद्याचे दर 200 डॉलर होते तेव्हा 625 रुपये एमईपी वाढवून आपण शेतकऱ्यांना मारुन टाकले. सभापती महोदय, सगळया अस्त्रांचा वापर करुन कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मारण्याचे पाप या शासनाने केलेले आहे तेव्हा आता तरी कांद्याचे दर वाढवून देऊन या शेतकऱ्यांना वाचविण्यात येणार आहे काय?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25271 ..... श्री. सय्यद पाशा पटेल ....

आता ते शेतकरी मरणार आहेत. त्यांना वाचविणार की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. शासन त्यांना कसे वाचविणार ? 200 रुपये प्रमाणे भाव परवडत नाही. या बाबतीत शासन काय करणार आहे ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे त्या संदर्भात मी उत्तर होतो. जागतिक बाजारपेठेमध्ये काय झाले आहे हे मी सांगत होतो. सन्माननीय सदस्यांनी जगातील भाव सांगितले. जगातील भाव मी सांगितले नाहीत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, माझ्याकडे जगातील भाव आहेत. त्यांनी सांगितले की, आपण निर्यात बंदी करतो. सन्माननीय सदस्य बोलल्यानंतर त्यांचे या संदर्भातील जे गैरसमज आहेत ते दूर करणे गरजेचे आहे म्हणून मी बोलत आहे. महत्वाचा मुद्दा असा आहे की, जगाच्या पाठीवर मुळात आजही कांद्याची निर्यात बंदी नाही तरीही आज कांद्याची निर्यात होण्यास तयार नाही. कांदा उत्पादित करणारे जे दोन देश आहेत त्या चीन आणि पाकिस्तानातून सुध्दा निर्यात होऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. या सगळ्या प्रश्नात कांद्याचे उत्पादन, आवक, जागतिक बाजारपेठ, देशांतर्गत बाजारपेठ याचे ते परिणाम आहेत. दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला की, यामध्ये सरकारची काय भूमिका आहे ? मी मघाशी सांगितले की, आपण वेगवेगळ्या उपाययोजना केल्या तरीही सन्माननीय सदस्यांच्या या संदर्भात ज्या भावना आहेत त्यानुसार जरुर आपण संबंधित सदस्यांची एकत्रित बैठक घेऊ आणि त्या बैठकीतून जो मार्ग निघेल त्या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांनी साधा प्रश्न विचारला. या देशामध्ये जेव्हा जेव्हा शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्ये वाढ होते आणि ते उत्पादन ज्यावेळी परदेशात निर्यात केले जाते तेव्हा ऐनवेळी शासन त्याची निर्यात बंदी करते. कापसाच्या बाबतीत सुध्दा असेच झाले. यावेळी कापसाचा हंगाम सुरु झाल्यानंतर ताबडतोब शासनाने एका रात्रीत निर्यात बंदी केली. त्यानंतर सर्व देशभर ज्यावेळी त्याचा विरोध झाला त्यावेळी सरकारला नाक मुठीत धरुन ती बंदी उठवावी लागली. कांद्याच्या बाबतीत सुध्दा हीच परिस्थिती आहे. ज्या ज्या वेळी कांद्याचे उत्पादन वाढते त्या त्या वेळी कांद्याची निर्यात बंदी केली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जाते आणि भाव पाडले जातात. सन्माननीय सदस्यांनी साधा प्रश्न विचारला की, आता कांद्याचे उत्पादन वाढलेले आहे आणि आपण निर्यात बंदी केलेली आहे त्यामुळे आता कांदा उत्पादक शेतकऱ्यांना भाव मिळवून देण्यासाठी सरकार काय उपाययोजना करणार आहे ? जसा कापसाच्या बाबतीत दबाव आणला त्याप्रमाणे कांद्याची निर्यात बंदी उठविण्यासाठी केंद्र सरकारवर दबाव आणून ही निर्यात बंदी उठविण्यासाठी शासन प्रयत्न करणार का ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने आपण या संदर्भात विशेष प्रयत्न केल्यामुळे आज कांद्याची निर्यात बंदी नाही. आज कोणत्याही शेती मालाची निर्यात बंदी नाही. मध्यंतरी अचानक कापसाच्या निर्यात बंदीचा निर्णय झाला त्या बाबतीत सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीला जाऊन, माननीय पंतप्रधानांना तसेच माननीय अर्थमंत्र्यांना भेटून ती बंदी सुध्दा आता उठविण्यात आलेली आहे. कांद्याची निर्यात बंदी नव्हती आणि आजही नाही. सर्व बाजारपेठ खुली आहे. निर्यात बंदी नाही तरीही बाजार भाव वाढत नाहीत. कारण उत्पादन खूप वाढले आहे त्याचा हा परिणाम आहे.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, एमएपी 125 डॉलर आहे ती शून्य टक्के करावी. आपण एमएपी 125 डॉलरवरुन शून्य टक्के केली असती तर जागतिक बाजारपेठेमध्ये आणखी कांदा गेला असता. तुम्हाला जर द्यावयाचे नसेल तर जेवढी खुंटी आहे ती तरी उपटा. आपण सांगितले की, निर्यात बंदी नाही. एमएपी 125 डॉलरवरुन शून्य टक्के करणार का आणि ते किती दिवसात करणार ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, कांद्याची एमएपी केंद्र सरकारने 600 डॉलरवरुन 125 डॉलरवर आणलेली आहे. एक तर एमएपी असू नये अशी राज्य सरकारची भूमिका आहे. त्या संदर्भात वेळोवेळी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करुन, समक्ष भेटून विनंती केलेली आहे. एमएपी 125 डॉलर आहे ती काढावी असा राज्य सरकारचा केंद्राकडे सातत्याने आग्रह आहे. पण आज जगाच्या बाजारपेठेमध्ये कांद्याच्या निर्यातीला मिळणारे जे मूल्यांकन आहे ते साधारणत: 150 डॉलरपर्यंत आहे. त्यामुळे 125 डॉलर एमएपीच्या माध्यमातून जरी विचार केला तरी मी सांगितले की, सगळ्याच ठिकाणी झालेल्या उत्पादन वाढीचा हा परिणाम आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25171..... श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

सन्माननीय सदस्यांचा मुद्दा बरोबर आहे. परंतु शासनाने केंद्र सरकारकडे वेगळी मागणी केलेली आहे. कॅनलाईज एजन्सी म्हणून पूर्वी नाफेडला नेमण्यात आले होते. आता मंत्री समुहामध्ये निर्यातीवर बंदी घालण्याचा, न घालण्याचा, एम.इ.पी.ठरविण्याचा निर्णय घेण्यात येतो. परंतु शासनाने केंद्र सरकारकडे अशी मागणी केलेली आहे की, हे काम मंत्री समुहाकडे न ठेवता नाफेडकडे द्यावे. म्हणजे रोजच्या बाजारभावाप्रमाणे नाफेडला निर्णय घेता येईल. त्यामुळे निर्यातीचे परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होणार नाहीत.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ MMP/ KGS/

यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी निमित्त दि.17 व 18 मार्च, 2012 रोजी आयोजित केलेला परिसंवाद पुढे कलण्याबाबत

उप सभापती : महाराष्ट्र विधानमंडळातर्फे दिनांक 17 व 18 मार्च, 2012 रोजी "महाराष्ट्र काल, आज आणि उद्या" या विषयावर आयोजित करण्यात आलेला दोन दिवसीय परिसंवाद काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात आला आहे. या परिसंवादाची नवीन तारीख नंतर कळविण्यात येईल. कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

ता.प्र.क्र.25171 बाबत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

उप सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना मी सांगू इच्छितो की, आपण बोलण्यासाठी जेव्हा जेव्हा हात वर केला आहे तेव्हा तेव्हा मी आपल्याला बोलण्याची परवानगी दिलेली आहे. आपल्या प्रश्नांची उत्तरे सुध्दा मंत्री महोदयांनी दिलेली आहेत. या प्रश्नाबाबत आपल्या ज्या काही भावना असतील त्या आपण जरुर व्यक्त कराव्यात. परंतु प्रश्नोत्तराचा तास संपल्याचे मी जाहीर केले असल्यामुळे आता पुन्हा या प्रश्नावर प्रश्नोत्तरे होणार नाहीत. त्यानंतर मला एक महत्वाची घोषणा करावयाची होती ती देखील मी केलेली आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोथे यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्याबाबत त्यांना आपले म्हणणे मांडण्यास मी परवानगी देत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण दिलेला निर्णय आम्हाला मान्य आहे. परंतु सभागृहात एखाद्या ज्वलंत प्रश्नावर प्रश्नोत्तरे चालू असताना प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतरही त्या प्रश्नाचे गांभीर्य विचारात घेऊन आपण अनेकदा प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ 2-4 मिनिटांनी वाढवून दिलेली आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी बोलण्यासाठी हात वर केला होता. आपली परवानगी मिळाल्यानंतर ते बोलण्यासाठी उभे राहिले होते. त्यांनी त्यांचा प्रश्न उच्चारला होता. परंतु त्यांना बोलू न देता परिसंवाद रद्द करण्याची आपण घोषणा केली. शेतकऱ्यांच्या जीवितापेक्षा घोषणा कधीच महत्वाची असू शकत नाही.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना बोलण्यासाठी मी परवानगी दिली होती. परंतु तत्पूर्वीच सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे बोलण्यासाठी उभे राहिले. बोलत असताना ते माझ्याकडे बघत नव्हते, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्याकडेही बघत नव्हते. ते दुसरीकडेच बघून बोलत होते. त्यांचे बोलणे झाल्यावर मी त्यांना अशी विनंती केली की, आपण बोलत असताना कधी तरी पीठासीन अधिकाऱ्यांकडे बघून बोलावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण पीठासीन अधिकारी म्हणून सभागृहात असता त्यावेळी सामान्य माणसांचे प्रश्न मांडण्यासाठी संधी मिळते असा आमचा समज आहे. तो गैरसमज नाही. म्हणून आम्ही त्वेषाने बोलतो, आग्रहाने मांडत असतो. एखादा महत्वाच्या विषयावर कधी कधी पीठासीन अधिकारी प्रश्नोत्तराचा तास 5 मिनिटे वाढवून देतात. कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा जीवन मरणाचा प्रश्न आहे. त्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी रास्ता रोको आंदोलन केले होते. त्यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांबरोबर चर्चा केलेली आहे. (अडथळा) सभापती महोदय, आपल्याकडून आमची अपेक्षा होती. मंत्री महोदय मघाशी असे म्हणाले की, कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातलेली नाही. नंतर असेही म्हणाले की, निर्यात बंदी उठविण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे पत्रव्यवहार केलेला आहे. अशा प्रकारची दोन उत्तरे आलेली आहेत. तेव्हा यातील कोणते उत्तर बरोबर आहे असे आम्ही समजायचे ? आपल्याकडून आम्हाला न्याय मिळेल अशी आमची अपेक्षा असल्यामुळे हा सर्व अट्टाहास केला होता.

उप सभापती : मी या प्रश्नाला भरपूर न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. कदाचित त्यामध्ये मी थोडासा कमी पडलो असेन. परंतु आपण सभागृहात येण्यापूर्वी सन्माननीय मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना असे सांगितले होते की, आपल्यासमवेत आणखी काही सन्माननीय सदस्यांबरोबर या प्रश्नासंबंधी मी सविस्तर चर्चा करीन. परंतु सन्माननीय सदस्यांचा असा पवित्रा होता की, याबाबत चर्चा वगैरे काही नको. ठीक आहे, प्रश्न मांडण्याची त्यांची एक धाटणी आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी हात वर केला होता. पण सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी मध्येच उभे राहून प्रश्न विचारला. त्यावेळी मी त्यांना विनंती केली की, आपण माझ्याकडे बघून बोलले पाहिजे. परंतु ते माझ्याकडे बघतच नव्हते. मी या प्रश्नाला भरपूर वेळ दिलेला आहे असे मला वाटते.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आपण कांद्याच्या प्रश्नाला भरपूर वेळ दिला आहे. कारण तो प्रश्न अतिशय महत्वाचा होता. त्याची उकलही होणे आवश्यक होते. सभापती महोदय, विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य तारांकित प्रश्न देतात त्याप्रमाणे सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य सुध्दा प्रश्न देत असतात. ते प्रश्न देखील महत्वाचे असतात.

यानंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

सन्माननीय सदस्य दोन, दोन, तीन, तीन महिने अगोदर प्रश्न देतात. सातारा जिल्हयातील मूळगांव येथे एका दलित महिलेस विवस्त्र करुन तिची धिंड काढण्यात आली आहे हा गंभीर व महत्वाचा विषय आहे व त्या विषयावर लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आलेली आहे. त्या लक्षवेधी सूचनेवर आम्हाला देखील प्रश्न विचारण्याची संधी मिळेल याची आम्ही वाट पहात होतो. आम्हाला या महत्वाच्या विषयावर प्रश्न विचारण्याची संधी वेळेअभावी मिळाली नाही. सभापती महोदय, हा विषय जरी महत्वाचा असला तरी इतरही विषय तेवढेच महत्वाचे आहेत. या प्रश्नाच्या बाबतीत विरोधी पक्षाच्या सदस्यांना अधिक माहिती हवी असेल तर ते सभागृहातील वेगवेगळया आयुधांचा वापर करुन अधिक माहिती उपलब्ध करुन घेऊ शकतात. अधिक माहिती मिळण्यासाठी प्रश्नोत्तरे हे एकच आयुध नाही. सन्माननीय सदस्य दुसऱ्या आयुधाचा वापर करुन या विषयाची चर्चा सभागृहात पुन्हा उपस्थित करु शकतात. या विषयाची चर्चा त्यांनी पुन्हा सभागृहात उपस्थित केली तर त्या चर्चेत आम्हाला देखील भाग घेता येईल.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी जो मुद्दा उपस्थित केला, त्या मुद्याला माझी हरकत आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्यांनी अतिशय विव्हळून या ठिकाणी सांगितले की, ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्यात एका दलित महिलेची विवस्त्र धिंड काढली गेली. त्या घटनेसंबंधी आमच्या सन्माननीय सदस्यांना सरकारकडे न्याय मागायला जाता येत नाही, म्हणून सन्माननीय सदस्यांना तो विषय सभागृहात उपस्थित करावा लागतो, एवढे सरकार दुर्लक्ष करते. शासनाच्या दुर्लक्षतेसंबंधी तुम्ही सभागृहात विषय उपस्थित केला त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

उप सभापती : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी नियम 289 अन्वयेच्या सूचनेसंबंधी आपले म्हणणे मांडावे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सभागृहाचा वेळ वाया न जाता प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी म्हणून मी माननीय सभापतींना भेटलो होतो. सभापती महोदय, आपण मला प्रस्ताव मांडण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी आभार मानतो.

सभापती महोदय, या सभागृहात शिक्षण क्षेत्रातील अनेक विषय विविध माध्यमातून उपस्थित केले गेले आहेत. प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना यांच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील अनेक विषय सभागृहात चर्चेला आले आहेत. त्या चर्चेच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी कार्यवाही करण्याची आश्वासने दिलेली आहेत, परंतु त्या आश्वासनांची पूर्तता शासनाकडून अद्यापही झालेली नाही. प्रत्येक वेळी वेगवेगळया आयुधांचा वापर करुन अनेक विषयांवर आम्ही चर्चा उपस्थित करतो. त्या चर्चेच्या अनुषंगाने शासनाकडून आश्वासने दिली जातात. वेगवेगळया विषयांच्या अनुषंगाने प्रश्न निर्माण झाले आहेत, त्यांना शासनाकडून न्याय दिला जात नाही. शासन दरबारी शिक्षण क्षेत्रातील अनेक विषय प्रलंबित आहेत. मुख्याध्यापकांचा वेतनश्रेणीचा प्रश्न प्रलंबित आहे.यासंदर्भात सहा महिन्यापूर्वी न्यायालयाने शासनास निर्देश दिलेले आहेत. परंतु याबाबतीत शासनाने काहीही कार्यवाही केलेली नाही. कायम विना अनुदानितचा "कायम" हा शब्द काढला, मूल्यांकन केले, 2012 मध्ये त्यांना अनुदान देतो असे शासनातर्फे सांगितले गेले. परंतु अद्यापही मूल्यांकनाची प्रक्रिया सुरु झालेली नाही. या राज्यात विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा गंभीर विषय निर्माण झालेला आहे. राज्यातील अनेक विद्यार्थ्यांना त्यांची शिष्यवृत्ती अद्यापही मिळालेली नाही. शिष्यवृत्तीसाठी प्राप्त झालेला निधी राज्य शासनाकडे परत चालला आहे. तुकडयांना मान्यता देण्यासंबंधीचा एक विषय आहे, शाळांना मान्यता देण्याचा विषय आहे, असे शिक्षण क्षेत्रातील वेगवेगळे विषय आहेत. त्या विषयांच्या बाबतीत शासनाकडून आश्वासने दिली गेली आहेत, परंतु त्या आश्वासनांची पूर्तता केलेली नाही, या विषयांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली गेलेली नाही. शिक्षण क्षेत्रातील अतिशय महत्वाचे विषय प्रलंबित आहेत, यासंदर्भात सभागृहात तातडीने चर्चा व्हावी, म्हणून मी नियम 289 अन्वये हा विषय सभागृहात उपस्थित केलेला आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : या विषयाचे महत्व लक्षात घेऊन तसेच सभागृहाच्या कामकाजाची वेळ लक्षात घेऊन या विषयावर 45 मिनिटांची अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्याची संधी सन्माननीय सदस्यांना निश्चितपणे देण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये दिलेली सूचना मी नाकारीत आहे.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा ज्योतीबा फुले व आद्यशिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या दाम्पत्याच्या जीवनकार्यावरील चित्रपट निर्मितीचे काम गेल्या 12 वर्षापासून रेंगाळले आहे. यामुळे हा चित्रपट वनवासात अडकल्याची स्थिती निर्माण झाली आहे. शासनाने सुमारे 12 वर्षापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर बनविलेल्या चित्रपटाला भरघोस यश मिळाले आहे. या चित्रपटाचे अभिनेते मामुटी यांना राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला. त्यानिमित्त डिसेंबर, 2000 मध्ये सरकारतर्फे तत्कालिन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख व उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी दादरच्या चैत्यभूमीवर मामुटीचा सत्कारही केला. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी फुले दाम्पत्यांवर चित्रपट काढण्याची घोषणा केली होती. त्यानुसार शासनाने चित्रपट निर्मितीसाठी पुरेसा निधीही उपलब्ध केला आहे. चित्रपट निर्मितीची जबाबदारी ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्यावर सोपविली आहे. तथापि चित्रपट निर्मितीचे काम रेंगाळले आहे. चित्रपट निर्मितीला साह्य करण्यासाठी शासनाने मार्गदर्शक समितीही नेमली आहे. त्यात बाबा आढाव, हरी नरके असे ज्येष्ठ लोक आहेत. परंतु 12 वर्षात समितीची फक्त एकच बैठक झाली आहे. शासनाने तातडीने चित्रपट निर्मितीचा आढावा घेऊन चित्रपट पूर्ण होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

यानंतर श्री. भोगले....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे असलेल्या 5000 बस थांब्यांपैकी 4750 थांब्यांना शेड नसल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, बसची वाट पाहणाऱ्या हजारो प्रवाशांना रणरणत्या उन्हाच्या झळांचा सामना करावा लागत असणे, पी.एम.पी.एल. अस्तित्वात येऊन पाच वर्षे उलटूनही अद्याप प्रवाशांना द्यावयाच्या मूलभूत सोयी देखील मंडळाने दिलेल्या नसणे, मंडळाचे अधिकारी केवळ शे-पाचशे शेडसाठी सर्वेक्षण झाल्याचे कबूल करीत असणे, एकेरी वाहतुकीमुळे अनेक महत्वाच्या रस्त्यावर असलेले शेड तसेच पडून असल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष पसरलेला असणे, तान्ह्या मुलांसह प्रवास करणाऱ्या माता, गरोदर स्त्रिया, लहान शाळकरी मुले व वृध्दांना होत असलेला कडक उन्हाचा व पावसाचा त्रास लक्षात घेता शासनाने यात तातडीने लक्ष घालण्याची निर्माण झालेली गरज, पुणे महानगर परिवहन मंडळाने अत्यंत तातडीने या बस थांब्यांवर शेड उभारण्याबाबत आपण शासनाला निर्देशित करावे अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महाराष्ट्रामध्ये अनेक नर्सिंग कॉलेजेस आहेत. नर्सिंग कॉलेज कौन्सिल रद्द करण्याची घोषणा वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी विधानसभेमध्ये केली होती. आता एक नवीन घाट घातला जात आहे. नर्सिंग कौन्सिल आणि पॅरा मेडिकल कौन्सिल या दोन कौन्सिलऐवजी आता एकच कौन्सिल बनविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाकडून एक नवीन विधेयक आणण्याचे प्रस्तावित आहे. वास्तविक नर्सिंग कौन्सिल आणि पॅरा मेडिकल कौन्सिल हे दोन्ही प्रांत वेगवेगळे आहेत. पॅरा मेडिकल हा तांत्रिक विषय असून नर्सिंग हा विषय तांत्रिक नाही. या औचित्याच्या मुद्याद्वारे मी माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना विनंती करु इच्छितो की, शासनाने जे विधेयक आणण्याचे प्रस्तावित केले आहे त्याचा फेरविचार करण्यात यावा. भारतामध्ये कुठेही अशी पध्दत नाही. नर्सिंग कौन्सिल आणि चारही पॅरा मेडिकल कौन्सिलचे उपाध्यक्ष आणि अध्यक्षपद वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांकडेच राहणार आहे अशा प्रकारची तरतूद या विधेयकामध्ये प्रस्तावित केली आहे. ही फार गंभीर बाब आहे. माननीय संसदीय कार्यमंत्री यांना विनंती आहे की, अशा प्रकारचे विधेयक सभागृहापुढे येणार असेल तर त्याचा पुनर्विचार करावा.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केली आहे त्या संदर्भात निश्चितपणे संबंधित विभागाचे मंत्री महोदय आणि आपण एकत्र बसून चर्चा करु. त्या चर्चेमध्ये माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्या बद्दल चर्चा करुन योग्य तो मार्ग काढण्याचा प्रयत्न करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, यंदाच्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारामध्ये देऊळ या मराठी सिनेमाने सुवर्णकमळ मिळवून इतिहास निर्माण केला. त्याचबरोबर प्रादेशिक भाषातील "शाळा"नेही गौरव प्राप्त केला. एका मराठी जीवनपटानेही सर्वोत्कृष्ट जीवनपटाचे सुवर्णकमळ जिंकले. विष्णूपंत दामले बोलपटाचा मूकनायक आहे. हे त्या कलाकराचे नाव आहे. असे देदिप्यमान यश मिळविल्याबद्दल राज्य शासनाने यातील कलाकारांचा उचित सन्मान करावा व क्रीडा क्षेत्रातील यशवंतांप्रमाणे त्यांना मोठा पुरस्कार द्यावा.

सभापती महोदय, नुकतेच कबड्डीमध्ये ऑलिम्पिक विजेतेपद मिळविणाऱ्या महाराष्ट्रातील क्रीडापटू महिलांना शासनातर्फे एक-एक कोटी रुपयांचा पुरस्कार देण्यात आला. माननीय सदस्य श्री.भाई जगताप त्या कार्यक्रमाला उपस्थित होते.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.....

या सर्वांचा यथोचित गौरव व्हावा. मला वाटते "शामची आई" या चित्रपटानंतर आता एवढ्या प्रदीर्घ कालावधीनंतर मराठी चित्रपटांना यश मिळाले आहे त्याचा उचित गौरव व्हावा व शासनाने त्यासाठी भरघोस पारितोषिकही द्यावे याकडे शासनाने लक्ष द्यावे, अशी मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, भारतात पहिल्यांदा स्वाईन फ्ल्यू चा रुग्ण सापडल्यानंतर पुन्हा मार्च, 2012 मध्ये पुण्यात स्वाईन फ्ल्यू ची लागण झाल्यामुळे कांता सरोदे यांचा बळी गेलेलाच आहे. ही लागण शालेय मुलांना मोठ्या प्रमाणात झालेली होती आणि राज्य शासनाने पुणे महापालिका तसेच महापालिकांच्या हॉस्पिटल्समध्ये त्यासाठी कोणत्याही सुविधा पुरविलेल्या नाहीत. तसेच स्वाईन फ्ल्यू च्या रुग्णांना ठेवण्यासाठी आवश्यक त्या सुविधा नसल्यामुळे पुण्यातील नायडू हॉस्पिटलमध्ये रुग्णांना फार मोठ्या प्रमाणात त्रास झाला होता. आता विधानसभेचे अधिवेशन चालू असल्याने या निमित्ताने माझी मागणी आहे की, पुणे महापालिकेचे हॉस्पिटल असो अथवा ससून रुग्णालय असो तेथे दाखल करण्यात आलेल्या स्वाईन फ्ल्यू च्या रुग्णांसाठी कोणत्याही सुविधा उपलब्ध नाहीत. आज देखील या ठिकाणी असलेल्या व्हेंटिलेटर्सची संख्या व परिस्थिती पाहिली तर मोठ्या प्रमाणात हवामानात बदल झाल्यामुळे ही लागण इतरांनाही होऊ शकते. याची खबरदारी घेण्याच्या बाबतीत अतिशय जागरुकतेने व तातडीने दखल घेऊन युध्द पातळीवर अशा सुविधा निर्माण कराव्यात यासाठी मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधत आहे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबईत कमी दाबाने होत असलेला पाणीपुरवठा

मु.शी.: मुंबईत कमी दाबाने होत असलेला पाणीपुरवठा यासंबंधी श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईकरांना वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा असल्याचा दावा पालिका प्रशासन करीत असले तरी मुंबईतील अनेक भागांमध्ये आजही कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने रहिवाशांना पाणी मिळत नसणे, मात्र मालाड जलाशयातून रोज 800 टँकर भरले जात असून त्यातून 300 पाण्याचे टँकर परस्पर बाहेर विकले जात असल्याची धक्कादायक माहिती नुकतीच उघडकीस येणे, परिणामी मालाडमधील रहिवाशांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असणे, यामुळे मुंबईकरांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, पाण्याची चोरी रोखण्याची तसेच पाणी विक्री करणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्य मंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : महोदय, मी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे की, मुंबईत जी पाण्याची गळती व चोरी होते ती सुमारे 800 टँकरएवढी होते. तसेच शासनाने निवेदनातून कबूल सुध्दा केले आहे. अशा प्रकारे महापालिकेकडून हजारो कोटीचे नुकसान होत आहे, याला शासन आळा घालणार आहे काय, किंवा त्यासाठी कोणत्या कठोर उपाययोजना करणार आहे ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : महोदय, निवेदनात यासंबंधीची माहिती दिलेली आहे. तसेच दररोज 800 टँकर एवढे पाणी भरले जाते ही गोष्ट खरी नाही. त्याचप्रमाणे मालाड जलाशयातून हे पाणी भरले जाते असे म्हटले आहे ते देखील योग्य नाही. हे टँकर्स महापालिकेच्या एकूण 14 फिलींग पॉईंट्सपैकी लिबर्टी गार्डन या पॉईंटमधून भरले जातात. तसेच हे टँकर भरताना त्याची नोंद वही ठेवलेली असून त्या माध्यमातून महिन्याला किती टँकर पाणी गेले याची माहिती मिळते. त्यानुसार जानेवारी, 2012 ते फेब्रुवारी, 2012 मध्ये एकंदर 393 टँकर्स व 269 खेपा पाणी गेल्याची नोंद आहे. त्यामुळे दररोज 800 टँकर्स पाणी भरले जाते हे म्हणणे खरे नाही. मला हेही सांगणे आवश्यक आहे की, आपण झोपडपट्टीमध्ये नळ जोडण्या दिल्या पण त्या भागात निश्चितपणे पाणीपुरवठा करता येत नाही म्हणून काही काही ठिकाणी अडचणी येतात. परंतु बरेच प्रकल्प आपण हाती घेतलेले असून ते पूर्ण झाल्यानंतर ही परिस्थिती सुधारेल.

श्री. भाई जगताप : महोदय, या प्रश्नाला माननीय मुख्यमंत्र्यांनी न्याय देण्याचा प्रयत्न जरुर केलेला आहे. पण मी एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, ज्या गोष्टींची आपण नोंद घेतो त्या ठिकाणी टँकर माफिया येथून पाणी भरुन नेतात व मधल्या मध्ये काही टँकर गायब केले जातात असाही उल्लेख त्यात आहे. त्याचे उत्तर अपेक्षित आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

सभापती महोदय, मुंबईतील हिल एरिया म्हणजे मालाड, अंधेरी, जोगेश्वरी तसेच सायनमध्ये टँकरने पाणी पुरवठा केला जातो. परंतु जेवढया टँकरने पाणीपुरवठा केल्याचे दाखविले जाते, तेवढया टँकरने प्रत्यक्षात पाणी पुरवठा केलाच जात नाही. त्यामुळे ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध करुन दिले जाते त्या ठिकाणी टँकरची नोंद केली जाते काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, ऊंच भागात पाणी योग्य पध्दतीने पोहचत नसल्यामुळे ऊंच भागासाठी टँकरने पाणी पुरवठा केला जातो. टँकरने पाणी पुरवठा केला जात असतांना नोंद वही ठेवली जाते परंतु तरी सुध्दा काही ठिकाणी अशा प्रकारे अपप्रकार घडत असतात. या ठिकाणी 800 टँकर रोज भरले जातात, अशी माहिती देण्यात आलेली आहे परंतु ही माहिती बरोबर आहे, असे मला वाटत नाही. पाणी पुरवठयाच्या संदर्भात नवीन प्रकल्प हाती घेण्यात आलेले असून या प्रकल्पांची कामे पूर्ण झाल्यानंतर पाणी पुरवठा सुरळीत होऊ शकेल. काही ठिकाणी मोठया पाईप लाईन्स टाकावयाच्या आहेत परंतु त्या ठिकाणी वन खात्याच्या काही अडचणी असून त्या अडचणी सुध्दा सोडविण्याचा प्रयत्न सुरु आहे. विशेषत: मालाड, पूर्व येथील क्रांतीनगर येथे अगोदर सहा इंचाची लाईन होती ती आता 12 इंचाची करण्यात आली असून ती पाईपलाईन 24 इंच करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. या करिता वन खात्याची मंजुरी मिळाल्यानंतर सदर काम वर्षभरातच पूर्ण होऊ शकेल.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य भाई जगताप यांनी टँकरने पाणी पुरवठा केला जातो त्याची नोंद ठेवली जाणार आहे काय असा जो प्रश्न विचारला आहे. त्याप्रमाणे त्याची निश्चितपणे नोंद ठेवण्याची व्यवस्था केली जाईल.

श्री.किरण पावस्कर : सभापती महोदय, मुंबईमध्ये पाण्याची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. मुंबईमध्ये प्रती माणसी 90 लिटर पाणी उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे परंतु प्रत्यक्षात 45 लिटरच पाणी उपलब्ध करुन दिले जात आहे. मुंबईतील पाण्याच्या समस्येबाबत सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. जलवाहिन्या व पाणी गळती रोखण्यासाठी 750 कोटी रुपयांचा प्रस्ताव पास झाला व हे सर्व पैसे खर्च देखील करण्यात आले आहेत. परंतु या पैशांचा फायदा जास्तीत जास्त ठेकेदारांनाच झालेला आहे. परफेक्ट इंजिनिअर, मदाने, भारत कन्स्ट्रक्शन्स

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

यांनी कामे केलेली आहेत परंतु ही कामे पूर्णत्वास गेलेली नसतांना सुध्दा पैसा खर्च झालेला आहे. त्यामुळे संबंधितांवर ठोस कारवाई केली जाणार आहे काय ? सन 2008 मध्ये स्वयंचलित जलमापके बसविण्याचा 950 कोटी रुपयांचा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये मंजूर झाला होता. नवी मुंबईमध्ये हेच इलेक्ट्रॉनिक्स मीटर अडीच हजार रुपयाने लावले गेले परंतु मुंबई महानगरपालिकेने याच मीटरची किंमत 12 हजार रुपये लावली आहे. पाणी पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी जलवाहिनी रिपेअरिंग, पाणी गळती यासाठी 750 कोटी रुपये तसेच इलेक्ट्रॉनिक्स मीटर बसविण्यासाठी 850 कोटी रुपये खर्च झालेले आहेत परंतु यामध्ये होत असलेला भ्रष्टाचार वारंवार निदर्शनास आणूनही कारवाई झालेली नाही. त्यामुळे शासन याबाबत कठोर कारवाई करणार आहे काय ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, विशेषत: नागरी भागात पाण्याची गंभीर समस्या आहे, ही वस्तुस्थिती आहे. पाण्याचा साठा वर्षभर पुरेल की, नाही ही प्रथम एक मोठी गंभीर समस्या आहे. यानंतरची समस्या पाण्याचे वितरण करतांना जलवाहिन्यातून लिकेज किती होते, किती पाण्याची चोरी होते, तसेच पाण्याची गळती कोठून होते हे शोधणे ही आहे. या करिता आपल्याला प्रयत्न करावा लागणार आहे. पुरवठा केलेल्या पाण्याची वसुली शासनाला करावी लागते. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी ऑटोमॅटीक इलेक्ट्रॉनिक्स मीटरच्या किमतीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. वेगवेगळया कंपन्यांनी वेगवेगळे मीटर लावलेले आहेत. स्वयंचलित मीटरची तपासणी प्रत्यक्ष ठिकाणावर न जाता देखील करता येते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

कोणकोणत्या कंपन्यांचे मीटर आहेत यासंबंधीची संपूर्ण माहिती शासनाच्या वतीने घेणे सुरू आहे. इलेक्ट्रॉनिक मीटरच्या किंमतीमध्ये बऱ्याच तफावती आढळत आहेत. त्या कशामुळे आहेत हे तपासून पाहण्यात येईल. याबाबत रेट कॉन्ट्रक्ट करता येईल काय, कंपनी ठरविता येईल काय, या बद्दल देखील विचार सुरू आहे. महानगरपालिका आपापल्या पद्धतीने टेंडर काढत असते. किंमतीच्या तफावतीबद्दल किंवा टेंडरच्या गैरप्रकारासंबंधी ठोस माहिती दिली तर त्याची निश्चितपणे चौकशी करता येईल. स्वयंचलित जलमापके बसविण्यासंबंधीची निविदा प्रक्रिया आहे. त्यामध्ये कोणाकडून मीटर घ्यायचे हे निश्चित केले आहे. एकूण 1 लाख 30 हजार मीटर्स पैकी साडेसहा हजार मीटर्स बसविण्यात आले आहेत. किंमती बद्दल जर आपण मला ठोस माहिती दिली तर निश्चितपणे त्यासंबंधी पुढची कारवाई करता येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, लक्षवेधीचा रोख वेगळा आहे. महानगरपालिकेचे अधिकारी, टँकर माफियांना हाताशी धरून भ्रष्टाचार करीत आहे अशा प्रकारचा लक्षवेधीचा रोख आहे. बाकीचे पेरिफेरियल प्रश्न तर आहेतच. फिलिंग पॉईंटवर टँकर भरला जातो पण त्या भागांना पाणीच पुरवठा होत नाही, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे ही बाब गंभीर आहे. तेव्हा या प्रकाराची चौकशी शासन करणार आहे काय ? मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी, टँकर माफिया आणि मुंबई महानगरपलिकेचे प्रशासन एकत्र मिळून अशा प्रकारे गोरख धंदा करीत आहेत. त्यांना आळा घालण्यासंबंधातील ही लक्षवेधी सूचना आहे. तेव्हा या बाबत शासनाने चौकशी करावी. तसेच किती टँकर भरले जातात, किती ठिकाणी रिकामे केले जातात, कोणत्या भागांमध्ये पाणी दिले जाते, या संबंधातील पूर्ण माहिती सभागृहापुढे येईल काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचा मूळ रोख टँकर माफियांचा बिमोड कसा करता येईल, तसेच जे अपप्रकार चालले आहेत, त्याबद्दल आहे. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. याबाबत मी फक्त दोनच गोष्टी सांगू इच्छितो. फिलिंग पॉईंटवर टँकर भरले जातात. फिलिंग पॉईंटचे टँकर सहकारी गृहनिर्माण सोसायटीच्या लेखी मागणीवरूनच दिले जातात. मागणी आल्यानंतर त्यांच्या विनंती नुसार टँकर भरून दिला जातो. साधारणपणे टँकर

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

त्याच गृहनिर्माण सोसायटीकडे जात असेल. कारण त्यांचे लेखी पत्र असते. सोसायटीच्या लेखी मागणी नुसारच टँकर दिले जातात. चुकीच्या पद्धतीने कोणी टँकर दिले असतील तर त्याची तक्रार करावी लागले. फिलिंग पॉईंटवर नोंद वही ठेवली आहे. सरासरी दहा टँकर दिले जातात. 800 टँकर भरले जात नाहीत हे आकडेवारीनुसार दिसून येते. या शिवाय मी दुसरी माहिती देखील देऊ इच्छितो. मुंबईमध्ये अधिकृत फिलिंग पॉईंटवर टँकर भरले जातात. त्याच प्रमाणे काही टँकर्स हे खाजगी विहिरींवर भरले जातात. अशा खाजगी विहिरींवर महानगरपालिकेचे काहीही नियंत्रण नाही. खाजगी विहिरीतून पाणी भरून विकण्याचा धंदाच सुरू झालेला आहे. यावर वेगळ्या पद्धतीने विचार करावा लागेल. महानगरपालिकेचे नियंत्रण हे फक्त अधिकृत फिलिंग पॉईंटवर भरणाऱ्या टँकरवर असून त्याची नोंद देखील घेतली जाते. त्यामुळे ते टँकर संबंधित गृहनिर्माण सोसायटीकडेच जातात. पण तसे ते पोहोचले नसतील तर किंवा ते पत्र फोर्जरी आहे किंवा नाही ही देखील शक्यता पडताळून पहावी लागेल. त्या गृहनिर्माण सहकारी सोसायटीने मागणी न करता त्यांच्या पत्रावर टँकर दिला असेल तर त्यासंबंधी ठोस पुरावा दिला तर पुढील योग्य त्या सूचना देणे शक्य होईल. मालाडच्या फिलिंग सेंटरमधून सरासरी दहा टँकर दिले जातात.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी सर्वांना प्रश्न विचारण्याची संधी देईन. सर्वांनी एकाच वेळी हात वर करून माझ्यावर प्रेशर आणू नये. मी पाणी पाजे पर्यंत सर्वांना बोलण्याची संधी देईन.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, ज्या गतीने मुंबईची वाढ आणि नागरीकरण होत आहे त्यानुसार जलसाठे वाढवायला पाहिजे असे शासनाने मध्यंतरीच्या काळात जाहीर केल्याचे माझ्या वाचनात आले होते.

यानंतर सौ.रणदिवे....

असुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

हे जलसाठे मुंबईच्या आजूबाजूच्या जिल्ह्यामध्ये होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना लागणारे पाणी नागरीकरणासाठी वापरले जाते. या सदनामध्ये अनेक वेळेला माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी सांगितले की, कोयना वीज प्रकल्पातून बाहेर पडणारे पाणी जे समुद्रात सोडले जाते ते पाणी मुंबईमध्ये आणण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय? जेणेकरुन शेतकऱ्यांची जमीनही वाचेल आणि खर्चही कमी होईल. 1 कि.मी.लाईन टाकण्यासाठी अडीच कोटी रुपये खर्च येतो.मुंबईपासून चिपळूण केवळ 150 कि.मी.अंतरावर आहे. त्यामुळे कमी खर्चामध्ये हे पाणी मुंबईमध्ये आणण्याची योजना राज्य शासन करील काय आणि मुंबईतील पाण्याचा प्रश्न सोडविणार आहे काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मला असे वाटते की, अनेक वर्षापासून या योजनेच्या बाबतीत चर्चा सुरु आहे. सकृतदर्शनी एका खाजगी कंपनीने काही प्रेझेन्टेशन्स् दिलेली आहेत, ती मी देखील पाहिली आहेत.परंतु या योजनेचा खर्च इतका कमी आहे म्हणजे आपण 150 x 2II किंवा 150 x 3 असे जरी गणित केले तरी 400 ते 450 कोटी रुपयांचा हा विषय नाही. मी जे प्रेझेन्टेशन पाहिलेले आहे त्यामध्ये 35 हजार कोटी रुपयांची योजना सादर करण्यात आली. कारण खालच्या भागातून पाणी वर उचलावयाचे आहे आणि मग तेथे जर डोंगर असतील किंवा बोगदे करावयाचे असतील तर हे काम खूप मोठे आहे. अर्थात याबाबतीत अधिकृत काही माहिती आलेली नाही. फक्त एका खाजगी कंपनीने प्रेझेन्टेशन दिलेले आहे.अर्थात जर पाणी नसलेच तर हा पर्याय वापरावा लागेल. परंतु आता हा स्वस्त किंवा सोपा पर्याय आहे असे बिलकूल नाही. त्यामुळे याबाबतीत तज्ज्ञांकडून आणखी माहिती घेऊन किंवा कोणी कमी किंमतीमध्ये काम करुन देणार असतील आणि त्याबाबत सन्माननीय सदस्यांकडे माहिती असेल तर त्याबाबत निश्चितपणे विचार करता येईल. परंतु आता तरी हे व्यवहारिक आहे असे वाटत नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, याठिकाणी माझे दोन प्रश्न आहेत.मुंबईतील टँकरसंबंधात विषय उपस्थित झालेला आहे. मुंबई महानगरपालिका ही अशिया खंडातील सर्वात मोठी महानगरपालिका आहे. मुंबईमधून सालाना जवळजवळ 1 लाख 40 हजार कोटी रुपयांचा महसूल केंद्र शासनाकडे जमा होत असतो म्हणजे आपल्या पैशातून संबंध देशातील भागाचा विकास करण्यासाठी त्याचा वापर केला जातो. म्हणून मुंबईतील पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी त्यातले 25 टक्के पैसे मुंबईच्या विकासासाठी देण्याच्या दृष्टीने राज्य शासन केंद्र शासनाकडे आग्रह धरणार आहे काय ? हा माझा पहिला प्रश्न आहे. तसेच माझा दुसरा प्रश्न असा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

आहे की,मुंबईमध्ये दरदिवशी मोठ्या प्रमाणात बाहेरुन परप्रांतीयांचे लोंढे येत आहेत.सध्या आपल्या कडे जी ब्रिटीशकालीन पाणी पुरवठ्याची योजना आहे, ती फक्त 30 लाख लोकांसाठी करण्यात आली होती. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आज मुंबईतील लोकसंख्या जवळजवळ दीड कोटी पर्यंत पोहोचलेली आहे.जर आपण मुंबईमध्ये येणारे लोंढे थांबविले असते तर सभागृहामध्ये टँकरच्या संबंधातील विषय देखील उपस्थित झाला नसता. सभापती महोदय, आपणामार्फत मला शासनाला विनंती करावयाची आहे. खरे म्हणजे या सदनामध्ये अगोदरही माननीय मुख्यमंत्र्यांनी, माननीय गृह मंत्र्यांनी आश्वासित केलेले आहे, घोषणा केलेल्या आहेत की, एखाद्या वॉर्डमध्ये एक जरी झोपडी बांधली गेली तरी तेथील वॉर्ड ऑफीसरला सस्पेंड केले जाईल, तेथील इन्स्पेक्टरला देखील सस्पेंड केले जाईल आणि आम्ही झोपड्या पाडण्यासाठी महानगरपालिकेच्या ताब्यामध्ये 200 पोलीस देऊ. पण प्रत्यक्षात तसे अजिबात झालेले नाही, पोलीस देण्यात आलेले नाही. याठिकाणी फक्त घोषणा केल्या जातात. म्हणून सरकारच महानगरपालिकेला फसवित आहे. मुंबईच्या जनतेला त्रास देण्यासाठी किंवा त्यांना अडचणीमध्ये टाकण्याचे काम सरकार करीत आहे.

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : याठिकाणी लक्षवेधी सूचनेवर चर्चा करण्यात येत आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ही चर्चा नाही तर हा महत्वाचा प्रश्न आहे. मुंबई महानगरपालिकेच्या दृष्टीने पाण्याचा महत्वाचा विषय आहे.तसेच याठिकाणी टँकरच्या संबंधात विषय का उपस्थित झाला तर मुंबईतील वाढती लोकसंख्या हे त्याचे कारण आहे आणि याठिकाणी लोकसंख्या का वाढत आहे तर सभागृहामध्ये आश्वासन देऊन देखील आपल्याच आश्वासनाला हरताळ फासण्याचे आणि मुंबईकरांना वेठीस धरण्याचे काम हे शासन करीत आहे. अगोदर या सरकारने येथील झोपड्या पाडण्यासाठी महानगरपालिकेला 200 पोलीस देऊ असे सदनामध्ये आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे शासन ताबडतोब या आश्वासनाची पूर्तता करणार आहे काय? हा पहिला मुद्दा आहे.ज्याप्रमाणे दिल्लीमध्ये तेथील माननीय मुख्यमंत्री श्रीमती शीला दीक्षित यांनी विशेष मोहीम राबविली होती,त्याप्रमाणे याठिकाणी बाहेरुन येणारे लोंढे थांबविण्यासाठी विशेष मोहीम राबविणार आहात काय? तसेच शासन याठिकाणी बाहेरुन येणाऱ्या प्रत्येक माणसांना आयडेन्टीटी कार्ड देणार आहात काय? यादृष्टीने योजना आखणार आहात काय? परप्रांतातून येणारे लोंढे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

थांबविण्यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात? जेणेकरुन याठिकाणी टँकर व्दारे पाणी पुरवठा करण्याची स्थिती निर्माण होणार नाही आणि मग अशा प्रकारचे प्रश्न निर्माण होणार नाहीत यासाठी शासन काय करणार आहे ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, याठिकाणी आमच्या महत्वाच्या प्रश्नाला फाटा देण्याचा प्रयत्न केला जात आहे काय ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, याठिकाणी विषयांतर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याचे कारण काय आहे ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

उप सभापती : याठिकाणी उपस्थित करण्यात आलेला प्रश्न गंभीर स्वरुपाचा आहे असे जर आपल्या सर्वांना वाटत असेल तर व सन्माननीय सदस्यांनी विचारलेला सदरहू प्रश्न आता गैरलागू होत असेल तर त्याला उत्तर द्यावयाचे की नाही याबाबत माननीय मुख्यमंत्री ठरवतील.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती...

सन्माननीय सदस्यांनी सभागृहात गदारोळ करु नये. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याचे योग्य ते उत्तर माननीय मुख्यमंत्री देतील. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मुंबईचा पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर आहे. मुंबईपुढे अनेक समस्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी प्रश्नाचे स्वरुपच बदलून टाकले आहे. टँकर, टँकर माफिया, पाण्याची उपलब्धता हा मूळ प्रश्न होता. त्यातून स्लम्स, मुंबईची लोकसंख्या किती आहे, किती लोकसंख्या वाढत आहे वगैरे बरेच प्रश्न विचारलेले आहेत. मला पुन्हा पाण्याच्या प्रश्नावर यावयाचे आहे. बाकीच्या प्रश्नाच्या बाबतीत जी चुकीची माहिती दिलेली आहे त्याबाबतीतही मी अधिकृतपणे सांगू इच्छितो. सन 1991 मध्ये मुंबईची लोकसंख्या 1.19 कोटी होती. सन 2011 मध्ये 1.25 कोटी झाली म्हणजे दशवर्षीय वाढ ही 4.5 आहे. ही वस्तुस्थिती आहे ती मी या ठिकाणी सांगितलेली आहे. मी पुन्हा पाण्याच्या प्रश्नाकडे येतो.

सभापती महोदय, मुंबईसाठी पाण्याचा साठा कायम स्वरुपी होईल की नाही, पाण्याची वितरण व्यवस्था कशी होईल, मिटरने पाणी पुरवठा करावयाचा की ऑटोमॅटिक मिटरने पाणी पुरवठा करावयाचा हे तीन मोठे विषय आहेत. यातील महत्वाच्या विषयाकडे मी वळतो. कायमस्वरुपी पाण्याचे स्त्रोत निर्माण करण्याकरिता मध्य वैतरणा प्रकल्प डिसेंबर, 2012 पर्यंत पूर्ण होईल आणि त्यातून 455 एमएलडी पाण्याची उपलब्धता वाढेल. दमनगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्पाच्या बाबतीत शासनाने श्री. माधव चितळे समिती नेमली होती. या प्रकल्पातून भरपूर पाणी मिळण्याची शक्यता आहे. जवळ जवळ 2451 एमएलडी पाणी या दमनगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्पातून मिळण्याची शक्यता आहे. या प्रकल्पाला एक राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करावे कारण मुंबई ही केवळ महाराष्ट्राचीच राजधानी नाही तर देशाच्या राजधानीलासुध्दा मुंबईतून कराच्या रुपाने पैसे दिले जातात. दमनगंगा पिंजाळ प्रकल्प हा नदीजोड प्रकल्प आहे. यातून 2451 एमएलडी पाण्याची उपलब्धता वाढेल म्हणून या प्रकल्पाला राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करुन लेव्हल लिंकिंग प्रोजेक्टला मान्यता द्यावी या करिता माझे प्रयत्न चाललेले आहेत. त्या दृष्टीने मी माननीय पंतप्रधान याना पत्र लिहिलेले आहे आणि या बाबतचे प्रस्तुतीकरणही केलेले आहे. टँकर माफिया, पाण्याची उपलब्धता याबाबतीत काय करावयास पाहिजे याचा विचार केला पाहिजे. या शिवाय इतर प्रश्न देखील महत्वाचे आहेत. ..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सभागृहासमोर असलेला विषय पाण्याच्या टँकरचा असून परप्रांतीयाचा नाही हे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे त्या बाबतीतील काही गोष्टी मला त्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत. टँकरची आवश्यकता नसताना, टँकरची मागणी वाढावी आणि त्यातून भ्रष्टाचार व्हावा अशा प्रकाचे काम गेल्या अनेक वर्षापासून सुरु आहे. अप्पापाडा या ठिकाणी वन विभागाची परवानगी घेण्यात येत आहे असे माननीय मुख्यमंत्री यांनी सांगितले आहे. पण गेल्या बारा वर्षापासून आम्ही हेच उत्तर ऐकत आहोत. मालाड विभागातील ज्या अप्पापाड्याचा उल्लेख केलेला आहे तेथे महानगरपालिकेची रिझरवायरची 44 एकर जमीन आहे. त्या जमिनीचा वन विभागाशी काहीही संबंध नसताना तेथे पाणी माफिये मोठया प्रमाणात वाढलेले आहेत. त्या ठिकाणी जर अधिकृत कनेक्शन दिले तर या पाणी माफियांचे अनधिकृत धंदे बंद होतील. प्रशासन या प्रश्नाचे अशाच प्रकारचे लेखी उत्तर देत असते त्यामुळे त्या जमिनीची मोजणी करण्यात यावी अशी आम्ही अनेक वर्षापासून मागणी केलेली आहे पण अद्याप त्या जमिनीची मोजणी केलेली नाही. फक्त मालाड एरियातच नाही तर मुंबईत सगळीकडे पार्ल्यामध्येसुध्दा खाजगी विहिरींमधून दहा-दहा टँकरने पाणी उपसले जात आहे. मला या ठिकाणी एवढेच विचारावयाचे आहे की, मुंबईमध्ये टँकर लॉबीचे मोठे नेटवर्क आहे. त्याला महापालिकेची साथ असल्याशिवाय हे होऊ शकत नाही तेव्हा यावर ताबडतोब बंदी घालावी अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ....

अधिकृत कनेक्शन देण्याची पध्दत सोपी असावी जेणेकरुन लोकांना अधिकृत कनेक्शन मिळू शकतील.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, आप्पापाडा, क्रांती नगर प्रकल्पाचा मी उल्लेख केला होता. त्यामध्ये 6 इंच व्यासाची जी जलवाहिनी आहे ती 12 इंच व्यासाची करण्यात आली आहे. परंतु आता ती 12 इंची जलवाहिनी 24 इंची करण्याचे जे प्रपोजल आहे ते काम करावयाचे आहे. त्याकरिता मात्र वन खात्याची मंजुरी पाहिजे. ती मंजुरी 7-8 महिन्यात मिळेल अशी माहिती मला मिळालेली आहे. परंतु टँकर माफियांच्या विरोधात मोहीम उघडण्यामध्ये पहिल्यांदा पाण्याची उपलब्धता हा मुख्य प्रश्न आहे. जर पाण्याची उपलब्धता नसेल आणि पाईपलाईनमधून पाणी पुरवठा करण्यामध्ये अपयश येत असेल तर टँकरचा जो प्रश्न आहे तो राहणारच आहे. टँकरच्या प्रश्नाबरोबरच महानगरपालिकेने देखील योग्य व्यवस्था करुन हे मोडून काढले पाहिजे. शासन त्यांना कोणत्याही प्रकारची मदत करील परंतु शासनाची यामध्ये अशी भूमिका आहे की, पाण्याची उपलब्धता झाली पाहिजे. पाईप फोडण्याचे प्रकार होतात त्यातून अनधिकृतपणे पाणी काढून मग टँकर भरले जातात. जे टँकर भरले जातात ते खाजगी विहिरीतून, फिलींग पॉइन्ट्सवरुन भरले जातात. पाईप फोडून सुध्दा टँकर भरले जातात हाही मोठा काळा धंदा आहे. यामध्ये बऱ्याच ठिकाणी कोठे संगनमत आहे का, अधिकाऱ्यांच्या संगनमताने हे होते का हेही पाहणे गरजेचे आहे. यामध्ये दोन गोष्टींच्या बाबतीत आपण लक्ष घातले पाहिजे असे मला वाटते. पाण्याची उपलब्धता वाढविली पाहिजे. ज्या ज्या ठिकाणी दुरुस्तीचे काम आहे ते योग्य प्रकारे झाले पाहिजे. ज्या निविदा आहेत त्यामध्ये टँकरचा धंदा चालावा म्हणून मुद्दाम जाणुनबुजून उशीर करण्याचा प्रयत्न चालला असेल. म्हणून पाण्याची उपलब्धता वाढविण्याचा शासनाचा प्रयत्न असेल. त्या दृष्टीने प्रकल्प हाती घेत आहोत. मूळ लक्षवेधी सूचना मालाड येथे किती अनधिकृत टँकरन पाणी मिळते या बाबतची आहे. त्या बाबतीत सविस्तरपणे उत्तर देण्यात आलेले आहे. टँकरमुक्त करण्याकरिता पाण्याची उपलब्धता वाढविणे हा महत्वाचा विषय आहे. महानगरपालिकेने सुध्दा पाण्याची जी चोरी होते ती थांबविली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, एकविसाव्या शतकामध्ये मुंबई शहराला टँकरची गरज लागते ही गोष्ट भूषणावह नाही. माननीय मुख्यमंत्र्यांना माझा एकच प्रश्न आहे की, टँकरने पाणी पुरवठा करण्याचा जो धंदा आहे त्यामध्ये ज्या पध्दतीचे टँकर वापरले जातात, त्या टँकरची क्वालिटी या सर्व गोष्टी आणि या धंद्याचे शासन योग्य प्रकारे नियमन करणार का, त्याचे लायसन्सींग करणार काय ? त्यांनी पाण्याचे किती पैसे घ्यावेत, टँकरचे किती पैसे घ्यावेत, किलोमीटरप्रमाणे किती पैसे घ्यावेत, ही सर्व बंधने त्यांच्यावर घालणार का ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, खरे म्हणजे मुंबईला आणि महाराष्ट्राला टँकर मुक्त केले पाहिजे हा आपला मूलभूत प्रश्न असला पाहिजे. दुष्काळामुळे ग्रामीण भागामध्ये टँकरची गरज आहे. तो प्रश्न वेगळा आहे. आज मुंबईमध्ये तीन-चार स्तरावर यासाठी प्रयत्न करावे लागतील असे मी सांगितले. एका बाजूला पाण्याची उपलब्धता वाढविणे हा एक भाग आहे. महानगरपालिकेच्या अखत्यारित जे विषय आहेत त्यामध्ये पाईपलाईनची योग्य ती देखभाल करणे, गळती होणार नाही याची काळजी घेणे हे त्यांचे काम आहे. मुद्दाम संगनमताने काही ठिकाणी गळती करुन टँकर भरले जातात ते थांबविण्यासाठी शासनाची किंवा पोलीस यंत्रणेची जी काही मदत लागेल ती देण्यास शासन तयार आहे. परंतु अशा प्रकारे ज्या ज्या ठिकाणी गैरप्रकार चालले आहेत ते मोडून काढले पाहिजेत. त्या ठिकाणी महानगरपालिका आणि शासनाने मिळून हे प्रकार रोखले पाहिजेत. आमच्याकडे अशा गैरप्रकारांची काही प्रकरणे आली तर निश्चितपणे त्या बाबतीत कारवाई करु. नियमन करणे हा तात्पुरता उपाय आहे परंतु टँकरमुक्त करण्याकरिता आपण प्रयत्न केला पाहिजे. शासकीय यंत्रणेतून जे टँकर दिले जातात त्यांचे दर किती असावेत ही बाब नियंत्रित आहे परंतु जे टँकर खाजगी विहिरीतून किंवा चोऱ्या करुन भरले जातात त्यांचे नियमन कसे करावयाचे या बाबतीत प्रयत्न करावे लागतील.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबई टँकरमुक्त करण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या संकल्पनेबाबत मी त्यांना धन्यवाद देतो. मी दादरला राहतो त्या भागातील रस्त्यावर टँकर्स उभे असतात. मी त्या रस्त्यावरुन चालत असताना एका माणसाने मला थांबवून असे सांगितले की, आपण आमदार आहात, रस्त्यावर टँकर्स उभे असल्यामुळे आम्हाला चालताना अडचण होते ती आपल्याला दिसत नाही काय ? हे टँकरवाले रस्त्यावर पाईप टाकून टँकरमध्ये पाणी भरत असतात. त्याबाबत मी महापालिकेकडे व पोलिसांकडे तक्रार केली होती. माझ्या तक्रारीनंतर वाहतूक पोलिसांनी मला दिलेले उत्तर महत्वाचे आहे. रस्त्यावर टँकर उभा केल्यास फक्त 150 रुपये दंड भरावा लागतो. परंतु हे टँकरवाले दिवसातून 10 वेळा दंड भरण्यास तयार होतात असे मला आरटीओ कार्यालयातील इनचार्जने उत्तर दिले आहे. एका टँकरसाठी टँकर मालकांना 2 ते 3 हजार रुपये मिळतात. याला आळा बसण्यासाठी दंडाच्या रकमेमध्ये जास्त वाढ केली पाहिजे. त्यामुळे ते रस्त्यावर टँकर थांबविणार नाहीत. हे बंद करण्यासाठी विधेयक आणून दंडाच्या रकमेत वाढ केली जाईल काय ? मी नगरसेवक असताना याबाबत मी तक्रार केली होती. त्यावेळी माझ्या गाडीवर टँकर घालून मला मारण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. तरीही मी काही करु शकलो नाही. मी गप्प बसलो. पण आता टँकरची लॉबी हाताळणारे लोक मंत्रिमंडळामध्ये आहेत. त्यांच्याबाबत मुख्यमंत्री महोदय, आपणही काही करु शकणार नाही हे मला माहीत आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, गोल्ड स्पॉट कंपनीला पेय बनविण्यासाठी महानगरपालिकेने पाणी दिले होते. ती कंपनी नंतर बंद झाली. परंतु ही कंपनी महानगरपालिकेचे पाणी घेऊन ते 'बिसलेरी' या नावाने तयार करुन ते तिप्पट किंमतीने विकत आहे. आपण करोडो रुपये खर्च करुन मुंबईत पाणी आणतो. व्यावसायिकांना व्यवसाय करण्यासाठी पाणी देतो. म्हणजे हॉटेलमध्ये पदार्थ तयार करण्यासाठी त्यांना पाणी दिले जाते. परंतु गोल्ड स्पॉट कंपनीला हे पेय तयार करण्यासाठी दिलेले पाणी ते पेय न बनविता

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

बिसलेरी नावाने तयार करुन ते तिप्पट किंमतीला विकत आहे. म्हणजे मुंबई शहराचे हक्काचे पाणी ते दाम दुपटीने विकत आहेत. हे पाणी मूळ कारणासाठी वापरले जात नसल्यामुळे या कंपनीविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.भाई जगताप : महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रश्न शासनाला कशासाठी विचारले जात आहेत ? (अडथळा)

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी रस्त्यावर उभ्या केल्या जाणाऱ्या टँकर्सच्या दंडाच्या रकमेमध्ये वाढ करण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करावी अशी सूचना केलेली आहे. त्याबाबत शासन निश्चितपणे विचार करुन योग्य ती कार्यवाही करील.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

पृ. शी. : मूळगाव, ता.पाटण येथे महिलेला बेदम मारहाण करुन तिची विवस्त्र धिंड काढणे

मु. शी. :मूळगाव, ता.पाटण येथे महिलेला बेदम मारहाण करुन तिची विवस्त्र धिंड काढणे यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, जयवंतराव जाधव, सतीश चव्हाण, अनिल भोसले , हेमंत टकले, विक्रम काळे , ॲड. उषा दराडे, सर्वश्री रमेश शेंडगे, अरुण गुजराथी, डॉ.नीलम गोऱ्हे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सातारा जिल्ह्यातील मूळगांव ता.पाटण येथे दिनांक 10 जानेवारी, 2012 वा त्या सुमारास एका दलित महिलेस विवस्त्र करुन केलेली मारहाण, भरदिवसा त्या महिलेला गावातील चिंचेच्या झाडाला बांधून ठेवणे, महिलेने स्वत:ची सुटका करुन घेऊन पाटण पोलिसात तक्रार करताना पोलिसांनी प्रथम तिची तक्रार नोंदवून न घेणे, चालढकल करणे, नंतर अदखलपात्र गुन्हा नोंदवणे, त्या महिलेस अपमानास्पद वागणूक देणे, तसेच या प्रकरणांवर पडदा टाकणे, यावरुन महाराष्ट्रातील पोलीस यंत्रणा कुचकामी असल्याचे निदर्शनास येणे, अशा घटनांमुळे समाजात जातीय तेढ (वाद) निर्माण होणे, यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये पोलिसांविषयी व दोषीविषयी पसरलेले भितीचे वातावरण, या घटनेला जबाबदार असणाऱ्या दोषींवर तसेच संबंधित पोलिसांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया व केलेली वा करावयाची कारवाई"

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, एका अतिशय भीषण घटनेसंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. पाण्याच्या विषयावरील लक्षवेधीला आपण एक तास वेळ दिलेला आहे. परंतु या लक्षवेधीतील विषय अस्तित्वाचाच असल्यामुळे या लक्षवेधीला आपण अधिक वेळ द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो. आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये आठव्या क्रमांकावर या विषयाचा तारांकित प्रश्न होता. तो प्रश्न जवळजवळ 35 सन्माननीय सदस्यांनी विचारलेला होता. परंतु तो चर्चेसाठी येऊ शकला नाही. पाटण तालुक्यातील मौजे मूळगाव येथील मातंग वस्तीतील ही पीडित महिला आहे, तिच्या मुलाने गावातील मुलीबरोबर पळून लग्न केल्यानंतर बाकीच्या समाजातील लोकांनी तो मुलगा व मुलगी न सापडल्यामुळे या महिलेला विवस्त्र करुन तिची गावात धिंड काढली. त्यामुळे ती महिला पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यासाठी गेली होती. ही घटना भीषण असतानाही पोलिसांनी हा गुन्हा अदखलपात्र म्हणून नोंदविला. शासनाने लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "संबंधित पोलीस स्टेशनच्या त्या पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे." एक महिन्यापूर्वी त्या मुलाने त्या गावातील मुलीला पळविले होते.

यानंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

दलित महिलेच्या मुलाने त्या गावातील मुलीला पळविले. त्याबाबतीत मिसींगची नोंद पोलीस स्टेशनमध्ये झाली होती. या घटनेचे स्वरुप एका भीषण घटनेमध्ये होऊ नये यादृष्टीने त्या पोलीस स्टेशनने दखल का घेतली नाही ? त्या महिलेचा गुन्हा अदखलपात्र म्हणून नोंदविला गेला. ज्या अधिकाऱ्याने अशा प्रकारचा गुन्हा नोंदवून घेतला, त्या अधिकाऱ्याविरुध्द शासनाने अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही, त्यांना अद्यापपर्यंत निलंबित देखील करण्यात आलेले नाही. जोपर्यंत ते अधिकारी तेथे राहतील, तोपर्यंत या प्रकरणी न्याय मिळणार नाही. या प्रकरणी अदखलपात्र गुन्हा नोंदवून घेणारे जेवढे अधिकारी आहेत, त्यांना निलंबित करण्यात येईल काय ? सातारा जिल्हयात गेल्या महिन्याभरात अशा प्रकारच्या तीन मोठया घटना घडलेल्या आहेत. सातारा हा माननीय मुख्यमंत्र्यांचा जिल्हा आहे. यापुढे अशा घटना घडू नयेत म्हणून शासनाने कोणत्या प्रकारच्या उपाययोजना केलेल्या आहेत ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, 19 तारखेला मिसींगची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये दाखल केल्यानंतर 21 तारखेला या घटनेच्या बाबतीत तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. सदर घटनेच्या बाबतीत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करुन घेण्यास चालढकल केली, गुन्हा दाखल करण्यास हयगय केली म्हणून तेथील पोलीस अधिकाऱ्याला या प्रकरणी सह आरोपी केलेले आहे. त्या अधिकाऱ्याने स्वत: अटकपूर्व जामीन घेतलेला आहे. परंतु या सर्व गुन्हयांमध्ये त्याला सह आरोपी करण्यात आलेले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : आंतरजातीय विवाहाशी संबंधीत हा मुद्दा आहे. आज त्या गावातील परिस्थिती पाहिली तर, तेथील तंटामुक्ती समिती निकालात निघालेली आहे. अजूनही ती महिला त्या गावात न राहता सांगली येथे रहात आहे. या घटनेच्या अनुषंगाने मी सातारा येथील जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेशी बोलले. जिल्हाधिकारी, सातारा यांचे बरोबर बोलले आणि त्यांना सांगितले की, त्या महिलेस सुरक्षितपणे त्या गावात जगता आले पाहिजे हा या लक्षवेधी सूचना मांडण्यामागचा उद्देश आहे. त्या गावात या घटनेमुळे वातावरण तप्त झालेले आहे. त्या गावाला माननीय गृहराज्य मंत्र्यांनी भेट दिली आहे काय ? असल्यास, त्या गावात शांततेचे वातावरण रहावे म्हणून गावकऱ्यांशी चर्चा केली आहे काय? पोलीस संरक्षण देऊन सर्वच गोष्टी साध्य होत नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

समाजाला एकत्र आणून अशा ठिकाणी सामंजस्याचे वातावरण निर्माण केले पाहिजे. या प्रकरणी गुन्हा दाखल करुन घेण्यास ज्या पोलीस अधिकाऱ्याने चालढकल केली, त्याच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई अद्याप केली गेली नाही, त्याच्यावर तत्काळ कारवाई करावी. गृह राज्यमंत्री म्हणून आपण त्या गावात जाऊन कोणत्या प्रकारचे प्रबोधनाचे काम केले ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, पीडित महिलेला संरक्षण देण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आलेल्या आहेत. या प्रकरणाशी संबंधित असलेली मुलगी आणि मुलगा अजूनही परत आलेले नाहीत. त्यामुळे त्या गावातील वातावरण शांत आहे. त्या मुलीने देखील स्वत: पत्र लिहून कळविले आहे की, मी ज्या ठिकाणी आहे, तेथे सुरक्षित आहे. माझ्यामुळे गावातील कोणालाही त्रास होऊ नये अशा प्रकारची विनंती देखील त्या मुलीने पत्राव्दारे गावकऱ्यांकडे केलेली आहे. त्या गावात शांततेचे वातावरण रहावे, सामंजस्यांचे वातावरण रहावे म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी भेट दिली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी गावातील लोकांची बैठक घेऊन तंटामुक्त अभियानाच्या माध्यमातून हा विषय हाताळण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. त्या गावातील वातावरण सौहार्दपूर्ण रहावे यासाठी निश्चितपणे प्रयत्न करण्यात येत आहेत.

श्री.विनोद तावडें : सभापती महोदय,....

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माननीय श्री. विनोद तावडे हे विरोधी पक्ष नेते आहेत. त्यांना प्रश्न विचारण्यासाठी मी अडवू शकत नाही. परंतु या ठिकाणी विरोधी पक्ष सदस्यांनाच प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना देखील प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी, अशी माझी आपणास विनंती आहे.

उप सभापती : आपण सत्ताधारी पक्षाच्या बेंचवर बसलेला आहात. अशा प्रकारचे प्रश्न ज्यावेळी सभागृहात चर्चेसाठी येतात, त्यावेळी कोणाला कसे झुकते माप द्यावयाचे याची मला माहिती आहे. तुम्ही हा आरोप त्यांच्यावर करीत नसून तो आरोप सभागृहातील कामकाज चालविणाऱ्या पीठासीन अधिकाऱ्यांवर म्हणजे माझ्यावर करीत आहात.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे हे सरकारचे काही चुकले तर त्यांच्या विरुध्द हिंमतीने बोलतात. सन्माननीय सदस्य श्री.रामभाऊ तुम्ही बोला, तुम्हाला आमचा पाठिंबा आहे. (अडथळा)

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2.....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. आपण स्व.यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी साजरी करीत आहोत. माननीय मुख्यमंत्री आणि स्व.यशवंतराव चव्हाण हे सातारा जिल्हयाशी संबंधित आहेत. माननीय मंत्रीमहोदयांकडून उत्तर देत असताना किमान शब्दातून बगल देण्याचा प्रयत्न होऊ नये एवढीच आमची अपेक्षा आहे. अँटीसिपेटरी बेल घेतल्यामुळे अटक करता येत नाही हे आम्हालाही कळते. तो अधिकारी त्याच ठिकाणी कार्यरत आहे की नाही? मंत्रीमहोदय त्या अधिकाऱ्याला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. अनेक दिवस केस दाखल करुन घेतली जात नाही. पोलीस ठाण्यामध्ये केसेस दाखल करण्याचे प्रमाण कमी केले जाते.

सभापती महोदय, मी 23 डिसेंबर, 2011 रोजी विरोधी पक्षनेता पदावर विराजमान झाल्यानंतर आतापर्यंत मला आलेले 60 टक्के दूरध्वनी हे पोलीस खात्याच्या संदर्भातील आहेत. पोलीस तक्रार दाखल करुन घेत नाहीत, तक्रार दाखल करुन घ्यायला सांगा असे सांगणारे अनेक दूरध्वनी मला येत असतात. मी संबंधित पोलीस ठाण्याच्या नावांची नोंद करुन ठेवली आहे. पोलीस तक्रार दाखल करुन घ्यायला तयार नाहीत. याची कारणे काय आहेत? मंत्रीमहोदय अशा अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. अँटीसिपेटरी बेल घेतल्यामुळे अटक करता येत नसली तरी निलंबित करता येते. तो अधिकारी त्याच गावात राहणार आहे, त्याची चौकशी कोण करणार, त्या अधिकाऱ्याला सहआरोपी केल्यामुळे तक्रारीची चौकशी कोण करणार आहे? त्या अधिकाऱ्याला निलंबित केले जाणार आहे की पाठीशी घातले जाणार आहे?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, विषय अत्यंत महत्वाचा आणि गंभीर आहे. म्हणून मी संबंधित अधिकाऱ्याला सहआरोपी करण्याचा निर्णय घेतला आहे. निश्चितपणे विषयाचे गांभीर्य पाहता या अधिकाऱ्याला निलंबित केले जाईल.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, ही घटना अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी प्रश्न विचारल्याप्रमाणे शासनाने त्या गावाचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे की नाही? ज्या गावामध्ये घटना घडली तेथे रात्री 1.00 वाजता त्या महिलेला मारहाण करण्यास सुरुवात झाली. रात्रौ 1.00 ते 3.00 वाजेपर्यंत त्या महिलेला मारहाण केली जात होती. दुसऱ्या दिवशी रुग्णालयात जाऊन मी त्या महिलेची भेट घेतली, त्या गावाला मी भेट दिली. दोन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे.....

तास त्या महिलेला मारहाण केली गेली. एका कुटुंबातील जवळजवळ 20 सदस्य त्या महिलेला मारहाण करीत होते. 200 ते 250 लोकांचा जमाव घटनेच्या ठिकाणी आजूबाजूला उभा होता. दलित महिलेला मारहाण होत असताना एकाही महिला किंवा पुरुषाने पुढे येऊन विरोध करु नये ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. त्या महिलेच्या अंगावर एकही इंच जागा शिल्लक नाही ज्या ठिकाणी तिला मारहाण झालेली नाही. संपूर्ण शरीरावर माराचे वळ उठलेले होते. ज्या जिल्हयामध्ये ही घटना घडली त्या सातारा जिल्हयाचे माननीय मुख्यमंत्री आहेत. दलित महिलेवर अत्याचार होत असताना सहानुभूती दाखविण्यासाठी एकही नेता पुढे आलेला नाही. महाराष्ट्र दलितांच्या मागे उभा आहे असे सांगणारा एकही नेता त्या ठिकाणी गेला नाही ही अत्यंत दुर्दैवाची व दु:खाची गोष्ट आहे. हा अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रकार आहे.

रात्रौ 1.00 वाजता तिला मारहाण होत असताना पोलीस ठाण्यामध्ये दोन दूरध्वनी केले गेले, परंतु रात्रौ 3.00 वाजेपर्यंत त्या महिलेला पोलिसांकडून संरक्षण मिळू शकले नाही. कोणीही त्या महिलेला वाचविण्यास पुढे आले नाही. एवढी गंभीर घटना घडली असताना त्या तालुक्याचे जे संबंधित पोलीस अधिकारी आहेत त्यांच्यावर तातडीने कारवाई करणे आवश्यक होते. मंत्रीमहोदय सांगतात की, त्या अधिकाऱ्याला सहआरोपी केले गेले आहे. सहआरोपी म्हणजे काय?

नंतर श्री.खर्चे....

अप्रमाणित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

PFK/ MMP/ KGS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. भोगले..... 13:00

श्री. राम पंडागळे .....

दोन तास त्या महिलेला मारहाण होत होती. तरी देखील कोणीही तिला सोडवायला गेले नव्हते, पोलिसांकडून सुध्दा कोणतीच मदत मिळाली नाही. आता मात्र शासन संबंधित अधिकाऱ्याला सह आरोपी करीत आहे. याचा अर्थ शासनाच्या मनात दलितांच्या बाबतीत फक्त शब्दातूनच कळवळा दिसून येतो प्रत्यक्ष कृतीत मात्र वेगळेपणा दाखवून देत आहे. माझी मागणी आहे की, या पोलीस अधिकाऱ्याला शासन निलंबित करुन त्याच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करणार काय, तसेच भविष्यात राज्यात अशा प्रकारचे गुन्हे घडणार नाहीत, यासंबंधी कोणती उपाययोजना करणार आहे ? सभागृहात माननीय मुख्यमंत्री सुध्दा उपस्थित आहेत. म्हणून माझी शासनाला अशी मागणी आहे की, ही घटना घडल्यानंतर बीड जिल्ह्यात सुध्दा अशा दोन घटना घडल्या होत्या. त्या अनुषंगाने शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे ?

उप सभापती : आपण निलंबनाची जी मागणी केली आहे, ती अगोदरच शासनाने पूर्ण केली आहे, त्यामुळे त्याचा पुनरुच्चार आपण करु नये. नेमकी आपली मागणी कोणती आहे ती आपण सांगावी.

श्री. राम पंडागळे : राज्यात दररोज निरनिराळ्या प्रकारचे अत्याचार दलितांवर होत आहेत. या घटनेनंतर दुसऱ्याच आठवड्यात बीड जिल्ह्यात दोन दलितांना जाळून मारण्यात आले. अशा परिस्थितीत सरकार मात्र दलितांच्या संरक्षणासाठी कोणत्याही प्रकारचा निर्णय घेत नाही म्हणून माझा प्रश्न आहे की, यासंदर्भात शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन तीन विषय येथे मांडले आहेत. त्यात त्यांनी एक मुद्दा असाही मांडला की, शासनाने या घटनेची दखल घेतली नाही यासंबंधीचा मी खुलासा करु इच्छितो. या ठिकाणी श्रीमती व्हटकर, आय.जी. आणि माननीय मंत्री श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांनी भेट दिली होती. याचा अर्थ शासनाच्या वतीने कोणी तरी जबाबदार व्यक्ती तेथे गेल्या होत्या म्हणून सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती खरी नाही हे मी नम्रपणे नमूद करु इच्छितो. तसेच शासन या प्रकरणी निश्चितपणे गंभीर असून कोणालाही पाठीशी घालण्याची शासनाची भूमिका नाही.

श्री. विनोद तावडे : महोदय, माननीय गृह राज्य मंत्री या घटना स्थळापासून फक्त 100 किलोमीटर अंतरावर असताना देखील त्यांनी भेट दिली नाही.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : ही घटना 9 जानेवारी, 2012 रोजी घडली असून आज मार्च महिना सुरु झालेला आहे. सभागृहात प्रश्न उपस्थित होऊन दहा मिनिटानंतर देखील मंत्री महोदय उत्तर देण्यास तयार नाहीत. पण थेट प्रश्न विचारल्यावर मात्र संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्याची घोषणा करण्यात येते. तीन महिन्याच्या कालावधीत शासन आणि पोलीस यांच्यामध्ये समन्वय साधला गेला नाही काय, राज्यात खैरलांजी येथील घटना घडल्यानंतर त्यापासून धडा घेऊन संबंधित विभागाचे सचिव यांनीच अशा प्रकरणांबाबत दखल घेऊन निलंबनाची कारवाई करणे अपेक्षित होते. तसे केले असते तर आज सभागृहात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित करण्याची वेळच आली नसती. यावरुनच समजते की अशा घटनांच्या बाबतीत शासन आणि विभागाला किती संवेदना आहेत ? तसेच "गृह खाते दुर्दैवाने आमच्याकडे नाही" असे माननीय मुख्य मंत्री मधल्या काळात म्हणाले होते. त्याचा मतितार्थ आता आमच्या लक्षात आला आहे. कारण या खात्याची क्षमता कमी झालेली आहे. संबंधित अधिकाऱ्याला जबाबदार धरुन शासनाने निलंबित करीत असल्याची घोषणा केली पण आमची मागणी अशी आहे की, जर सरकार अशा प्रश्नांच्या बाबतीत खरोखरच जागरुक असेल तर अशा अधिकाऱ्याला निलंबित नव्हे तर बडतर्फ केले पाहिजे. म्हणून माझी मागणी आहे की, या प्रकरणी जो अधिकारी जबाबदार आहे त्याला शासन बडतर्फ करणार काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : आताच या अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्याचे कारण म्हणजे यापूर्वी या अधिकाऱ्याची विभागीय चौकशी सुरु केलेलीच होती हे देखील मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

<u>गिरणी कामकारांच्या घरांच्या प्रश्नाबाबत</u>

उप सभापती : आता माननीय मुख्य मंत्री गिरणी कामगारांना द्यावयाच्या घरांच्या संदर्भात सभागृहात निवेदन करतील.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आज या सदनात मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नासंदर्भात अशासकीय ठरावाच्या निमित्ताने चर्चा होणार आहे त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांना आता जे निवेदन करावयाचे आहे ते त्यांनी उत्तराच्या माध्यमातून करावे अशी विनंती आहे. ज्या विषयावर सभागृहात चर्चा होणार आहे त्या विषयावर अगोदर निवेदन करणे योग्य होणार नाही. जेव्हा आमची स्थगन प्रस्तावाची सूचना नाकारली जाते तेव्हा आम्ही साधी तक्रार सुध्दा करीत नाही. गिरणी कामगारांच्या प्रस्तावावर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अशासकीय ठरावाला उत्तर दिले तर लोकशाहीचा सन्मान होईल. कै.यशवंतराव चव्हाणांच्या जन्म शताब्दीमध्ये वर्षामध्ये त्यांच्या विचाराचा आदर बाळगावयाचा असेल तर माननीय मुख्यमंत्र्यांनी गिरणी कामगारांच्या अशासकीय ठरावावर उत्तर दिले तर त्याची उंची वाढू शकेल. माननीय मुख्यमंत्र्यांनी गिरणी कामगारांच्या संदर्भात निवेदन केले तर आम्ही गिरणी कामगारांच्या प्रश्नावर चर्चा तरी कशासाठी करावयाची ?

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, राज्यामध्ये दलित महिलांवर बलात्कार होत आहे, दलितांवर अन्याय होत आहेत..... दलितांना जीवंत मारले जात आहे. हे जे काही चालले आहे ते आम्ही सहन करणार नाही.

उप सभापती : लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मंत्री महोदयांनी समर्पक उत्तर दिलेले असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना बोलण्याची परवानगी नाकारण्यात आलेली आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. राम पंडागळे : दलितांवर अन्याय होत असतांना शासन शांत राहत असेल तर ते आम्ही खपवून घेणार नाही. या प्रश्नाच्यासंदर्भात शासन योग्य प्रकारे कारवाई करत नसल्यामुळे मला सभागृहात बसणे योग्य वाटत नसल्यामुळे मी सभात्याग करतो.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याला पाठिंबा देऊन आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करुन पुन्हा सभागृहात येतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना मी पुन्हा सांगू इच्छितो की, आपण कृपया खाली बसावे. आपल्याला बोलण्याची परवानगी दिलेली नसतांना सुध्दा आपण बोलत आहात. आपण सभागृहात कृपया शांतता राखावी अशी मी आपल्याला पुन्हा एकदा ताकीद देत आहे.

आता माननीय मुख्यमंत्री मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांच्या बाबतीत निवेदन करतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आज या सदनात मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नासंदर्भात अशासकीय ठरावाच्या निमित्ताने चर्चा होणार आहे त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांना आता जे निवेदन करावयाचे आहे ते त्यांनी उत्तराच्या माध्यमातून करावे अशी विनंती आहे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : या निवेदनाच्या संदर्भात मी काय सांगणार आहे ते प्रथम आपण ऐकून घ्यावे. मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न खूप वर्षापासून प्रलंबित आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मी अनेक वेळा बैठका घेऊन हा प्रश्न मार्गी लागावा यासाठी प्रयत्न केलेला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मी सभागृहात अनेक वेळा उत्तरे सुध्दा दिलेली आहेत. या प्रश्नासंदर्भात अनेक समित्या सुध्दा नेमण्यात आल्या होत्या. सभागृहाच्या कामकाजाचा आजचा पहिलाच दिवस असल्यामुळे या विषयाच्या संदर्भातील निवेदन आपण ऐकून घेतले तर या विषयाच्या संदर्भातील अशासकीय ठरावावर अर्थपूर्ण चर्चा होऊ शकेल एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. आपण ही चर्चा थांबवली नसून गिरणी कामगारांच्या प्रश्नांच्या संदर्भातील निवेदन झाल्यानंतर आपण चर्चेला सुरुवात करु शकू.

(सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते वेलमध्ये येतात.)

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : मी सभागृहाच्या निदर्शनास म.वि.प.नियम 46 आणून देऊ इच्छितो. यात नमूद करण्यात आले आहे की, मंत्र्यांना सभापतींची परवानगी घेऊन सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या बाबींवर निवेदन करता येईल. अशा निवेदनावर कोणतीही चर्चा करण्याची परवानगी देण्यात येणार नाही. परंतु, उक्त निवेदनाच्या संबंधात आणखी माहिती काढण्याच्या प्रयोजनासाठी प्रश्न विचारण्याची सदस्यांना परवानगी देता येईल.

(सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते डायसवर चढतात.)

मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना निवेदन करण्याची अनुमती दिलेली आहे. मी नियम वाचून दाखवलेला आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, हा अत्यंत संवेदनशील प्रश्न आहे. शासनाच्यावतीने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शासनाच्या वतीने या प्रश्नासंबंधी उत्तर देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यासंबधी माननीय विरोधी पक्षाने सहकार्याची भूमिका घेतली आहे. हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे या प्रश्नावर चर्चा झाली पाहिजे असे मला देखील वाटते. उत्तर देऊ नका असे कृपा करून आपण मला सांगू नये. शासनाने हा प्रश्न सोडविण्याकरिता प्रयत्न केले असतील तर ते जनतेला, गिरणी कामगारांना, सभागृहाला, महाराष्ट्राला सांगू नका असे म्हणणे उचित नाही. सन्माननीय सदस्य गिरणी कामगारांच्या हिताचे बोलत आहेत की त्यांच्या विरोधात बोलत आहेत हे मला समजत नाही. याचे आपण राजकारण करणार आहात काय ? गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नाचे आपण राजकारणच करणार आहोत काय ? शासनाने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तो प्रश्न आपण सोडवू नका असे म्हणत आहात. माझे म्हणणे आपण ऐकून घ्यावे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बसतात.)

(सभापती स्थानी माननीय सभापती)

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांबाबत.

मु.शी.: मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांबाबत

माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

बृहन्मुंबईतील कापड गिरण्यांच्या दीर्घकाळ चाललेल्या 1982 च्या संपानंतर बंद पडलेल्या/आजारी कापड गिरण्यांच्या जमिनीच्या विक्री व विकासाबाबतच्या धोरणास मंत्रिमंडळाने दिनांक 11.10.2000 रोजीच्या बैठकीत मान्यता दिली. त्या अनुषंगाने विकास नियंत्रण नियमावलीतील नियम 57 मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम 37 अन्वये दिनांक 20.3.2001 च्या अधिसूचनेद्वारे फेरबदल मंजूर केले. त्यानुसार एक पर्याय म्हणून बंद पडलेल्या/आजारी कापड गिरण्यांच्या मोकळया जागा व शिल्लक चटईक्षेत्र यांचा साधारणत: 1/3 हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिकेस रिक्रीएशन ग्राऊंड/गार्डन/प्ले ग्राऊंड अशा तत्सम बाबींकरिता, 1/3 हिस्सा म्हाडास व 1/3 हिस्सा गिरणी मालकास विकास करण्यारिता देण्याची तरतूद करण्यात आली. त्यानुसार म्हाडास उपलब्ध होणाऱ्या जमिनीच्या विकासांतर्गत 50 टक्के जमीन ही गिरण्यातील कामगारांच्या कल्याणासाठी वापर करणे अपेक्षित आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या निणर्याचे आम्ही धिक्कार करतो व सभात्याग करतो.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

सभापती : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. माननीय मुख्यमंत्री निवेदन करत असताना त्यांचा मान राखणे आपले काम आहे. त्यामुळे आपण सर्वांनी बसून घ्यावे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांना माझी विनंती आहे की, आपण देखील खाली बसून घ्यावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण देखील माझे म्हणणे ऐकून घेत नाही. त्यामुळे आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, हे निवेदन चार पानांचे आहे. सदर निवेदन मी सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहे. आपण जर परवानगी देत असाल तर मी यातील महत्त्वाचेच मुद्दे वाचतो.

सभापती : ठीक आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : तद्नंतर दिनांक 11.20.2006 रोजी तत्कालीन माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली निर्णय झाला की, गिरणी कामगार गृहनिर्माण योजनाही म्हाडामार्फतच राबविण्यात यावी. त्याच प्रमाणे गिरणी कामगार गृहनिर्माणासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करून गिरणी कामगारांच्या घरांकरिता नियम 57 खाली राखून ठेवलेल्या जमिनीवर अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांकापेक्षा 200 टक्के पर्यंत अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय केला. म्हणजे 4 पर्यंत एफएसआय देण्यात आला.

यानंतर सौ.रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यानुसार म्हाडास अंदाजे 2/3 घरे गिरणी कामगारांकरिता व 1/3 घरे संक्रमण गाळे म्हणून बांधता येतात.

गिरणी कामगारांची पात्रता ठरविणे, गाळे वाटपाची कार्यपध्दती ठरविणे व घरांची किंमत ठरविण्याकरिता शासन निर्णय, नगरविकास विभाग दिनांक 12-12-2006 नुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक समिती गठित करण्यात आली.त्यानुसार मुख्य सचिव स्तरावर देखील बैठका होऊन अनेकदा चर्चा झाली.

<u>गिरणी कामगारांसाठी जमिनींची व घरांची उपलब्धता</u> :-

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील बंद/आजारी 58 गिरण्यांपैकी म्हाडास प्राप्त झालेल्या 36 गिरण्यांच्या एकूण जमिनींपैकी 25 गिरण्यांच्या एकूण 9.12 हेक्टर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने 20 वेगवेगळया ठिकाणी घेतला आहे.

त्यापैकी 18 गिरण्यांच्या जमिनीवर 11 ठिकाणी 6.83 हेक्टर जमिनीवर एकूण 10165 गाळयांचे (त्यातील 6948 गिरणी कामगारांकरिता असलेल्या + 3204 संक्रमण सदनिका आणि 13 दुकाने) काम भौतिकदृष्ट्या पूर्ण होत आले आहे.

या व्यतिरिक्त भारत मिल लोअर परेल, सेंच्युरी मिल, ज्युबिली मिल (स्वान मिल शिवडीचा भाग) वेस्टर्न इंडिया लिज होल्ड (एम.एस.टी.सी.चा भाग) या गिरण्यांच्या जमिनीचा ताबा सुध्दा म्हाडास प्राप्त झालेला आहे.सद्यस्थितीत काम सुरु नसलेल्या व म्हाडाच्या ताब्यात असलेल्या जमिनीचे क्षेत्र 2.29 हेक्टर एवढे आहे. याशिवाय आतापर्यंत अप्राप्त 11 गिरण्यांची आणि अंशत: जमीन उपलब्ध केलेल्या गिरण्यांची उर्वरित जमीन अशी एकूण 6.66 हेक्टर इतकी निश्चित झालेली जागा विविध कारणांमुळे अद्याप म्हाडास प्राप्त झालेली नाही.सदर गिरण्यांच्या जमिनी प्राप्त करण्यासाठी शासनाकडून वेगवेगळया स्तरावर वेळोवेळी बैठका घेऊन पाठपुरावा सुरु आहे.

<u>म्हाडाने संकलित केलेली तत्कालीन गिरणी कामगारांची माहिती</u> :-

शासनाच्या वतीने म्हाडामार्फत गिरणी कामगारांची माहिती संकलनाची पहिली मोहीम दिनांक 6-9-2010 ते 28-10-2010 कालावधीत राबविण्यात आली. तद्नंतर मृत कामगारांच्या एका वारसाची व यापूर्वी अर्ज करणे शक्य न झालेल्या गिरणी कामगारांची माहिती संकलित करण्या करिता दिनांक 30-11-2011 ते 12-12.2011 या कालावधीत दुसरी मोहीम राबविण्यात आली.त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोहिमेत मृत गिरणी कामगारांच्या वारसांचे 22701 व गिरणी कामगारांचे 15,843 अर्ज प्राप्त झाले आहेत.

अशा प्रकारे दोन टप्प्यात एकूण गिरणी कामगारांचे 1,26,166 व वारसांचे 22,701 मिळून एकूण 1,48,867 अर्ज प्राप्त झाले आहेत.

गिरणी कामगार संघटनांच्या प्रतिनिधी समवेत मुख्य सचिव, राज्यमंत्री (गृहनिर्माण), संसदीय कार्यमंत्री व मा.मुख्यमंत्री स्तरावर अनेक बैठका झाल्या.

या कामगारांच्या घरांच्या प्रश्नाबाबत मी विधान परिषदेत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दिनांक 4-8-2011 रोजी विधानमंडळ पक्षीय गटनेत्यांसमवेत चर्चा केली. सदरहू चर्चेत खालील प्रमाणे ठरविण्यात आले.

1) कट ऑफ डेट दिनांक 1-1-1982 असावी.

2) मासिक उत्पन्नाची अट असू नये.

3) गिरणी कामगारांकडे मुंबईत अगोदर पासून घर असले तरी त्यांना या योजनेसाठी पात्र समजावे.

4) अधिवासाची अट लावावी असे बहुतेक उपस्थितांकडून प्रतिपादन करण्यात आलेले आहे.

5) मृत गिरणी कामगारांच्या एका वारसाकडूनही अर्ज मागावावा.

सदर चर्चेदरम्यान असे देखील ठरले की, गिरणी कामगार संघटनांशी चर्चा करावी.

त्या अनुषंगाने संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 4-10-2011 रोजी गिरणी कामगार संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा झाली. या बैठकीच्या अनुषंगाने ज्या मुद्यांवर चर्चा झाली, त्यामध्ये दोन निर्णय घेण्यात आले. पक्षीय गटनेत्यांसमवेत बैठक झाली. **सदर बैठकीत माननीय मुख्यमंत्री महोदयांकडील पक्षील गटनेत्यांच्या बैठकीत ठरलेल्या उपरोक्त पाच मुद्यांमधील**

(अ) क्रमांक (चार) येथील अधिवासाची अट लावण्यात येऊ नये, अशी भूमिका कामगार संघटनांकडून मांडण्यात आली, त्यावेळी कामगार संघटनांच्या सदहू भूमिकेशी सर्व पक्षीय गटनेत्यांनी सहमती दर्शविली.

(ब) माननीय मुख्यमंत्री महोदयांकडील पक्षीय गटनेत्यांच्या बैठकीत ठरलेल्या उर्वरित चार मुद्यांशी कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी सहमती दर्शविली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

(1) मृत गिरणी कामगारांच्या एका वारसाला तसेच यापूर्वी माहिती संकलनाच्या वेळी ज्या गिरणी कामगारांना अर्ज करणे शक्य झाले नव्हते, त्यांच्याकडून देखील अर्ज मागवून पात्र गिरणी कामगारांची संख्या निश्चित करण्याचे ठरले.

(2) गिरणी कामगारांच्या संख्येच्या तुलनेत सध्या उपलब्ध असलेल्या घरांची संख्या पाहता, ज्या कापड गिरण्यांच्या जागी सध्या घरे बांधण्यात आली आहेत, त्या कापड गिरण्यां-मधील पात्र गिरणी कामगार व त्यांच्या एका वारसास उपलब्ध असलेली घरे लॉटरी पध्दतीने वाटपाबाबत शासनाने त्वरित पावले उचलावित, असेही सूचित करण्यात आले.

अनेक बैठकांच्या अनुषंगाने सदरहू घरे वाटपाच्या निकषांबाबत सर्वसाधारणपणे सहमती इ-ालेली आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/ प्रथम सौ. रणदिवे.... 13:20

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

<u>सदनिकांच्या किंमतीबाबत</u> :-

मुंबईतील गिरणी कामगारांच्या प्रश्नावरील विधान परिषदेतील चर्चेच्या वेळी दिनांक 10 एप्रिल, 2008 रोजी तत्कालीन माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले आहे की, कोणताही नफा न घेता जेवढी किंमत असेल तेवढीच किंमत कामगारांकडून घेण्यात येईल. म्हाडाने यापूर्वी दिनांक 3 मार्च, 2011 रोजी बहुमजली इमारतींमधील प्रति सदनिकांची किंमत सुमारे रुपये 12.62 लक्ष इतकी कळविली होती.

जे.एन.एन.यु.आर.एम. या कार्यक्रमांतर्गत "शहरी गरिबांसाठी मूलभूत सेवा (बीएसयुपी)" योजनेंतर्गत केंद्र शासनाचे प्राप्त झालेले प्रति सदनिका अनुदान रुपये 2.06 लक्ष इतके वगळता सदनिकेची किंमत सुमारे रुपये 10.50 लक्ष येते.

तदनंतर मुख्य सचिव यांच्याकडील चर्चेनंतर अनुषंगिक व आकल्पित खर्च 8 टक्क्यांनी कमी तसेच देखरेख खर्चापोटीचा 15 टक्के खर्च एकूण किंमतीतून वगळण्यात आला आहे. स्वान मिल कुर्ला येथील तळमजला + 4 मजली इमारतींमधील सदनिकांची किंमत रुपये 8.81 लक्ष असून इतर ठिकाणी बांधलेल्या बहुमजली (टॉवर) इमारतींमधील सदनिकांची किंमत रुपये 8.03 लक्ष पासून रुपये 9.35 लक्ष इतकी येते. केंद्र शासनाचे अनुदान जमेस धरल्यावर या बहुमजली इमारतींमधील प्रती सदनिकेची सरासरी किंमत रुपये 8.34 लक्ष इतकी झाली आहे. सदरहू किंमतीमध्ये यानंतर कोणत्याही प्रकारची घट करणे म्हाडास शक्य नाही. कारण ही रक्कम म्हाडाने प्रत्यक्षात खर्च केलेली आहे.

गिरणी कामगारांना गृह कर्जासाठी म्हाडामार्फत आवश्यक ते सहकार्य उपलब्ध करुन देण्याचा विचार करता येईल.

उपरोक्त किंमत जास्त असल्याचे नमूद करुन ती कमी करण्याची मागणी संघटनांच्या प्रतिनिधींनी केली आहे. काहींनी घरे मोफत मिळण्याची मागणी केली आहे. बांधकामासाठी म्हाडास झालेल्या मूळ खर्चापेक्षाही कमी किंमतीत ती घरे द्यावयाची झाल्यास शासनाच्या तिजोरीवर तो भार पडेल.

सदरहू घरांच्या किंमती आणखी कमी करण्याबाबत किंवा ती घरे मोफत देण्याच्या मागणीकरिता जे विविध युक्तिवाद वेगवेगळया स्तरावरुन करण्यात येत आहेत त्या संदर्भात स्पष्ट

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

करण्यात येते की, ज्यावेळी एखादी पुनर्वसनाची अथवा पुनर्विकासाची योजना राबविली जाते, त्यावेळी अगोदरच्या घराच्या अथवा झोपडीच्या बदल्यात (मोफत) घर दिले जाते.

गिरण्यांच्या जमिनीवरील चाळीत राहणाऱ्या कामगारांना तेथेच मोफत घर दिले जाईल असा धोरणात्मक निर्णय यापूर्वी झालेला आहे.

अशा परिस्थितीत सर्वसमावेशक व सर्वांच्या हिताचे म्हणून शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतले आहेत.

1) म्हाडाकडून बांधून तयार झालेल्या संबंधित 6948 सदनिकांपैकी कुर्ला येथील 170 सदनिकांची किंमत रुपये 4.81 लक्ष आणि उर्वरित 6778 बहुमजली इमारतींमधील सदनिकांची सरासरी किंमत रुपये 8.34 लक्ष अंतिम करण्यात आली असून त्याप्रमाणे गिरणी निहाय त्या-त्या गिरणीतील कामगारांसाठी त्यांच्या गिरणीने उपलब्ध केलेल्या जमिनीवरील सदनिकांसाठी सोडत काढणेकरिता म्हाडास कळविण्यात येत आहे. तसेच या 18 गिरण्यांमधील अर्जदारांची संख्या वारसांसहित, तयार झालेल्या सदनिका आणि किंमतीचे विश्लेषण म्हाडाच्या वेबसाईटवर त्वरित उपलब्ध करुन देण्यासाठी म्हाडाला कळविण्यात येत आहे.

2) सोडतीमध्ये यशस्वी होणाऱ्यांची पडताळणी कामगार विभागाच्या सहाय्याने म्हाडाने करावी व त्यात पात्र आढळल्यावर सदनिकांच्या वितरणाची कार्यवाही म्हाडाने करावी.

3) यशस्वी व पात्र आढळलेल्या कामगारांसाठी बँका/वित्तीय संस्थांकडून कर्जाची शक्यता म्हाडा मार्फत अजमविण्यात यावी.

4) उर्वरित गिरण्यांकडून म्हाडास उपलब्ध झालेल्या/होणाऱ्या जमिनींवर म्हाडामार्फत घरे बांधण्याविषयी किंवा कामगारांच्या गृहनिर्माण संस्थांना द्यावयाच्या भूखंड वाटपाविषयी कार्यपध्दती नंतर निश्चित करण्यात येईल. धन्यवाद.

सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.23 ते 2.30 मध्यंतर)

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

पृ. शी. : राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांना शैक्षणिक शुल्काचे अनुदान मिळण्यासाठी असलेली वार्षिक उत्पन्नाची मर्यादा 5 लाख रुपयांपर्यंत वाढविण्याची होत असलेली मागणी

मु. शी. : राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांना शैक्षणिक शुल्काचे अनुदान मिळण्यासाठी असलेली वार्षिक उत्पन्नाची मर्यादा 5 लाख रुपयांपर्यंत वाढविण्याची होत असलेली मागणी यासंबंधी सर्वश्री सतीश चव्हाण, हेमंत टकले, विक्रम काळे, एम.एम.शेख, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील गोरगरीब मुलांना उच्च शिक्षण मिळावे या दृष्टीने, वैद्यकीय, अभियांत्रिकी तंत्रनिकेतन व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येत असलेले शैक्षणिक शुल्काचे 50 टक्के अनुदान, त्यासाठी असलेली रु.1,00,000/- ची उत्पन्न मर्यादा, मात्र प्रत्यक्षात शैक्षणिक शुल्क बऱ्याच मोठ्या रकमेत असल्याने या गरीब विद्यार्थ्यांना 50 टक्के शुल्क भरता येणे शक्य नसणे, परिणामी ते उच्च शिक्षणापासून वंचित राहत असणे, मात्र, एस.सी., एस.टी., व्ही.जे.एन.टी. समाजातील विद्यार्थ्यांना शासनाकडून 100 टक्के शिष्यवृत्ती देण्यात येणे, शासनाकडून शैक्षणिक शुल्क देतांना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक आणि इतर मागासवर्गीय व मागासवर्गीय यांच्यात केला जाणारा भेदभाव,

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण .....

यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, मागासवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांप्रमाणेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांचेही संपूर्ण शैक्षणिक शुल्क शासनाने भरणे, तसेच त्यासाठी असलेली उत्पन्नाची मर्यादा रु.5,00,000/- इतकी करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्रात 2007 पासून सर्व मागासवर्गीयांसाठी 100 टक्के आणि ओबीसी साठी 50 टक्के शैक्षणिक शुल्क माफी योजना चालू केली त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. आज मेडिकल कॉलेजची फी, खाजगी मेडिकल कॉलेजची शासनाने ठरवून दिलेली फी 3 ते 5 लाख रुपये आहे. इंजिनियरींगची फी 60 हजार रुपये ते 1 लाख रुपयांपर्यंत आहे. आज त्यातील 50 टक्के फी ओबीसी, ईबीसी या घटकातील लोकांना भरावी लागते आणि त्याच्या वार्षिक उत्पन्नाची अट 1 लाख रुपये आहे. आज गरिबांना शिक्षण नसल्यामुळे हजारो मुले बेरोजगार होत आहेत. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, असा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही. 2007 साली 1 लाख रुपयांची जी किंमत होती ती किंमत आज किती आहे ? केंद्र शासनाने कर्मचाऱ्याचा महागाई भत्ता वाढविला की, आपण आपल्या कर्मचाऱ्यांना दैनिक भत्ता वाढवून देतो. ही 1 लाख रुपये उत्पन्नाची अट जाचक आहे. माझे महत्वाचे दोन प्रश्न आहेत. आर्थिक दृष्टया मागासवर्गीय, ओबीसी मुलांना 100 टक्के फी माफ करणार का ? असा प्रस्ताव विचाराधीन आहे का ? दुसरा महत्वाचा प्रश्न असा की, 1 लाख रुपये उत्पन्नाची जी अट आहे ती 5 लाख रुपये करणार का आणि हे अधिवेशन संपण्याच्या आत त्याची घोषणा करणार का ?

तालिका सभापती : इतर सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावे लागू नयेत असे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी दोन प्रश्न विचारले. मी सुरुवातीला मुद्दाम थोडे सविस्तरपणे सांगेन की, आपले महाराष्ट्र राज्य हे देशातील एकमेव असे राज्य आहे. फी रिएम्बर्समेंटच्या बाबतीत इतर राज्यांशी तुलना केली तर महाराष्ट्रासारखे इतर कोणतेही राज्य नाही. कारण आम्ही सगळ्या राज्यांचा अभ्यास केला आणि तुलनात्मक स्टेटमेंट तयार केले. आपण अतिशय उदार मनाने दरवर्षी 2 हजार कोटी रुपये या योजनेवर खर्च करतो. कारण शिक्षण म्हणजे गुंतवणूक याला राज्य शासनाने निश्चितपणे महत्व दिलेले आहे. त्या दृष्टीकोनातून ही योजना आपण राबवित आहोत. या ठिकाणी दोन भाग आहेत. एक म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी 100 टक्के अनुदान आहे आणि ओबीसी, व्हीजेएनटी किंवा ईबीसी, एसबीसी यांच्यासाठी 50 टक्के अनुदान आहे. यामध्ये भेदभाव करण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

आलेला आहे असे सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेमध्ये सांगितले आहे. या भेदभाव शब्दाच्या बाबतीत एवढेच सांगेन की, आपल्या राज्य घटनेच्या आर्टिकल 46 मध्ये ज्या स्टेट डायरेक्टीव्हज दिलेल्या आहेत त्यामध्ये आर्थिक, शैक्षणिक हितासाठी राज्य शासन अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी जाणीवपूर्वक काही योजना राबविल्या पाहिजेत असे म्हटले आहे. त्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी 100 टक्के फी ची प्रतिपूर्ती करण्यात येते आणि ओबीसी, ईबीसी, एसबीसी यांच्या बाबतीत 50 टक्के फी ची प्रतिपूर्ती करण्यात येते. हे मी मुद्दाम सांगू इच्छितो.

श्री. जयंत प्र. पाटील : हे आपण करीत नाही.

श्री. राजेश टोपे : हे राज्य शासन करते.

श्री. जयंत प्र. पाटील : हे आपले खाते करीत नाही. समाजकल्याण खात्याकडून आपल्या खात्याकडे पैसे जातात.

श्री. राजेश टोपे : मी खाते म्हणून बोलत नाहीत तर सरकार म्हणून बोलत आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ज्या वेळी आम्ही या ठिकाणी मागणी करतो त्या वेळेला माननीय मंत्री महोदय म्हणतात की, त्यांच्याकडून आले पाहिजे, अर्थ खात्याकडून आले पाहिजे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी सभागृहाची प्रथा आणि परंपरा अशीच आहे की, या ठिकाणी आपण सरकार म्हणूनच बोलले पाहिजे, शासन म्हणूनच बोलले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी फीच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. शासकीय महाविद्यालयातील व अनुदानित महाविद्यालयांतील ईबीसीच्या विद्यार्थ्यांना 100 टक्के फी माफी दिली जाते. त्यांना 15 हजार उत्पन्नाची मर्यादा होती. ही मर्यादा आता 1 लाख रुपये केली आहे. विना अनुदानित महाविद्यालयांसाठी ही मर्यादा 65 हजार रुपयांची होती ती 1 लाख रुपयांपर्यंत वाढविली आहे. म्हणजे 2 वर्षात ईबीसीच्या घटकासाठी उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी ओ.बी.सी.च्या विद्यार्थ्यांसाठी 100 टक्के फी माफी दिली जाईल काय असा प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत मी एवढेच सांगेन की, घटनेच्या तरतुदीनुसार एस.सी. व एस.टी.च्या विद्यार्थ्यांना 100 टक्के फी माफी दिली जाते. परंतु ओ.बी.सी. व ईबीसीच्या विद्यार्थ्यांना 50 टक्के फी माफी देण्याची योजना सुरु आहे. त्यामुळे या घटकातील विद्यार्थ्यांना 100 टक्के फी माफी देणे वर्धनक्षम होऊ शकणार नाही. या विद्यार्थ्यांना 50 टक्क्यांऐवजी 100 टक्के फी माफी द्यावयाची झ ाल्यास सध्याच्या खर्चामध्ये आणखी 5-6 हजार कोटी रुपयांनी वाढ होईल. त्यामुळे ईबीसीच्या विद्यार्थ्यांना 100 टक्के फी माफी करणे शक्य होईल किंवा नाही याबद्दल मला शंका आहे. सन्माननीय सदस्यांनी उत्पन्नाची मर्यादा 1 लाख रुपयांवरुन 5 लाख रुपये करण्याची मागणी केलेली आहे. ही मर्यादा 2 लाख, 3 लाख की 5 लाख करावी यासंबंधी चर्चा सुरु आहे. या संदर्भात वेगवेगळया स्तरावरुन शासनाकडे मागण्या आलेल्या आहेत. त्यामुळे माननीय उप मुख्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्यात आलेली आहे. ती समिती या विषयावर विचार करीत असून या समितीचा अहवाल सादर झाल्यावर मंत्रिमंडळात अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. या संदर्भात रायडर्स लावणे किंवा शासनाकडे आलेल्या सर्व मागण्यांबाबत एकत्रितपणे चर्चा सुरु आहे. आता मी एवढेच सांगेन की, कोणत्याही परिस्थितीत हे शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी याबाबत निश्चितपणे निर्णय घेतला जाईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामुळे ते अभिनंदनास पात्र आहेत. एस.सी., एस.टी., व्ही.जे.एन.टी.च्या विद्यार्थ्यांना 100 टक्के फी माफी मिळते असे लेखी उत्तरात नमूद केलेले आहे. परंतु या राज्यात ओ.बी.सीं.ची संख्याही खूप आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.वसंतराव खोटरे....

या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना 50 टक्के फी माफी मिळते. या लोकांचे उत्पन्न अतिशय कमी आहे. त्यामुळे या घटकातील मुले शिक्षणापासून वंचित राहिली आहेत. याचा आढावा घेतला तर हा घटक शैक्षणिकदृष्ट्या खूप मागे असल्याचे दिसून येईल. ओ.बी.सी.च्या विद्यार्थ्यांना एस.सी., एस.टी., व्ही.जे.एन.टी.च्या विद्यार्थ्यांबरोबर आणण्यासाठी शासनाने त्यांना 100 टक्के फी माफी द्यावी. तसेच जे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आहेत. त्यांच्या उत्पन्नाची मर्यादा वाढवून त्यांना सुध्दा शैक्षणिक शुल्काची 100 टक्के प्रतिपूर्ती करणे आवश्यक आहे. जेणे करुन ओ.बी.सी.या प्रवर्गातील मुले शिक्षणाच्या चळवळीत येऊ शकतील. याबाबत विचार करुन शासन धोरणात्मक निर्णय घेईल काय आणि यासंबंधीचा जी.आर.काढला जाईल काय तसेच उत्पन्नाची मर्यादा 2 किंवा 3 लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात येईल काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांनी सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांच्या प्रश्नांची पुनरावृत्ती केली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.....

शासनातर्फे एस.सी., एस.टी., व्ही.जे.एन.टी. आणि एस.बी.सी. या चार घटकांना शैक्षणिक शुल्कात 100 टक्के माफी दिली जाते. परंतु इ.बी.सी.आणि ओ.बी.सी. या दोन घटकांसाठी शैक्षणिक शुल्कात 50 टक्के शुल्क माफी दिली जाते. याचाच अर्थ इ.बी.सी. व ओ.बी.सी. हे दोन घटक वगळता, उर्वरित चार घटकांना शैक्षणिक शुल्कात 100 टक्के माफी दिली जाते.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सभागृहाला असेही सांगू इच्छितो की, या देशातील विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेता यावे यासाठी त्यांना शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन देण्याची एक अतिशय चांगली योजना केंद्र शासनाने सुरु केलेली आहे. विद्यार्थ्यांना या शैक्षणिक कर्ज योजनेची माहिती देऊन या योजने बद्दल विद्यार्थ्यांमध्ये अवेअरनेस निर्माण करण्याचे काम राज्य शासनाच्या वतीने जरुर करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाने राष्ट्रीयकृत बँकांना धोरणात्मकदृष्टया सांगितलेले आहे की, कोणत्याही विद्यार्थ्याला कोणतेही शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन दिले पाहिजे. विद्यार्थ्यांवर शैक्षणिक कर्जावरील व्याजाचे बर्डन राहू नये म्हणून विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा जेवढा कालावधी असेल तो कालावधी पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षे किंवा नोकरी लागेपर्यंतच्या कालावधीतील व्याज महाराष्ट्र शासन व केंद्र सरकारच्या वतीने बेअर केले जाईल. याचाच अर्थ राज्य व केंद्र सरकार शैक्षणिक कर्जावरील व्याज दर सहन करणार आहे. विद्यार्थ्याचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत अथवा नोकरी लागेपर्यंत त्याला शैक्षणिक कर्जाचा हप्ता भरण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांना पूर्णपणे शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन देण्याची ही एक चांगली योजना आहे. खरे तर जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याची आवश्यकता आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, मी या बाबतीतील सभागृहाच्या भावना मंत्रिमंडळाच्या बैठकीत निश्चितपणे मांडण्याचा प्रयत्न करीन.

सभापती महोदय, इ.बी.सी.आणि ओ.बी.सी. विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कात 100 टक्के माफी राहील की नाही, या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार मंत्रिमंडळाला आहे. इ.बी.सी. आणि ओ.बी.सी. घटकांतील विद्यार्थ्यांस शैक्षणिक शुल्कात 100 टक्के माफी देण्याच्या बाबतीत निर्णय होईल का या बाबतीत मला शंका वाटते. कारण मला वाटते की, ही गोष्ट शक्य होणार

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.....

नाही. अशा पध्दतीचा निर्णय घेतला तर खर्च दुपटीने वाढेल. या घटकांच्या आर्थिक उत्पन्नाची 1 लाख रुपयांची मर्यादा वाढविली पाहिजे अशी सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. त्यांच्या मागणीशी मी व्यक्तिगत निश्चितपणे सहमत आहे. ही मर्यादा वाढविण्याबाबत शासनाचा निश्चितपणे प्रयत्न राहील. मी या ठिकाणी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी इ.बी.सी. आणि ओ.बी.सी.ची 1 लाख रुपयांची उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत मागणी केलेली आहे. याबाबतीत शासनाकडून निश्चितपणे सकारात्मक प्रयत्न केले जातील.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय नेहमीच अतिशय विस्तृत आणि चांगले उत्तर देतात, याचा मला आनंद आहे. परंतु आज या ठिकाणी उत्तर देताना त्यांनी नंतरच्या उत्तरात थोडीशी सुधारणा केली, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी सुरुवातीला उत्तर देताना सांगितले की, एस.सी.आणि एस.टी. या घटकातील विद्यार्थ्यांना 100 टक्के आणि एन.टी. व व्ही.जे.एन.टी.घटकातील विद्यार्थ्यांना 50 टक्के शुल्क माफ करण्यात येईल. परंतु नंतर त्यामध्ये सुधारणा केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

श्री.राजेश टोपे : व्ही.जे.एन.टी.घटकातील विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक शुल्कात 100 टक्के माफी आहे असे मी उत्तर दिले आहे.

श्री. विक्रम काळे : आपण नंतरच्या उत्तरात सुधारणा केली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. माननीय राज्यमंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शासकीय आणि शासन अनुदानीत संस्थांमध्ये आर्थिक दुर्बल घटकासाठीची उत्पन्न मर्यादा रुपये 15 हजारा वरुन 1 लक्षपर्यंत वाढविण्यास दिनांक 26 फेब्रुवारी, 2010 च्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता दिलेली आहे. माननीय मंत्री महोदय, आपण आणि आम्ही शेतकऱ्याचे सुपुत्र आहोत. शेतकऱ्यांच्या मुलांनी भविष्यात डॉक्टर व्हावयाचे ठरविले, इंजिनिअर व्हावयाचे ठरविले तरी ते विद्यार्थी शैक्षणिक शुल्क भरु शकत नसल्याने डॉक्टर, इंजिनिअर होऊ शकत नाहीत. आपण मघाशी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन देतो अशा प्रकारचे गाजर

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

दाखविले. कोणतीही बँक शेतकऱ्याच्या मुलास शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन देत नाही ही वस्तुस्थिती आहे. या गोष्टीचा माननीय मंत्री महोदयांनी आढावा घेतला आहे काय ? केंद्र शासनाने शैक्षणिक कर्ज देण्याची योजना सुरु केलेली आहे, ती योजना अतिशय चांगली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मुले शेडयूल बँकाकडे शैक्षणिक कर्ज घेण्यासाठी गेली तर बँकेचे अधिकारी त्या मुलांना हाकलून लावतात व अशा प्रकारची योजनाच नसल्याचे सांगतात.. ही वस्तुस्थिती आहे. राज्यातील किती विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे यासंबंधीचा आढावा शैक्षणिक वर्ष सुरु होण्याअगोदर घेण्यात येईल काय ?शासकीय आणि अनुदानित संस्थांना शासन लाभ देत आहे, तो लाभ विना अनुदानीत महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दिला जाईल काय ? शासन आणि अनुदानित संस्था असा उत्तरामध्ये स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे.

यानंतर श्री. भोगले....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3..... श्री.विक्रम काळे.....

विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालये आहेत तेथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुध्दा या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यासाठी शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. शेवटी शाहू, फुले आणि आंबेडकरांचे राज्य आपण कोणासाठी चालवायचे आहे? तेव्हा बाणेदारपणा दाखवून हे अधिवेशन संपण्यापूर्वी हा निर्णय घेतला जाईल काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी आढावा घेण्याबद्दल सुतोवाच केले आहे. जेवढ्या महत्वाच्या शेड्युल्ड आणि राष्ट्रीयकृत बँका आहेत त्यांचा जरुर आम्ही आढावा घेऊ. खऱ्या अर्थाने किती विद्यार्थ्यांना खालच्या स्तरावर आर्थिक लाभ देण्यात आला हे कळले पाहिजे. शासनाचा जी.आर.अगदी स्पष्ट आहे. त्यामध्ये कुठेही मॉर्गेज करुन घ्यायचा उल्लेख केलेला नाही. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी ॲडमिशन मिळाल्यानंतर तात्काळ कर्ज द्यायचे आहे. या चांगल्या योजनेचा माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे आढावा घेऊ. शासकीय महाविद्यालये एवढ्यापुरती ही योजना मर्यादित नाही. विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सुध्दा योजना राबवित आहोत. त्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची सुध्दा फी रिइम्बर्स करीत आहोत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी आढावा घेण्याचे सांगितले आहे. राज्यात फक्त 4 टक्के विद्यार्थ्यांनी अनुदानाचा लाभ घेतल्याची आकडेवारी एका इंग्रजी वृत्तपत्राने जाहीर केली होती. प्रश्न असा आहे की, आपल्या देशात परदेशी विद्यापीठे येणार आहेत, त्या संदर्भात विधेयक आणले आहे. या परदेशी विद्यापीठांमध्ये एससी, एसटी व इतर आरक्षित घटकांतील विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहणार आहे का? खाजगी अभिमत विद्यापीठांमध्ये ही योजना सुरु आहे काय, नसल्यास सुरु करण्यात येईल काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, परदेशी विद्यापीठाबाबत आता बोलणे योग्य नाही, परदेशी विद्यापीठाचे विधेयक अद्याप संमत झालेले नाही. ते लोकसभेच्या संयुक्त समितीपुढे प्रलंबित आहे. परदेशी विद्यापीठे जेव्हा सुरु होतील तेव्हा या संदर्भात विचार करता येईल. सध्या अभिमत विद्यापीठांमध्ये ही योजना लागू नाही. अभिमत विद्यापीठे त्यांची स्वत:ची सामायिक प्रवेश परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना प्रवेश देतात. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शासनाची सीईटी परीक्षा असते, त्या परीक्षेनंतर कॅप राऊंडमधून जे विद्यार्थी उत्तीर्ण होऊन प्रवेश घेतात त्यांनाच या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3..... श्री.राजेश टोपे.....

योजनेचा लाभ मिळतो. अभिमत विद्यापीठातील प्रवेश त्यांच्या सीईटीच्या माध्यमातून केले जातात. त्यामुळे अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देऊ शकत नाही.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, शैक्षणिक कर्जाबाबत माझा स्वत:चा अनुभव फार वाईट आहे. मी आमदार असताना सुध्दा माझ्या मुलाच्या शैक्षणिक कर्जासाठी दहा बँकांकडे प्रयत्न करुनही कर्ज मिळाले नाही. अल्पसंख्याक घटकातील मुलांना शैक्षणिक कर्ज मंजूर करताना आर्थिक विकास महामंडळाकडून सरकारी सेवेतील उच्च वेतन घेणारे जामीनदार असल्याशिवाय कर्ज मंजूर केले जात नाही. या योजनेमध्ये सुध्दा तेच होणार आहे. त्यामुळे या गोष्टीकडे गांभीर्याने पहावे एवढीच माझी विनंती आहे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : महोदय, जगात कोठेही पाहिले तरी बँकांकडून कर्ज प्रोव्हाईड करणे ही एक चांगली सिस्टम असल्याचे दिसून येते. असे कर्ज घेऊन शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरीला लागलेले विद्यार्थी व्यवस्थितपणे त्या कर्जाचे हप्ते भरु शकतात. हे एज्युकेशन लोन अत्यल्प व्याज दराचे असते त्यामुळे बँकांनी ही योजना अधिक परिणामकारक राबवावी यासाठी आवश्यक त्या दुरुस्त्या सुध्दा केल्या जातील. तसेच माननीय मुख्य मंत्री व उप मुख्य मंत्री यांच्या स्तरावर बँकांचे डीजीएम यांना बोलावून एक बैठक घेण्यात येईल. तसेच या योजनेचा फायदा ग्रामीण भागातील मुलांना जास्तीत जास्त कसा होईल यासाठी देखील जाणीव पूर्वक प्रयत्न केले जातील.

श्री. भगवान साळुंखे : महोदय, यामध्ये उत्पन्नाची मर्यादा 1 लाखापर्यंत ठेवलेली आहे. मी या निमित्ताने अशी विनंती करतो ज्या यशवंतराव चव्हाण साहेबांनी या योजनेला जन्मला घातलेले आहे त्यांच्या जन्म शताब्दी वर्षाचे औचित्य साधून, त्यांना स्मरण करुन ही उत्पन्न मर्यादा 5 लाखापर्यंत नेणार काय ?

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी सुरुवातीलाच दिलेले आहे.

श्री. सतीश चव्हाण : महोदय, अनेक ठिकाणी बँका असे कर्ज देताना वर्ग-1 चे अधिकारी किंवा ज्यांना 80 हजार रुपये पगार आहे अशा लोकांचा जामीन घेऊन कर्ज देते. असे न करता शासनच अशा कर्जाला हमी देणार आहे काय, तसेच आपण बोलतांना सांगितले की, ही योजना फिजीबल आहे. पण शासनाच्या अशा किती तरी योजना अनफिजीबल असतानाही राबविल्या जातात. मग विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी असलेल्या योजनेबाबत असा विचार न करता सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून ही उत्पन्न मर्यादा 5 लाखापर्यंत नेऊन त्याची हमी शासन घेण्यासंबंधीचा निर्णय असे दोन्ही निर्णय हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन घेणार काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, अशा कर्जांना शासनाने हमी दिल्यासारखाच प्रकार आहे. त्याचे कारण असे की या रकमेवर अत्यल्प दराने व्याजाची आकारणी केली जाते व उर्वरित व्याज हे सरकारलाच भरावे लागते. तसेच यासंबंधीच्या जी.आर. मध्ये अत्यंत स्पष्टपणे उल्लेख आहे

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

की, अशा कर्जासाठी कोणत्याही प्रकारचा जामीन अथवा तारण घेतले जाऊ नये. तरी देखील खालच्या स्तरावर या जी.आर. चे तंतोतंत पालन केले जात नसेल तर यासंबंधी माननीय मुख्य मंत्री यांच्या स्तरावर येत्या एक दोन महिन्याच्या आत एक बैठक घेऊन ही योजना अधिक परिणाम कारक कशी राबविता येईल यासाठी मी सुध्दा प्रयत्न करील. तसेच यासाठी उत्पन्नाची मर्यादा 5 लाखापर्यंत करावी अशी जी मागणी केली त्या संदर्भात मी खुलासा करतो की, याबाबतचा अंतिम निर्णय हा कॅबिनेटचाच असेल आणि कॅबिनेटमध्ये सकारात्मक अशाच प्रकारचा निर्णय होईल किमान 1 लाखाच्या वर उत्पन्नाची मर्यादा करण्यात येईल असाच निर्णय होईल.

<u>लक्षवेधी क्र. 4 पुढे ढकलण्याबाबत</u>

तालिका सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेवर क्र. 4 वर दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

नंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 97 अन्वयेच्या चर्चेबाबत

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : नियम 97 अन्वये आपल्याला आता चर्चा सुरु करावयाची आहे. आजचा दिवस हा अशासकीय कामकाजाचा असतो. दिवसाच्या शेवटचे अडीच तास अशासकीय कामकाजासाठी ठेवले जात असतात. सकाळी 11.00 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत सभागृहाच्या कामकाजाची वेळ आहे. दुपारी 3.30 वाजता आपल्याला अशासकीय कामकाजाला सुरुवात करावी लागेल. त्यामुळे नियम 97 अन्वयेच्या चर्चेला आता सुरुवात करण्यात येणार असून जेवढी चर्चा आता होईल, तेवढी चर्चा करण्यात येईल. उर्वरित चर्चा व त्यावरील उत्तर सोमवारी पूर्ण करण्यात येईल. आता माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 97 अन्वयेच्या चर्चेला सुरुवात करावी.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आपण सांगितल्या प्रमाणे नियम 97 अन्वयेच्या चर्चेवर आमच्या बाजूच्या सदस्यांची नावे द्यावयाची आहेत.

तालिका सभापती : या चर्चेदरम्यान सर्व सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडण्यासाठी संधी देण्यात येईल, काळजी नसावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयाबाबत शासन अयोग्य पध्दतीने सभागृहात वागत आहे, असा आमचा आक्षेप आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या संदर्भातील चर्चेला मान्यता मिळाली असल्यामुळे, या विषयाच्या संदर्भातील चर्चा पूर्ण होऊ द्यावी. शिवाजी महाराजांच्या विषयाच्या संदर्भातील चर्चा आपण तुकडया तुकडयांनी करणार असाल तर ते बरोबर होणार नाही. त्यामुळे आजचे अशासकीय कामकाज पुढे ढकलले तरी त्याला आमची हरकत राहणार नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात गिरणी कामगारांच्या प्रश्नाबाबत गोंधळ घातलेला आहे. त्यामुळे आता तरी आपण छत्रपती शिवाजी महाराजांचा सन्मान करावा अशी विनंती आहे. माननीय सभापती महोदयांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भातील चर्चेला मान्यता दिलेली असल्यामुळे मी माननीय सभापती महोदयांच्या निर्णयावरच बोलत आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आजचे अशासकीय कामकाज नंतरच्या आठवडयात घेतले तरी आमची त्यास हरकत राहणार नाही.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आदरणीय रावते साहेबांनी बोलण्याच्या ओघात असा उल्लेख केला होता की, "मुख्यमंत्र्यांनी येऊन गोंधळ घातला." या पवित्र सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात अशा प्रकारचे जे वक्तव्य करण्यात आलेले आहे, ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात मी जो "गोंधळ "हा शब्द वापरला आहे, तो मी मागे घेतो व त्याऐवजी "अवमान" हा शब्द वापरतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण ब-याच वेळा अशासकीय कामकाज पुढे ढकलले आहे. त्यामुळे आजचे अशासकीय कामकाज पुढील आठवडयात घेतले तरी चालेल.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : आठवडयाच्या शेवटच्या दिवशी अशासकीय कामकाज घेतले जात असते.

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री.दिवाकर रावते : छत्रपती शिवाजी महाराजांच्या चर्चेला आदरणीय सभापती महोदय आपणच काल मान्यता दिलेली असल्यामुळे, आपण या चर्चेला सुरुवात करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : दर शुक्रवारी आपण प्राधान्याने अशासकीय कामकाज घेत असतो. त्या अगोदर किमान तीन तास प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना व अन्य शासकीय कामकाज घेत असतो. काल या सदनामध्ये आपण नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना दिल्यानंतर मी निर्णय दिला. त्या निर्णयानुसार आज आपण सदर चर्चा घेण्याचे ठरविले. तसेच आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेले अशासकीय कामकाज देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. आजची तारांकित प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचनांवरील चर्चा मी ऐकली आहे. 4 लक्षवेधी सूचना 35 मिनिटांमध्ये पूर्ण करण्याच्या मर्यादा आपण पूर्वी घातल्या होत्या. परंतु, आज एक एक लक्षेवधी सूचना 35 मिनिटे चालली आहे. त्यामुळे यामध्ये देखील आपले दोन तास गेले. प्रश्नोत्तराचा तास महत्त्वाचा असतो आणि त्यातील प्रश्न महत्त्वाचे असतात हे देखील खरे आहे. प्रश्नोत्तराच्या पहिल्या प्रश्नासाठी आज जवळ जवळ 26 ते 27 मिनिटे गेली आहेत. तेव्हा सदनाने देखील काही बाबी पथ्ये म्हणून पाळल्या पाहिजेत.. काही वेळा आपण येथे लोकसभेचे उदाहरण देतो. तेथील पद्धती व येथील पद्धती याचा विचार करून मर्यादा कशी पाळायची हे आपण ठरविले पाहिजे. या बरोबरच जास्तीत जास्त सन्माननीय सदस्यांना चर्चेत कसा भाग घेता येईल हे देखील पाहिले पाहिजे.

आता आपण अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक बांधण्याबाबतच्या चर्चेला सुरूवात करावी. सन्माननीय मुख्यमंत्री या चर्चेला सोमवारी उत्तर देतील. तेव्हा आपण ही संपूर्ण चर्चा आजच संपवावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपले सभागृह स्थगित झाले तेव्हा मी खालच्या सभागृहाचे कामकाज ऐकण्यासाठी गेलो होतो. खालच्या सभागृहामध्ये अशी चर्चा झाली की, वरच्या सभागृहामध्ये चर्चा होत आहे. आमच्या आधी चर्चा होत आहे, हे बरोबर नाही. खालच्या सभागृहात आधी चर्चा झाली पाहिजे आणि नंतर वरच्या सभागृहात चर्चा झाली पाहिजे. आधी खालच्या सभागृहात उत्तर आले पाहिजे, अशी पण तेथे चर्चा झाली. हा आपल्या सभागृहाचा अवमान आहे असे मला वाटते. हे बरोबर नाही. त्यामुळे ही चर्चा आजच पूर्ण झाली पाहिजे. या चर्चेला आजच उत्तर मिळाले पाहजे अशी माझी मागणी आहे. हे जे मी ऐकले त्यावेळी त्या सभागृहात सन्माननीय गृह मंत्री देखील उपस्थित होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, खालचे हे देखील सार्वभौम सभागृह आहे आणि आपले सभागृह देखील सार्वभौम आहे. दुसऱ्या सदनातील एखाद्या सन्माननीय सभासदांनी आपल्या सभागृहाच्या कामकाजासंबंधात चर्चा उपस्थित करणे म्हणजे आपल्या सदनातील सभासदांचा कळत नकळत अवमान आहे असे माझेही मत आहे. याबाबत मी सन्माननीय अध्यक्षांना पत्र लिहिन की, आपल्या सभागृहामध्ये अशा प्रकारचा मुद्दा कोणी उपस्थित केला असेल तर तो या सभागृहाचा अवमान आहे. तेव्हा त्यादृष्टीने आपण कारवाई करावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, खालच्या सभागृहाने सांगितले म्हणून ही चर्चा स्थगित ठेवण्यात आली असा मेसेज जाऊ नये म्हणून मी उभा राहिलो आहे. तसे होऊ नये एवढीच माझी विनंती आहे.

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री विनोदजी तावडे व माननीय मुख्यमंत्री यांच्या समवेत माझी काल संध्याकाळी चर्चा झाली. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते आणि माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांची देखील चर्चा झाली होती. अति महत्त्वाच्या कामानिमित्त माननीय मुख्यमंत्री आज दुपारी बाहेर गेले आहेत. आता सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांनी अल्पकालीन चर्चेला सुरूवात करावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या विषयावर चर्चा सुरू झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडून वेगवेगळी विधाने आली आहेत. त्यामुळे या चर्चेला हे दोघेही वेगवेगळे उत्तर देऊ शकतात. कारण दोघांची मते वेगळी आहेत. त्यामुळे आपण वेगळी सूट द्यावी असे मला वाटते. या दोघांची वेगवेगळी मते आलेली आहेत. त्यामुळे आपण या दोघांना उत्तर देण्यासाठी विशेष अनुमती द्यावी. त्यामुळे या दोघांचे म्हणणे देखील समोर येईल.

सभापती : शासना मार्फत सन्माननीय मुख्यमंत्री उत्तर देतील असे मला त्यांनी आज सकाळीच सांगितले आहे आणि उप मुख्यमंत्र्यांनी ते मान्य केले आहे.

श्री.विनोद तावडे : मग ठीक आहे.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आपण ही चर्चा किती तास घ्यायची ? आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये तीन अशासकीय ठराव देखील आहेत. त्यामुळे आपण 2 तास अल्पकालीन चर्चा घेऊ या व उत्तरासाठी थांबू या. त्यानंतर अशासकीय ठराव आहेत ते आपण पुढे ढकलायचे काय ?

श्री.दिवाकर रावते : अशासकीय ठराव पुढे ढकलणार असाल तर आपण आज फक्त दोनच सन्माननीय सदस्यांना भाषण करायला अनुमती द्यावी आणि उर्वरित चर्चा नंतर घ्यावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज आपण विरोधी पक्ष नेते यांच्यासह आणखी एका सन्माननीय सदस्यांना भाषण करू द्यावे व तद्नंतर ती चर्चा आपण थांबवावी. उर्वरित चर्चा आपण सोमवारी घ्यावी.

सभापती : आज आपण चार-पाच सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यानंतर चर्चा थांबवू या.

श्री.पांडुरंग फुंडकर : आज आपण दोन जणांनाच बोलण्याची अनुमती द्यावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून दोनच सन्माननीय सदस्यांना बोलण्याची आपण अनुमती द्यावी आणि सोमवारी चर्चेला सुरूवात करावी.

सभापती : मला वाटते की, आपण आज चार सन्माननीय सदस्यांना बोलण्यास संधी द्यावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी काल नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना मांडताना माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांचे अभिनंदन करतो असे सुरूवातीला म्हटले होते. त्यांनी फार स्पष्टपणे सांगितले होते. पण माझे कालचे वक्तव्य मला आज मागे घेण्याची अनुमती द्यावी अशी विनंती करीत आहे.

सभापती : ते अभिनंदन तसेच राहू द्यावे.

श्री.विनोद तावडे : अजिबात नाही. त्यावरच मी माझे म्हणणे मांडणार आहे. माझे अभिनंदनाचे वाक्य परत घेणे का आवश्यक आहे हे मी सांगणार आहे. आता सन्माननीय गृह मंत्री सभागृहात नाहीत. ज्या गोष्टी आबांना शिताफीने जमल्या त्या अजून दादांना बहुधा जमत नाही. त्यामुळे अजितदादांनी श्री.आर.आर.आबांकडून टयूशन चालू केली पाहिजे. माझा जेन्युईन प्रश्न आहे. ज्या मंत्र्यांकडे ऊर्जा खाते आहे, अर्थ खाते आहे त्याला पत्रकार कोणत्या खात्यासंबंधी प्रश्न

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

विचारेल ? हे बजेट सेशन आहे. त्यामुळे तो पत्रकार साधारण प्रश्न बजेटसंबंधात विचारेल किंवा ऊर्जा विभागासंबंधी प्रश्न विचारेल. पण तसे न करता जे खाते माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे, सन्माननीय मंत्री श्री.संजय देवतळे यांच्याकडे आहे, त्यासंबंधीचा प्रश्न एक पत्रकार येथील एका सन्माननीय सदस्यांच्या सांगण्यावरून विचारतो आणि त्यास दादा उत्तर देतात. ते धादांत खोटे आहे असे माननीय मुख्यमंत्री सांगतात. त्यामुळे मी माझे अभिनंदनाचे वाक्य कायम कसे ठेवायचे ? ते काढलेच पाहिजे. मला दुर्दैवाने म्हणावयाचे आहे की, ...

सभापती : मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री आज सभागृहात नाहीत. ते सभागृहात असताना आपण औचित्य साधून बोलला तर ते ठीक आहे. त्यामुळे मला असे वाटते की, आपण जे बोलला ते मी तपासून घेतो. जे योग्य नाही ते मी कामकाजातून काढण्याचा प्रयत्न करीन.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री इलेक्ट्रॉनिक मीडियासमोर बोलले, खालच्या सभागृहात माननीय मुख्यमंत्री बोलले ते मी बोलतो आहे. यात तपासण्याचा सवालच कुठे येतो ?

सभापती : माझे एवढेच म्हणणे आहे की, संबंधित जबाबदारी व्यक्ती सभागृहात उपस्थित असेल तर तेव्हा आपला आक्षेप उपस्थित केला तर ते योग्य होईल. आपण जर नोटीस दिली तर एखाद्याला बोलावणे माझे काम आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आरोप करीत नाही.

सभापती : त्यामुळेच मी सांगितले की, आता पर्यंत जे काही बोलला आहात ते तपासून घेतो. एखादा शब्द चुकीचा असेल तर बघू या. नसेल तर कामकाजातून काढण्याचा प्रश्नच नाही.

यानंतर सौ.रणदिवे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता आपण आम्हाला जे निदेश दिले, त्याबद्दल मी नम्रपणे सांगू इच्छितो की, आम्ही कशासाठी नोटीस द्यावयाची? कारण ते माननीय मुख्यमंत्री आहेत आणि ते या सदनाचे नेते आहेत. तसेच आता विधानसभेचे आजचे कामकाज संपलेले आहे. तसेच त्यांनी या सभागृहामध्ये हजर असले पाहिजे हे त्यांच्यावर घटनात्मक बंधन आहे. जर एखाद्या वेळेस विधान सभेमध्ये काही प्रश्न उपस्थित झाला तर ते आपली परवानगी घेऊन त्या सभागृहामध्ये जातात आणि त्यावेळी आम्ही देखील काही काळ थांबतो की, सध्या अमुक प्रश्न उपस्थित करु नये. कारण विधान सभेमध्ये काही अडचण आहे आणि आम्ही ही बाब समजून घेतो. परंतु आज त्यांच्यावर तसेही काही बंधन नाही. कारण विधान सभेचे कामकाज संपलेले आहे, त्यामुळे त्यांच्याकडे वेळ आहे. अशा वेळी विधान परिषदेचे कामकाज सुरु असताना संबंधित माननीय मंत्री महोदयांनी येथे उपस्थित रहाणे ही त्यांची घटनात्मक जबाबदारी आहे.तसेच त्यांच्यावर या सदनानेच निर्माण केलेले घटनात्मक बंधन आहे. मग आम्ही त्यांना कशासाठी नोटीस द्यावयाची ? म्हणून मी आपल्या माध्यमातून त्यांना विनंती करतो की, माननीय मंत्री महोदयांनी घटनात्मक बंधन पाळावे आणि या सदनामध्ये उपस्थित रहावे. जर एखाद्या चर्चेच्या वेळी जर माननीय मंत्री महोदय अनुपस्थित असतील तर आम्हाला असे सांगितले जाते की, सदरहू मंत्री महोदय जरा बाहेर गेलेले आहेत. त्यामुळे अमुक-अमुक मंत्री सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्दे लिहून घेत आहेत. मग तशाच प्रकारे सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्दे टिपून त्यांना कळविण्यात यावे. आमचे काहीच म्हणणे नाही.

सभापती : सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्दे लिहून ते माननीय मंत्री महोदयांना जरुर कळविण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी याठिकाणी काही अवमानकारक बोलत नाही. परंतु विधान परिषदेमध्ये सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जे वक्तव्य केले,त्याच्या उलट वक्तव्य माननीय मुख्यमंत्र्यांनी विधान सभेमध्ये केलेले आहे. त्यांनी हे टी.व्ही. वर बोलण्याची गरजच नाही. सभापती महोदय,जेव्हा आपण सकाळी चर्चा करण्यासाठी संमती दिली, त्यावेळी माननीय उप मुख्यमंत्री उत्तर देताना 5-10 मिनिटे बोलले. त्यानंतर आम्ही परत विधान सभेच्या गॅलरीमध्ये गेलो त्यावेळी माननीय मुख्यमंत्री वेगळे बोलले. ते म्हणाले की, असे काही नाही. मी दिल्लीला जाऊन पर्यावरण विभागाची परवानगी आणीन. हे पुन्हा टी.व्ही.वर पहाण्याची गरजच नाही.या दोन्ही गोष्टी

. . . .2 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

सभागृहाच्या रेकॉर्डवर आहेत. त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्षनेते जे बोलत आहेत ते खरे आहे असे मला वाटते.

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत विधान सभेमधील जे प्रोसीडींग आहे, ते मला पहावे लागेल. तसेच आपण याठिकाणी जे काही सांगितले आहे त्याचीही मी या दृष्टीकोनातून माहिती घेईन आणि या अनुषंगाने माझे असे मत आहे की, याठिकाणी सदनामध्ये अत्यंत महत्वाची चर्चा होत असून ती योग्य त्या पध्दतीने व्हावी या अनुषंगाने . . . .

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : तसे असेल तर माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी ही चर्चा थांबवावी.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, काल ज्यावेळी आम्ही दोघांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडला, तेव्हा माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उठून सांगितले की, आमची या विषयाच्या बाबतीत कधीही चर्चा करण्याची तयारी आहे.मग ज्यावेळी त्यांनी सदरहू विषयावर चर्चा करण्याबाबत संगितले, तशी घोषणा केली, त्यावेळी त्यांना याबाबतीत कल्पना असावयास पाहिजे. त्यामुळे आता त्यांनी या सदनामध्ये थांबावयास पाहिजे. ज्यावेळी त्यांनी या सदनामध्ये सांगितले की, आपण या विषयावर केव्हाही चर्चा घ्यावी, आमची तयारी आहे. त्यामुळे जर त्यांची या विषयावरील चर्चा ऐकण्याची तयारी असेल तर मग त्यांनी येथे थांबावयास पाहिजे आणि ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे. कारण या सदनामध्ये जेव्हा माननीय उप मुख्यमंत्री सांगतात .....

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेब यांना सांगू इच्छितो की, मी काल याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले की, सदरहू विषयाच्या बाबतीत विरोधी पक्षाने नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. याबाबत सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते आणि माननीय मुख्यमंत्री यांच्या बरोबर माझे बोलणे झालेले आहे. त्यावेळी मी त्यांना विचारले की, याबाबतीत शासनाची भूमिका काय आहे ? त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्ही सदरहू विषयावर चर्चा करण्यासाठी तयार आहोत आणि ही शासनाची भूमिका आहे म्हणजे शासन आणि अन्य जे कोणी असतील त्या सगळ्यांची ही भूमिका आहे.

श्री.रामदास कदम : शासन म्हटल्यानंतर त्यात सगळ्यांचा समावेश आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : शासन म्हटल्यानंतर त्यामध्ये सगळेजण येणारच म्हणजे शासन आणि अन्य जे कोणी असतील ते. मग त्यामध्ये माननीय मुख्यमंत्री असतील, माननीय उप मुख्यमंत्री असतील किंवा अन्य माननीय मंत्री महोदय असतील. आता सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी माझ्या भाषणास सुरुवात केल्यानंतर त्यामध्ये कोणताही आरोप केलेला नाही. त्यामुळे नियम 35 अन्वये नोटीस देण्याची गरज नाही. उदाहरण द्यावयाचे तर माननीय मंत्री श्री.संजय देवतळे यांच्याकडे पर्यावरण विभाग आहे. अशा वेळी माननीय मंत्री महोदयांकडे पत्रकार आल्यानंतर त्यांना कोणता प्रश्न विचारणार तर सहाजिकच पर्यावरण विभागाशी संबंधित प्रश्न विचारला जाईल.माननीय मंत्री महोदयांना नगर विकास विभागाबद्दल प्रश्न विचारला जाईल काय, तर नाही. मग हे कसे झाले? तसेच अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला काय झाले आणि यामध्ये कोणाला कुणावर कुरघोडी करावयाची होती आणि कोणाला कोणावर कुरघोडी करुन हा इश्यु पुढे आणावयाचा होता ? अशी जर माझ्या मनामध्ये शंका आली तर ते खोटे आहे काय? चूक आहे काय ? तशी शंका माझ्या मनामध्ये आली. त्यामुळे मला माझे अभिनंदनाचे वाक्य मागे घ्यावयाचे आहे आणि आपण त्यासाठी मला अनुमती द्यावी एवढेच माझे म्हणणे आहे.

. . . .2 के-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे

स्मारक बांधण्यास केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी न देणे

मु.शी.: अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्यास केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी न देणे या विषयावर सर्वश्री.विनोद तावडे,दिवाकर रावते,पांडुरंग फुंडकर,रामदास कदम,जयंत प्र.पाटील,संजय केळकर,डॉ.दीपक सावंत,सर्वश्री प्रितमकुमार शेगांवकर,चंद्रकांत पाटील,डॉ.नीलम गोऱ्हे,श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर,केशवराव मानकर,रामनाथ मोते,सय्यद पाशा पटेल,डॉ.रणजित पाटील, विनायक मेटे,रमेश शेंडगे, हेमंत टकले वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

सन 2008 मध्ये शासनातर्फे अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य-दिव्य स्मारक बांधण्याची करण्यात आलेली घोषणा, त्यानुसार छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारुढ पुतळयाचे 309 फुटांचे स्मारक बांधण्यासाठी 350 कोटी रुपयांची तरतूद करण्याची घोषणा करुन त्याबाबतची निविदा काढण्यात येणे, तथापि, सागरी किनारा नियमावलीचे उल्लंघन होत असल्याने केंद्रीय पर्यावरण विभागाने स्मारक बांधकामास परवानगी न देणे, या स्मारकास परवानगी मिळण्यासाठी ठोस प्रयत्न शासनाने केले नसणे, यामुळे महाराष्ट्रातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, वास्तविक पहाता सागरी किनारा नियंत्रण नियमावली ही सन 1991 पासूनच लागू असून, याबाबत कोणतीही खातरजमा केल्याशिवाय हे स्मारक बांधण्याचा निर्णय घेण्यात येणे, या सर्व बाबी विचारात घेता, या संदर्भात या सभागृहाने केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे विशेष बाब म्हणून, सागरी किनारा नियंत्रण नियमावलीतून सूट मिळण्यास्तव ठराव संमत करुन पाठविण्याची आवश्यकता, या बाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती, तसेच नियम 93 अन्वये सूचना देखील उपस्थित केली होती. मी त्यांना सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याबाबत आज सदनामध्ये चर्चा होणार असल्याने आपण सदनामध्ये उपस्थित रहावे. परंतु ते थांबले नाहीत.

यानंतर कु.थोरात . . ..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

त्यांना असे वाटले असावे की, येथील कुठल्या तरी सन्माननीय सदस्यांनी कोणा तरी पत्रकाराला सांगितले आणि मग त्यांनी प्रश्न विचारला, मग दादा बोलले असे मी या ठिकाणी सांगणार आहे आणि हे बोलतांना आपण असलो तर अडचण होईल म्हणून ते थांबले नाहीत की काय मला माहीत नाही. पण ते सभागृहात उपस्थित राहणार नाहीत हे मला माहीत असते तर मी नियम 35 अन्वये नोटीस दिली असती. ते सभागृहात उपस्थित राहिले नाहीत याला मी काय करु शकतो. पण हे घडले आहे. हे घडले आहे याची मला माहिती आहे. पण असे करण्याची गरज काय? महाराष्ट्रामध्ये निवडणुका झालेल्या आहेत. निवडणुकीच्यावेळी अशा प्रकारचे भावनात्मक राजकारण केले असते तर मी समजू शकलो असतो. खरे म्हणजे आता देशाचे राजकारण वेगळे वळण घेत आहे. श्री. अखिलेश यादव यांच्याशी चर्चा करत असताना अशा भावनात्मक विषयाला कोणी हात घातला नव्हता. पण ज्यावेळी सगळा महाराष्ट्र शांत असताना वातावरण नीट असताना कुठे तरी निवडणुकीमध्ये मास्टर की माझ्याकडे आहे की तुमच्याकडे असा जो विषय निघाला त्याचा हिशेब चुकता करावयाचा आहे म्हणून कारण नसताना,गरज नसताना कुरघोडी करावयाची आहे का? प्रश्न उपस्थित करुन, त्याचे उत्तर देऊन, नंतर सभागृहात गदारोळ होणार आणि सभागृह बंद पडणार हे कशासाठी करावयाचे, का करावयाचे? छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने अशा प्रकारचे वातावरण महाराष्ट्रात निर्माण झाले पाहिजे इतक्या रसातळाला महाराष्ट्र गेला आहे का?

सभापती महोदय, मुळात छत्रपती शिवरायांच्या नावाचा वापर कशा प्रकारे केला गेला आहे या संदर्भात जेम्स लेनच्या संदर्भातील सर्व माहिती माझ्याकडे आहे. सन्माननीय मंत्री श्री. सुनील तटकरे यांनी रायगडच्या पायथ्याशी शिवसृष्टी उभी करण्यात येईल असे म्हटले होते, त्याचे काय झाले? त्या बद्दलची माहिती देखील माझ्याकडे आहे. सभापती महोदय, हे कशासाठी करावयाचे? माझ्याकडे सन 2004 चा काँग्रेस-राष्ट्रवादी पक्षाचा संयुक्त जाहीरनामा आहे. त्या जाहीरनाम्यामध्ये असे म्हटले आहे की, "महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि अस्मिता छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती भव्य पुतळा अरबी समुद्रात दर्जेदार संकुलासह उभा करण्याचे अभिवचन आम्ही महाराष्ट्राला देत आहोत. कन्याकुमारी येथे स्वामी विवेकानंद यांचे जसे भव्य स्मारक साकारले आहे त्याच धर्तीवर 100 कोटी रुपयांच्या भव्य संकुलासह हा पुतळा उभा केला जाईल." या जाहीरनाम्यात फक्त झोपडपट्टी विषयीची प्रिंटिंग मिस्टेक झालेली आहे असे त्या वेळच्या अध्यक्षांनी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

मान्य केले होते. स्मारकाबाबत प्रिंटिंग मिस्टेक झालेली आहे असे म्हटले नव्हते. आपण सन 2004 च्या जाहीरनाम्याच्या आधारे मते घेतली असतील. त्यानंतर या विषयाच्या संदर्भात दिनांक 4 जुलै, 2005 रोजी माननीय मुख्यमंत्री यांनी एक बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये एक समिती गठीत करण्यात आली. त्या समितीची पहिली बैठक दिनांक 28 ऑक्टोबर, 2005 ला झाली. आम्हाला असे वाटले की, फारच चांगल्या गतीने काम चालले आहे. त्यानंतर सन 2005 ला या समितीचे कामकाज थांबले त्यानंतर जेव्हा सन 2009 च्या निवडणुकांचे पडघम सुरु झाले तेव्हा पुन्हा या शासनाला छत्रपती शिवाजी महाराज आठवावयास लागले. मग दिनांक 2 जून, 2008 ला स्मारक उभे करण्याचा निर्णय झाला. सन 2004 ते सन 2008 पर्यंत हे शासन शांत होते. सन 2008 ला निवडणुका येणार असल्यामुळे या संदर्भात कुठले विषय घ्यावयाचे याचे चिंतन आणि मंथन सुरु झाले. मग काय करावयाचे याचा विचार सुरु झाला.

सभापती महोदय,महाराष्ट्रातील एक वर्ग असा आहे की, शिवरायांच्या नावाने काहीही केले तरी "छत्रपती शिवाजी महाराज की जय" त्यामुळे दिनांक 6 नोव्हेंबर, 2008 ला छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. दिनांक 6 जुलै, 2009 मध्ये बेन्स्ले डिझाईनर स्टुडियो, थायलंड, टिम - 1 आर्किटेक्ट मुंबई यांची निवड झाली. दिनांक 18 नोव्हेंबर, 2009 ला या स्मारकाच्या करारनाम्याच्या संदर्भात अभिप्रायाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नस्ती पाठविण्यात आली. दिनांक 5 जानेवारी, 2010 रोजी करारनाम्याचे प्रारुप कौन्सिल ऑफ आर्किटेक्ट यांच्या मार्कनुसार असल्याचे मत आले. त्यानंतर दिनांक 2 फेब्रुवारी, 2010 रोजी म्हणजे निवडणुका झाल्यानंतर या संबंधीची कार्यवाही सुरु झाली. विधी व न्याय विभागाच्या अभिप्राया नुसार या सगळया संदर्भात मुंबई, केंद्र शासनाच्या परवानगीसह इतर परवानग्या घेण्याविषयीची अट असल्यामुळे बांधकाम विभागाने त्या नुसार सुधारणा केल्या. सप्टेंबर, 2011 पर्यंत ही फाईल सार्वजनिक बांधकाम विभाग, विधी व न्याय विभाग, सामान्य प्रशासन विभाग या सर्व विभागात फिरत होती. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्या विषयीची फाईल इकडून-तिकडे आणि तिकडून-इकडे फिरत होती मात्र प्रगती काहीच होत नव्हती.

यानंतर श्री. बरवड....

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

सप्टेंबर, 2011 ला ती फाईल पर्यावरण विभागाकडे गेली. तेथून 1 ऑक्टोबरला ती फाईल सामान्य प्रशासन विभागाकडे आली आणि सामान्य प्रशासन विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे फाईल आल्यानंतर 17 जानेवारीपासून ती फाईल त्या विभागामध्ये धूळ खात पडलेली आहे. माननीय मंत्री महोदय श्री. संजय देवतळे साहेब जी कागदपत्रे बघत आहेत तीच कागदपत्रे माझ्याकडे आहेत. हा जो क्रम मी सांगितला ते पाहून मला खरोखर वाईट वाटते. आपण एखादी घोषणा करतो, जाहीरनाम्यामध्ये देतो आणि ती प्रिंटीग मिस्टेक नसेल तर त्या बाबतीत प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत. ते प्रयत्न होत नसतील तर सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांच्या सारखे त्या पक्षाचे जे हाडाचे मूळ सदस्य आहेत त्यांनी या विषयाच्या संदर्भात पाठपुरावा केला असेल. परंतु तो पाठपुरावा झाला नाही.

सभापती महोदय, 2009 च्या बाबतीत मी सांगितले की, निवडणुकीच्या आधी हा सगळा निर्णय त्यांनी घेतला. आता सगळ्यात महत्वाचा मुद्दा असा आहे की, पर्यावरण खात्याची परवानगी नाही त्यामुळे हे स्मारक होऊ शकणार नाही असे काल सांगितले गेले. हे जे सांगितले गेले ते कानात सांगितले का ? माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील साहेब आता सभागृहात उपस्थित झालेले आहेत. आबा यातील गुरु आहेत. आबांनी ज्या खुबीने जेम्स लेनचा विषय चालविला त्या पध्दतीने दादांनी जर आपल्याकडून थोडी शिकवणी घेतली असती तर या बाबतीत जी गडबड झाली तसे ते एक्स्पोज झाले नसते. आबा, आपण एक्स्पोज झाला नाही. आपण डान्स बार बंद केले पण आता ते चालू आहेत तरीही आपण एक्स्पोज झाला नाहीत. विधानसभेत आणि या सभागृहामध्ये सीडी दिली तरी कारवाई झाली नाही. आताही सीडी आणून देऊ शकतो. महत्वाचा मुद्दा असा आहे की, आबा, आपल्यामध्ये जी खुबी आहे ती आपण थोडीशी दादांना द्यावी. त्यामुळे अशा पध्दतीने अंगलट येणार नाहीत एवढेच मला म्हणावयाचे आहे.

सभापती महोदय, केंद्रीय पर्यावरण खात्याची परवानगी नाही त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी पालकमंत्री आणि सचिव यांना नवीन जागा हुडकायला सांगितली असे जे म्हटले ते परवा आम्हाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

खरे वाटले. काल मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यानंतर ते असत्य आहे असे लक्षात आले. आम्हाला दोघांचेही खरे मानले पाहिजे. म्हणून मी विनंती केली की, दोघांनाही उत्तर देऊ द्यावे. त्यातून मग काय खरे आहे आणि काय असत्य आहे ते आपण ठरवू. काल जे म्हटले होते त्यानंतर पुन्हा मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यावर ते असत्य आहे असे लक्षात आले. सगळ्यात महत्वाची गोष्ट अशी आहे की, शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या प्रकल्पाविषयी जर खरोखर हे सरकार प्रामाणिक असते तर हे झाले असते. एका लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी उभे राहून सांगितले की, मी केंद्रात जाऊन परवानगी आणून छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करुन दाखवतो. त्यांनी असे या ठिकाणी सांगितल्यानंतर भावनेने आम्ही सगळ्यांनी बाके वाजवली आणि घोषणा दिल्या. आम्हाला असे वाटले की, दोन वर्षात स्टॅच्यू ऑफ लिबर्टीपेक्षा दोन फूट उंच शिवराय दिसणार आणि मग या ठिकाणी येणाऱ्या लोकांना आम्ही सांगू शकू की, हा आमचा आदर्श आहे, हे आमचे श्रध्दास्थान आहे. पण कसले काय ? या ठिकाणी 'आदर्श' बघावयास मिळते. या ठिकाणी 'आदर्श' इमारत दाखविता येते. तो आदर्श स्टॅच्यू ऑफ लिबर्टीपेक्षा उंच आहे. ज्यावेळी या संदर्भातील फाईल माननीय श्री. संजय देवतळे साहेबांच्या खात्याकडे आली तेव्हा आपल्या खात्याने अतिशय नीटपणे तपासली. उगीचच आपल्या खात्याला बदनाम करणे चालू आहे. आपल्या खात्याने या प्रपोजलच्या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडे एक 22 पानांचा छापील फॉर्म पाठवला आणि सांगितले की आपण हा फॉर्म भरुन या नमुन्यासह ते एनसीझेडएमएकडे म्हणजे कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीकडे पाठवावे. ते भरुन पाठविल्यानंतर मग आम्ही केंद्राकडे पाठवू. मग केंद्राकडून त्या बाबत जे काही अभिप्राय येतील त्यातील काही कम्प्लायन्स जर आपण केले तर या बाबत काही होऊ शकते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

हा प्रकल्प सीआरझेडच्या अधिसूचनेतील कलम (1) व (4) मध्ये येत असल्यामुळे कोणत्या गोष्टी होऊ शकतात, कोणत्या होऊ शकत नाहीत याबाबत राज्याच्या पर्यावरण विभागाने अतिशय चांगल्या पध्दतीने उल्लेख केलेला आहे. राज्य सरकारच्या पर्यावरण खात्याने खोडा घातलेला नाही. या विभागाकडून ती फाईल महिन्याभरात पुढे गेली होती. ही फाईल सामान्य प्रशासन विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये धूळ खात पडली होती. सामान्य प्रशासन विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला असे कळविले की, 22 पानी अर्जातील सर्व तांत्रिक बाबी भरुन सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवाव्यात. परंतु आजपर्यंत ते काम झालेले नाही. तो फॉर्म जर शासनाकडे नसेल तर तो आमच्याकडून घेऊन भरुन पाठवावा. 2004 साली या स्मारकाची घोषणा झाली होती. त्यावेळी हे काम झाले असते. दि.6.6.2011 रोजी हा सीआरझेडचा कायदा आला. त्यावेळी तो नव्हता. त्यामुळे हा प्रकल्प करुन घेणे सोपे होते. आता छत्रपती शिवरायांचे समुद्रात स्मारक जर झाले नाही तर त्याला काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचे आघाडी सरकार व त्यांची सर्व प्रशासकीय यंत्रणा जबाबदार असेल आणि ही बाब महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये लिहावी लागेल. हा प्रकल्प मार्गी लावावयाचा असेल आणि शासनाला बदनामीचा डाग लावून घ्यावयाचा नसेल तर यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले पाहिजेत. इच्छा असेल तर रस्ता दिसतो, मार्ग दिसतो. यामध्ये "हे स्मारक उभारण्याविषयी काहीही म्हटलेले नाही." It is silent on that subject. यामध्ये असेही म्हटले आहे की, सीआरझेडच्या अधिसूचनेच्या कलम (11) नुसार समुद्रात भराव घालून समुद्रात जमीन बनविता येते. तसेच सीआरझेडमध्ये कोणत्या प्रोहिबिटेड ॲक्टिव्हिटीज आहेत ते नमूद केलेले आहे. यामध्ये पोर्ट, जेट्टीज्, व्हार्व्स, क्वेज, स्लीप वेज्, ब्रिजेस, सी-लिंक, रोड ऑन स्टील्टस् आणि डिफेन्ससाठी आवश्यक असेल ते करता येते असेही नमूद केलेले आहे. सभापती महोदय, हा कायदा सभागृहानेच केलेला आहे. या कायद्यानुसार डिफेन्सला परवानगी दिलेली आहे, पोर्ट बांधण्यासाठी परवानगी दिलेली आहे, हे स्मारक स्टील्ट वर्कद्वारे करावे. ज्यामुळे पर्यावरणाची हानी होणार नाही. त्यामुळे परवानगी मिळू शकते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.विनोद तावडे....

नवीन मुंबई विमानतळासाठी परवानगी मिळणार नाही असे सर्वांचे ठाम मत होते. तरी देखील श्री.जयराम रमेश यांनी असे म्हटले होते की, मी हा निर्णय पर्यावरणाच्या विरोधात जाऊन करीत आहे. कारण विमानतळ ही मुंबईची गरज आहे. त्यासाठी 150 एकर जागेवर मॅनग्रोव्हजचे रिप्लान्टेशन करण्यासाठी पहिल्यांदा परवानगी मिळाली होती. तशा प्रकारची परवानगी शिवरायांच्या पुतळ्यासाठी मिळू शकणार नाही काय, मिळेल. परंतु शासनाकडून केंद्र शासनाकडे अर्जच गेला नाही. अर्ज न करताच परवानगी मिळणार नाही, मिळतच नाही, हे स्मारक कसे होणार ? आता ते दुसरीकडे बांधू अशा प्रकारची चर्चा कशासाठी केली जाते ? या सगळया विषयाबाबत विहित नमुन्यात सर्व अर्ज वेळेत केले आणि ज्या काही अटी आहेत त्याला बाधा न येता निकषामध्ये बसवू शकतो हे केंद्र सरकारला पटवून द्यावे. त्या उपर त्यांचे काही म्हणणे असेल तर या प्रकल्पात बदल करण्याबाबत कोठे तरी चर्चा झाली आहे काय ?

लवासा प्रकल्पामुळे केंद्रीय पर्यावरण मंत्री बदलण्यात आले असे लोक म्हणतात, त्यातील खरे खोटे काय आहे ते माहीत नाही. लवासासाठी केंद्रीय मंत्री बदलण्यात येतात, मग आमच्या छत्रपती शिवरायांसाठी हा बदल का होऊ शकत नाही ? आदर्श ही इमारत खोट्या गोष्टींमुळे उभी राहिली. छत्रपती शिवरायांसाठी खोट्या गोष्टी कराव्यात असे आम्ही सांगणार नाही. पण हे स्मारक आपण नियमात बसवू शकतो. उलट नियमामध्ये न बसविता पळवाट काढून त्या नावाचे राजकारण केले जाते. एखादा इश्यू घेतल्यामुळे आपण या राज्याचे नेते होऊ शकतो असे त्यांना वाटू लागले आहे की काय हे मला माहीत नाही. माननीय गृह मंत्र्यांनी जेम्स लेनचा विषय पोटतिडिकीने उचलला होता.

यानंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

महोदय, हा विषय हायकोर्टात गेला. माननीय गृहमंत्री महोदय, आपल्याला माहीत असेल की, हायकोर्टात शासनाची बाजू मांडण्यासाठी ॲड.बेलोसे आणि ॲड.कानडे नावाचे वकील होते, त्यांनी हायकोर्टात शासनाची बाजू भक्कमपणे मांडली नाही. हायकोर्टात शासनाची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी ॲड.बेलोसे व ॲड.कानडे यांच्यापेक्षा चांगले वकील देता आले असते. या दोन्ही वकिलांनी हायकोर्टात शासनाची बाजू चांगल्या पध्दतीने मांडली नाही. त्यामुळे शासन हायकोर्टात हरले. त्यानंतर शासनाने सुप्रीम कोर्टात केस दाखल केली. सुप्रीम कोर्टात शासनाची बाजू मांडण्यासाठी कोणते वकील होते, ते कोणत्या मंत्र्यांचे नातेवाईक होते ? शासन अशा पध्दतीचा खेळ कशासाठी खेळते ? किंबहुना अशा पध्दतीचा खेळ का केला जातो ? ते वकील ज्या मंत्र्यांचे नातेवाईक होते त्या माननीय मंत्र्यांचे नाव मला माहीत आहे. त्या वकिलांकडे ही केस देण्यासाठी माननीय मंत्री आग्रह करणार याची शासनास देखील माहिती होती. अशा प्रकारचे संवेदनशील प्रकरण एखाद्या मंत्र्यांच्या नातेवाईक असलेल्या वकिलांना देणे बरोबर नाही. त्या केसचे नंतर काय झाले ? या बाबतीत मा. उच्च न्यायालयाने व्यक्त केलेले मत मी आपल्याला वाचून दाखवितो. मा.उच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, "Advocate General was unable to produce or disclose any such material or which were the groups based on religion, race, language or religion or caste or communities who do not revere Shree Chhatrapati Shivaji Maharaj." मग या पुस्तकावर बंदी का ? छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारे आणि न मानणारे यांच्यामध्ये दंगल होईल म्हणून पुस्तकावर बंदी घातली गेली. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांना न मानणारे कोण आहेत ? असा कोणताही समाज किंवा धर्म महाराष्ट्रात आहे असे मला वाटत नाही. मग त्या कारणाने बंदी घातली असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांना विरोध करणारी अवलाद कोण आहे, हे सांगण्याची हिंमत सरकारने ठेवावयास पाहिजे होती. जर हिंमत नसेल तर उगाच कोणाला बदनाम करण्याचे कारण नव्हते. आपण त्याच कारणामुळे हायकोर्टात आणि नंतर सुप्रीम कोर्टात केस हरलो. मग त्या पुस्तकावरील बंदी मागे घेतली गेली. आमच्या छत्रपती शिवरायाचा अपमान करणारे वक्तव्य आज राजरोजपणे बाजारात फिरते आहे. त्याला कारण म्हणजे हे राज्य सरकार नालायक ठरले. या गोष्टीचे मला अतिशय वाईट वाटते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महोदय, या सभागृहात माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले होते की, या पुस्तकावर कायद्याच्या आधारे बंदी घातली होती. ज्या कायद्याच्या आधारे बंदी घातली होती, तो कायदा अतिशय कमकुवत असल्याचे आपण दिनांक 12 जुलै, 2010 रोजी मान्य केले होते. दिनांक 12 जुलै, 2010 रोजी म.वि.प.नियम 260 अन्वये प्रस्तावास उत्तर देताना माननीय गृहमंत्र्यांनी हा कायदा कमकुवत आहे, ही बाब मान्य करुन या प्रकरणाचा अभ्यास करुन डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये सदरहू कायदा दुरुस्त करण्यात येईल असे सांगितले होते. एवढेच नव्हे तर सदरहू कायदा दुरुस्तीचे विधेयक डिसेंबरच्या अधिवेशनात मांडले नाही तर मला गृहमंत्री पदावर राहण्याचा अधिकार राहणार नाही, असे वक्तव्य त्यांनी सभागृहात केले होते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जेम्स लेनच्या पुस्तकाच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने प्रतिकूल निकाल दिल्यानंतर ते पुस्तक मार्केटमध्ये येण्याची शक्यता निर्माण झाली होती. संबंधित कंपनी बरोबर मी देखील संपर्क साधला होता. त्यावेळी शहरांमध्ये आंदोलने सुरु झाली होती, त्या कंपनीने आम्ही या पुस्तकाचे पब्लिकेशन करणार नाही, या पुस्तकाच्या प्रती छापणार नाही, मार्केटमध्ये ते पुस्तक येणार नाही, अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र सरकारला लिहून दिले होते. माझ्या माहितीप्रमाणे आज त्या पुस्तकाचे सर्क्यूलेशन मार्केटमध्ये नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी माननीय गृहमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देतो की, वरळी येथील हाजी-अली सर्कलच्या ठिकाणी मुले पुस्तक विकत असतात, त्यांच्याकडे हे पुस्तक उपलब्ध आहे. मी त्या मुलांकडून ते पुस्तक खरेदी करीन आणि माननीय गृहमंत्र्यांकडे सादर करीन. मी कधी खोटे बोलत नाही. मी सभागृहात सत्य माहिती देत आहे. माननीय गृहमंत्री महोदय, मला आपल्याबद्दल अतिशय आदर आहे. मी आपल्याला उद्देशून काहीही बोलत नाही. आपण या बाबतीत जी माहिती दिली, त्याबाबत मी आपला सन्मान करतो. आपण याबाबतीत प्रामाणिक आहात असे माझे मत आहे. माननीय गृहमंत्री महोदय, या संदर्भात आपण प्रकाशकांची बैठक घेतली. ज्या कायद्याच्या आधारे आपण पुस्तकावर बंदी घातली तो कायदा कमकुवत असल्याने त्यात दुरुस्ती करण्यासंदर्भातील विधेयक आपण सभागृहात मांडणार होता. परंतु अद्यापपर्यंत ते दुरुस्ती विधेयक सभागृहात का मांडले नाही, हा खरा प्रश्न आहे. शिवाजी

..3..

श्री.विनोद तावडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराजांना न मानणारे लोक आहेत, त्यांच्यामुळे दंगल होईल, म्हणून या पुस्तकावर बंदी घातली पाहिजे अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र कोर्टात सादर केले गेले. ज्या कायद्यान्वये जेम्स लेनच्या पुस्तकावर बंदी घातली होती, तो कायदा कमकुवत ठरल्यामुळे त्या पुस्तकावरील बंदी उठवावी लागली. म्हणून तो कमकुवत कायदा दुरुस्त केला पाहिजे. कायदा दुरुस्ती बाबत माननीय गृहमंत्र्यांनी वचन दिले होते, त्या वचनाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली गेलेली नाही. काही विषयांच्या बाबतीत आपण स्वत: संवेदनशील असले पाहिजे. या देशातील, या राज्यातील श्रध्दास्थान असलेल्या व्यक्तीच्या नावे पुराव्या शिवाय काही बदनामीकारक वक्तव्ये अथवा लिखाण करु नये अशा प्रकारचा कायदा शासन करु शकते. तसा कायदा शासनाकडून का केला जात नाही यासंबंधीचा खुलासा माननीय गृहमंत्र्यांनी करावा, अशी माझी विनंती आहे. लवासासाठी निर्णय बदलले गेले...

श्री.आर.आर.पाटील : मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, सदरहू कायद्याचे दुरुस्ती विधेयक सभागृहापुढे आणण्यासाठी मी खूप प्रयत्न केले. प्रत्येकाला व्यक्ती स्वातंत्र्य आहे, भाषण स्वातंत्र्य आहे, लिखाण स्वातंत्र्य आहे. घटनेला विरोध करणारा कायदा केला जाऊ शकत नाही अशा पध्दतीचे अभिप्राय आल्यामुळे, तसा कायदा आणून सुध्दा आणि घटना विरोधी भूमिका घेऊन सुध्दा उपयोग झाला नसता.

यानंतर श्री. भोगले....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री.आर.आर.पाटील.....

आपण जो वारंवार उल्लेख करीत आहात, छत्रपती शिवरायांचे समर्थन करणारा एक वर्ग आहे आणि त्यांना विरोध करणारा दुसरा वर्ग आहे. जेम्स लेनचे समर्थन करणारा जो वर्ग आहे आणि छत्रपती शिवरायांची बदनामी करतो, जो छत्रपतींच्या विरोधातील वर्ग आहे तो कोण आहे हे मी नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. उघडपणे समर्थन केले गेले आहे. छत्रपतींच्या नव्हे तर जिजामातेच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याचा प्रकार ज्यांनी केला त्या वर्गाचे नाव माझ्याकडून पुन्हा सांगून महाराष्ट्रात मेलेल्याचे मढे उकरायची आवश्यकता नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल यांनी सुप्रीम कोर्टाचे जे जज्जमेंट उपलब्ध करुन दिले आहे त्यातील इंग्रजी मजकूर मी वाचून दाखवितो. "It is manifest that the notification does not identify the communities between which the book had caused or is likely to cause enmity. Therefore, it cannot be found out from the notification as to which communities got outraged by the publication of the book or it had caused hatred and animosity between particular communities or groups.

We feel that the statement in the notification to the effect that the book is "likely to result in breach of peace and public tranquility and in particular between those who revere Shri Chhatrapati Shivaji Maharaj and those who may not" is too vague a ground to satisfy the afore enumerated tests.".असे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. माझी एवढी बुध्दी नाही. आपण अफाट आहात. त्यावेळी कोर्टात नातेवाईक वकील देण्यापेक्षा चांगले वकील दिले पाहिजे होते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हे सगळे सांगितले होते. या पुस्तकावर कायमची बंदी घालण्यासाठी सर्व स्टेप घेतल्या होत्या. व्यक्ती स्वातंत्र्याचा कोणी गैरफायदा घेणार नाही यासाठी स्वातंत्र्य दिले आहे. त्याचा गैरफायदा घेतला गेला. जेम्स लेनला माहिती पुरविणारे कोण होते, त्याचे समर्थन करणारे कोण होते हे लपून राहिलेले नाही. उघड झालेले आहे. जेम्स लेनने त्या पुस्तकामध्ये त्यांचे आभार मानले आहेत.

श्री.भाई जगताप : नावासहित आभार मानले आहेत.

..2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, व्यक्ती स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्याचा उल्लेख माननीय गृहमंत्र्यांनी केला. त्या काळात माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांनी उल्लेख केला होता त्यावेळी मंत्रीमहोदयांनी जे वक्तव्य केले होते त्याचे प्रेस कटिंग माझ्याकडे उपलब्ध आहे. आता मंत्रीमहोदय योग्य आहे असे म्हणत आहेत. परंतु ज्यावेळी माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी म्हणाले होते तेव्हा ते योग्य वाटले नाही का?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्यावेळी वाद वाढला होता. ही गोष्ट खरी आहे की, माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी साहेबांनी विचाराचा मुकाबला विचारांनी केला पाहिजे असे म्हटले होते. त्यावेळी मी थोडी वेगळी भूमिका मांडली होती. एखाद्याच्या आईच्या चारित्र्यावर कोणी शिंतोडे उडविले तर कोणत्या विचाराने प्रतिकार करायचा याचे उत्तर त्या काळात कोणी दिले नव्हते. आताही देता येणार नाही आणि पुढेही देता येणार नाही. यापेक्षा वाद वाढवायचे नसतील तर सरकारच्या वतीने मी स्वत: आणि अनेक शिवप्रेमींनी हे पुस्तक मार्केटमध्ये विक्रीसाठी येणार नाही या दृष्टीने जन आंदोलनाच्या निमित्ताने पुरेपूर दक्षता घेतली. हे पुस्तके मार्केटमध्ये कुठेही येऊ शकत नाही असे प्रकाशकांनी शासनाला लेखी लिहून दिले आहे. याचे कोणतेही पब्लिकेशन करणार नाही असे एखादी कंपनी लिहून देते त्यावेळी छत्रपतींची बदनामी झाली हे त्या कंपनीला मान्य आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते तरुण आहेत, तडफदार आहेत. खूप आवेशाने ते बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. ते आवश्यक आहे, कारण विषय खूप गंभीर आहे. या सभागृहात त्यांनी वक्तव्य केले की, हाजी अली येथील सिग्नलच्या ठिकाणी पुस्तकांची विक्री केली जाते. अशी विक्री होत असेल तर त्यांनी पुस्तक सभागृहाच्या पटलावर ठेवावे. एवढी खबरदारी घेऊनही जर कोणी काही विपरित करीत असेल तर सरकारचे, शिवप्रेमी, महाराष्ट्र आणि देशाचा नागरिक म्हणून आमचेही कर्तव्य आहे. आम्ही त्याचा अवश्य मुकाबला करु. माझी माननीय विरोधी पक्षनेत्यांना एवढीच विनंती आहे की, त्यांनी त्या पुस्तकाची एक प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी जे म्हटले आहे ते मी आवर्जून करेन.

नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सुचविल्यानुसार मी जरुर ते पुस्तक घेईन. पण त्याचबरोबर ते देखील ज्यूस पिण्यासाठी त्या भागात नेहमी जात असतात, त्यामुळे त्यांनाही ते मिळू शकेल. माननीय गृह मंत्र्यांच्या भावना छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयाच्या बाबतीत अतिशय तीव्र असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आणि ते खरोखरच त्यांचे मत आहे. पण ही तीव्रता प्रत्यक्ष पुतळा बनवितांना का दिसून आली नाही याचे मला आश्चर्य वाटते. आमचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. नितीन गडकरी हे माननीय गृह मंत्र्यांची अतिशय चांगली नक्कल करीत असतात. ते म्हणतात की, फुले, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज अशी तीन नावे घेतली की बस, हे काहीही करायला मोकळे अशी या शासनाची परिस्थिती आहे.

माननीय श्री. सुनील तटकरे अर्थमंत्री असताना त्यांनी सन 2010-11 च्या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने सभागृहात "शिव सृष्टी" संबंधीचा उल्लेख केला होता. त्यानंतर त्यांनी आणखी काही घोषणा केल्या होत्या. अशा प्रकारे जवळजवळ पूर्ण तीर्थयात्राच त्यांनी मांडली होती. त्याचे प्रमुख कारण म्हणजे समोर निवडणुका आलेल्या होत्या. ते म्हणाले होते की, संपूर्ण जगातून पर्यटनासाठी येणाऱ्या शिव भक्तांना छत्रपतींच्या कार्याचे दर्शन घडावे यासाठी "पाचाड" येथे शिव सृष्टी प्रकल्प उभारण्यासाठी 5 एकर जमीन व 5 कोटीची तरतूद करण्यात येईल. हे ऐकून सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप आणि सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी बाके वाजवून दाद दिली होती. ही घोषणा करुन दोन वर्षांचा काळ गेला पण आजतागायत या शिव सृष्टीसाठी 5 एकर जागा सुध्दा शासन देऊ शकले नाही. बाकी कामासाठी माननीय तटकरे साहेबांना खूप जागा मिळतात पण या प्रकल्पासाठी मात्र महसूल खात्याकडून पाचाड येथे जागा उपलब्ध नसल्यामुळे खाजगी जमीन विकत घ्यावी असे सुचविले. तसेच नियोजन विभागाने निधीची मागणी केली आणि दादांनी तो नाकारला असे कधीच होणार नाही. कारण मुख्य मंत्री, उप मुख्य मंत्री होताना कोणाच्या बंगल्यावर बैठका होत असतात हे माहीत नाही काय ? तटकरे साहेबांना दादा निधी देण्यास तयार नाही, ही कुठली दादागिरी आली आणि कुठली तटबंदी करीत आहात हेच मला समजत नाही. मला इतकेच म्हणावयाचे आहे की, शासन विकासकांना शेकडो एकर जमीन देत आहे पण छत्रपती शिवरायांच्या शिव सृष्टी प्रकल्पासाठी मात्र 5 एकर जमीन सुध्दा देऊ शकत नाही, यापेक्षा लाजिरवाणी गोष्ट कोणतीच असू शकत नाही.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

महोदय, कालच्याच वर्तमान पत्रात रायगड जिल्ह्यात कार्यरत असलेले उप जिल्हाधिकारी श्री. ठाकूर यांच्या बेहिशेबी मालमत्तेसंबंधीची बातमी वाचली. ते कोण्या तरी मंत्र्यांकडे पी.एस. होते. त्यांना जरी सांगितले असते तरी त्यांनीही या प्रकल्पासाठी 5 एकर जमीन आणि पुतळा सुध्दा उभारुन दिला असता. सन्माननीय सदस्य श्री. कृपाशंकर सिंह यांनी तर आत्महत्याच केली पाहिजे. पण शासनाकडून मात्र हे होत नाही आणि त्याचे एकच कारण आहे की, या राज्यकर्त्यांची इच्छाशक्तीच दिसत नाही.

महोदय, मराठा आरक्षणाचा विषय सुध्दा असाच होता. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप आणि आपण हे सगळे विषय घेऊन गेलो होतो. त्यावेळेस तर सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना वाटत होते की, मराठा आरक्षण मंजूर झाले आणि लाल दिवा लागला. असे ते खाजगीत बोलत होते. तसेच त्यांनी शिवाजी पार्कवर सभा सुध्दा घेतली होती. त्यांचे म्हणणे असे आहे की, मराठा आरक्षणाच्या विषयामध्ये माझी प्रामाणिक भूमिका अशी आहे की, राज्यात ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या त्यात 50 टक्क्यापेक्षा जास्त प्रमाण हे मराठा शेतकऱ्यांचे आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

ही वस्तुस्थिती आहे. काही लोक राजकीय आरक्षणाची मागणी करीत होते परंतु त्यावेळी आम्ही राजकीय आरक्षणाचे समर्थन केले नव्हते. मराठा समाजाला आरक्षण द्यावयाचेच असेल तर शिक्षणासाठी व नोकरीसाठी दिले गेले पाहिजे. मराठा समाज हा आर्थिक दृष्टया मागासलेला आहे. खरे म्हणजे आरक्षण देतांना दुस-याचे आरक्षण हिरावून घेता कामा नये. ज्यावेळेस ओबीसीमध्ये मुस्लीम समाजाचा समावेश केला गेला त्यावेळेस या निर्णयाचे सर्वांनी स्वागत केले होते परंतु मुस्लीम समाज आपल्या आरक्षणामध्ये आला असता तर ते यांना मुळीच चालले नसते. केवळ भावनांचे राजकारण करण्याचे काम महाराष्ट्रात सुरु आहे. आता राजकारणाची दिशा बदलत चालली आहे. 18 ते 35 वयोगटातील 40 टक्के मतदाराला विकासाचे राजकारण हवे आहे. त्यामुळे राज्यातील नेतृत्त्वाने अशा प्रकारचे भावनिक राजकारण करण्याचे कटाक्षाने टाळले पाहिजे. विकासाचे राजकारण केले तर जननेता काका सारखे आपल्याही मित्राला होता येईल हे आपल्या मित्राला सांगा.

सभापती महोदय, निवडणुकीच्या काळातील राजकीय नेत्यांच्या मुलाखती आणि पत्रकार परिषदेच्या सीडी मागवून जमेल तशा मी पाहतो आहे. ज्यावेळेस आघाडीचे दोन मंत्री एकामेकांविरुध्द बोलत होते त्यावेळेस माननीय पवार साहेबांनी पत्रकारांसमोर एक वाक्य असे उच्चारले ते प्रेस वाल्यांनी का छापले नाही ते समजत नाही. त्यावेळेस माननीय पवारसाहेब असे म्हणाले होते की, "मी पुढील लोकसभेची निवडणूक लढवणार नसलो तरी त्याचा अर्थ मी महाराष्ट्राच्या राजकारणात लक्ष घालणार नाही असे कोणी समजण्याचे कारण नाही." हे वाक्य काय दर्शवते, राज्याचे नेतृत्व कसे केले पाहिजे, कोणत्या दिशेने केले पाहिजे ? इलेक्शन मॅनेजमेंटमध्ये आपली असणारी इफिशिअन्सी ही जननेता व्हावयास पुरेशी नसते तर त्याला चार गोष्टी टगेगिरीच्या पुढे जाऊन कराव्या लागत असतात. त्या होणार नसतील तर माझी आपल्याला विनंती आहे की, कृपया आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा अशा प्रकारे वापर करु नका. किमान या चर्चेच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगावे की, आम्ही सगळे मिळून छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील प्रकल्पाची मंजुरी केंद्राकडून आणू म्हणजे आणूच अशा प्रकारची हमी या सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला दिली पाहिजे एवढी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : या चर्चेसाठी माझ्याकडे एकंदर 21 नावे आलेली आहेत. ही चर्चा 3 तास चालेल असा विचार केला तर त्यातील 50 मिनिटांचा अवधी उत्तरासाठी लागेल असे गृहीत धरु. राहिलेली चर्चा 2 तास 10 मिनिटांपर्यंत आपल्याला संपवावी लागेल. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्यासह एकंदर 9 नावे दिलेली आहेत त्यामुळे आपल्याला यातील काही नावे कमी करावी लागतील किंवा त्यांच्या चर्चेचा वेळ कमी करावा लागेल. शिवसेना पक्षाकडून 5 नावे आली असून त्यातील 1-2 नावे कमी केली तर वेळेत चर्चा पूर्ण होईल. या चर्चेला एकंदरीत 3 तासाचा अवधी देण्यात आलेला आहे. आजची ही चर्चा 3 वाजून 6 मिनिटांनी सुरु झालेली आहे. विरोधी पक्ष नेत्यांना जेवढे आवश्यक असते तेवढे ते बोलत असतात. खरे म्हणजे ती आपली प्रथा आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा विषय महत्त्वाचा आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विरोधी पक्षातर्फे आता सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम बोलतील. सोमवारी आपण जेवढी नावे कमी करायची असतील तेवढी ती करू या.

सभापती : माझे असे मत आहे की, सदर चर्चा आपण किमान तास-दीड तास घेतली पाहिजे. त्यामुळे चार पाच जणांना बोलण्याची संधी मिळेल व एकूण नावाच्या यादीतून चार-पाच नावे कमी होतील. आज आपण अशासकीय ठराव देखील घ्यायचे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आमच्याकडून आता सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम आणि श्री.जयंत प्र.पाटील बोलतील. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते हे माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराच्या भाषणाच्या अगोदर बोलतील.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आपण आज बोलणार आहात की, सोमवारी बोलणार आहात ?

श्री.भाई जगताप : मी केव्हाही बोलण्यास तयार आहे. आपण वेळेचे बंधन घालत आहात. सुरुवातीला दोन्ही बाजूने भाषणे होतात त्यावेळी बराच वेळ जातो. त्यामुळे आपण वेळ वाटून द्यावा.

सभापती : मी 3 ऐवजी 4 तास देखील चर्चा करायला तयार आहे. आज आपण किमान दीड तास चर्चा करून चार जणांना भाषणाची संधी दिली पाहिजे. त्यामुळे आजचे तीनही अशासकीय ठराव मी पुढे ढकलत आहे. ते अशासकीय ठराव नंतर घेण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अशासकीय कामकाज आपण पुढे ढकलणार असाल तर ही चर्चा आपण सहा वाजेपर्यंत घ्यावी. ही चर्चा सोमवारी घेतली तर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या चर्चेला वेळ मिळणार नाही.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (विधान सभेने निवडलेले) : सन्माननीय सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक बनविण्याची घोषणा शासनाने केली होती. त्यासंबंधी 289 च्या प्रस्तावाची सूचना विरोधी पक्षातर्फे दिली होती. त्यानुसार आपण चर्चा मंजूर केली होती. त्या चर्चेवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये समुद्राच्या एका बाजूला राजभवन पहायला मिळते, दुसऱ्या बाजूला मलबार हिल पहायला मिळते. एका बाजूला नरीमन पॉईंटच्या उंच उंच इमारती पहायला मिळतात. अशा नितांत सुंदर अशा अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याची घोषणा शासनाने केली आहे. समुद्रातील शिवरायांच्या पुतळ्याकडे जाण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा शिवकालीन वस्तूंचे संग्रहालय उभारण्यात येईल. तसेच, शिवरायांच्या पराक्रमाची यशोगाथा माहितीपटातून दाखविण्यात येईल, असे शासनाने घोषित केले आहे. यासाठी 200 आसनाची व्यवस्था असणारे थिएटर बांधण्यात येईल, चांगले उद्याने उभारण्यात येईल. अशा प्रकारचे भव्य स्मारक उभारण्याची घोषणा शासनाने केली आहे.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांनी सन 2004 चा जाहीरनामा वाचून दाखविला.

यानंतर सौ.रणदिवे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या जाहीरनाम्यामध्ये देखील या शासनाने उल्लेख केला होता की, आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य आणि मोठे स्मारक उभारणार आहोत. याचाच अर्थ असा की, केवळ निवडणुका डोळयासमोर ठेऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या निमित्ताने राज्यातील मतदारांची मते घेण्याचे काम हे शासन करीत होते की काय असा प्रश्न माझ्याप्रमाणेच अनेक शिवसैनिकांच्या, शिवप्रेमींच्या मनामध्ये आहे.याचे कारण असे की, माझ्या हातात सन 2004 मध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत आहे आणि त्यामध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की,"छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासह त्यांचा पूर्णाकृती पुतळा अरबी समुद्रामध्ये उभारण्यासाठी माझे शासन योग्य योजना तयार करील आणि त्यासाठी केंद्र सरकारकडून आवश्यक ती परवानगी मिळवेल." 2004 मध्ये माननीय राज्यपाल यांनी जे अभिभाषण केलेले आहे, त्यामध्ये त्यांनी असा विश्वास व्यक्त केला आहे की, यासाठी माझे शासन केंद्र शासनाची परवानगी मिळवेल म्हणजेच एका बाजूला माननीय राज्यपाल हे शासनावर विश्वास ठेऊन याबाबतीत महाराष्ट्रातील जनतेला आश्वासित करीत आहेत. मात्र माननीय राज्यपालांनी जो विश्वास दाखविलेला आहे, त्यालाच हरताळ फासण्याचे काम राज्याच्या शासनकर्त्यांनी केले आहे असे जर मी म्हटले तर ते चूक आहे असे मी म्हणणार नाही.

सभापती महोदय, 2005 या वर्षीच्या अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये तत्कालीन माननीय वित्त मंत्री श्री.जयंत पाटील यांनी असा उल्लेख केला होता की, "मुंबई लगतच्या अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे. प्रस्तुत स्मारक उभारणी संबंधात शासनाला शिफारशी व कामाचे संनियंत्रण करण्याकरता प्रांतिक समिती व मानद चित्रण समिती अशा दोन समित्या नेमण्यात आल्या आहेत आणि याची प्रत माझ्या हाता मध्ये आहे. त्याबाबत ज्या दोन समित्या नेमण्यात आल्या होत्या, त्यांनी आतापर्यंत कोणते काम केले आहे त्याबाबतची माहिती माननीय मुख्यमंत्री त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगतील अशी मी येथे अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, त्यानंतर पुन्हा एकदा 2006 मध्ये सुध्दा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख करण्यात आला आहे. मात्र सदरहू उल्लेख वेगळया स्मारकाबाबत आहे, याबाबत नाही. 2004 मध्ये माननीय राज्यपाल यांनी आपल्या अभिभाषणामध्ये सांगितले की,"अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात येणार आहे." पण मी येथे माननीय गृह

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

मंत्री श्री.आर.आर.पाटील यांना सांगू इच्छितो की, 2006 मध्ये माननीय राज्यपाल यांनी असे म्हटलेले आहे की, "सातारा येथील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय हे शिवकालीन दुर्मिळ वस्तुंचे प्रदर्शन व त्यासंबंधातील अभ्यास करण्यासाठी सुरु केलेले आहे. शिवकालीन साम्राज्याने व्यापलेल्या प्रदेशातील तत्कालीन कला, संस्कृती व इतिहासातील विविध वस्तुंचे जतन करण्याच्या दृष्टीने या संग्रहालयाचे विस्तारीकरण व सुशोभिकरण करण्याचे राज्य शासनाने ठरविले असून त्यासाठी योग्य ती आर्थिक तरतूद करण्यात येईल."आता माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत काय ते सांगावे. मी सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांना सांगू इच्छितो की, 2006 मध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी तुमच्या शेजारच्या जिल्ह्याबाबत अशा प्रकारे महाराष्ट्रातील जनतेला आश्वासित केलेले आहे की, मोठ्या प्रमाणात इतिहासकालीन वस्तुंचे जतन करण्याच्या दृष्टीने सदरहू संग्रहालयाचे विस्तारीकरण व सुशोभिकरण करण्यात येईल आणि त्या साठी आर्थिक नियोजनही करण्यात येईल. परंतु मी याबाबत माहिती घेतली असता यासाठी कुठेही निधी उपलब्ध करुन दिलेला नाही.

सभापती महोदय, त्यानंतर 2009 मध्ये सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये तत्कालीन माननीय वित्त मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी पुन्हा असा उल्लेख केला आहे की, "महाराष्ट्राचे स्फूर्तीस्थान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक मुंबईमध्ये उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. हे स्मारक उभारण्यासाठी 2009-2010 या वर्षासाठी 50 कोटी रुपये इतका नियतव्यय राखून ठेवला आहे. अशा प्रकारे 2004 पासून 2009-2010 पर्यंत या शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या वेळेला माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामधून या विषयाच्या बाबतीत फक्त जनतेला आश्वासित करण्याचे काम केलेले आहे. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभ राहिले नाहीच.परंतु ते उभारण्यासाठी जे 50 कोटी रुपये ठेवण्यात आले होते, त्याचे नेमके काय झाले, ते कुठे गेले याचा देखील सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरामध्ये उल्लेख होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, त्यानंतर दि.15-7-2010 मध्ये विधान परिषदेचे सन्माननीय सदस्य श्री.वसंत पवार यांनी परत एकदा याबाबत औचित्याचा मुद्दा मांडला होता.

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. रामदास कदम. . .

सदर औचित्याच्या मुद्याला दिनांक 15-07-2010 रोजी दिलेल्या उत्तरात असे म्हटले आहे की, " स्मारकाची संकल्पना तयार करण्याच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय स्तरावर वास्तूशास्त्रज्ञांकडून स्मारकाची संकल्पचित्रे मागविण्यात आली होती त्या अनुषंगाने प्राप्त 11 प्रस्ताव उच्च स्तरीय समितीसमोर सादर करण्यात आले होते व त्यामधून टिम-1 आर्किटेक्ट इंडिया आणि बेन्स्ले डिझाईनर स्टुडियो, थायलंड या वास्तूशास्त्रीय संस्थांनी एकत्रितपणे सादर केलेल्या स्मारकाच्या संकल्पचित्राची अंतिमत: निवड करण्यात आलेली आहे" याचा अर्थ असा की, संकल्पचित्र अंतिम करण्यात आले. आर्किटेक्ट नियुक्त करण्यात आले. पैशाची तरतूद करण्यात आली आणि मंत्रालयाच्या मुख्य प्रवेशद्वारात छत्रपती शिवाजी महाराज यांचे एक मोठे तैलचित्र ठेवण्यात आले आहे. तसेच या स्मारकाचे एक मोठे मॉडेल त्या ठिकाणी आकर्षकपणे ठेवण्यात आले आहे. त्या मॉडेलसोबत माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांचे फोटो काढण्यात आले ते फोटो वर्तमानपत्रातून संपूर्ण महाराष्ट्रात छापून आले. ते मॉडेल आता नेमके कुठे आहे, ते कुठल्या अंधारात ठेवण्यात आले आहे? म्हणजे फक्त निवडणुकीच्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने राजकारण करण्याचे काम या शासनाने केलेले आहे असे म्हटले तर मी ते चुकीचे म्हटले असे मला वाटणार नाही. अशा पध्दतीने फक्त महाराष्ट्रातील जनतेलाच नव्हे तर या सदनामध्ये आश्वासने दिली गेली. स्वत:च्या आश्वासनांनाच हरताळ फासण्याचे काम या शासनाच्या माध्यमातून झालेले आहे, म्हणून एकदा ही गोष्ट स्पष्ट झाली पाहिजे.

सभापती महोदय,सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जे सांगितलेले आहे ते मी स्वत: दूरचित्र वाहिनीवर पाहिलेले आहे. या राज्याचे उप मुख्यमंत्री माननीय श्री. अजित पवार यांनी दूरचित्र वाहिनीवरुन जी माहिती दिलेली आहे ती मी स्वत: माझ्या डोळयांनी पाहिलेली आहे आणि स्वत: माझ्या कानांनी ऐकलेली आहे. माननीय उप मुख्यमंत्री यांनी स्पष्टपणे असे म्हटले होते की,"छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रामध्ये स्मारक करण्यासाठी केंद्रीय पर्यावरण विभागाकडून परवानगी मिळत नाही म्हणून पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली आहे. त्या समितीने जागा देखील पाहिली आहे. ती जागा मी आता सांगणार नाही कारण नंतर त्याला फाटे फुटतात" फाटे फुटतात हा शब्द मी स्वत: ऐकलेला आहे. माननीय उप मुख्यमंत्री यांनी केलेले स्टेटमेंट मी स्वत: ऐकलेले आहे. सभापती महोदय, अशा पध्दतीने या राज्याच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम. . .

उप मुख्यमंत्री यांनी स्वत: पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्रातील जनतेला माहिती दिलेली आहे आणि सांगितलेले आहे की, "आता समुद्रामध्ये हे स्मारक होणार नाही." सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेमध्ये असे सांगितलेले आहे की, "मी आता पुन्हा प्रयत्न करीत आहे. मी श्री. जयराम रमेश यांना भेटलो होतो पण आता त्यांच्याकडे पर्यावरण विभाग नाही. त्यामुळे आता नव्याने आलेल्या पर्यावरण मंत्र्यांना मी भेटलो आहे. कुठल्याही परिस्थितीत मी केंद्र शासनाकडून परवानगी आणणार आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक समुद्रात उभे करणार."

सभापती महोदय, थोडयावेळा पूर्वी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी म्हटल्या प्रमाणे आता नेमका विश्वास कोणावर ठेवावयाचा. ज्यावेळी एखादी समिती माननीय पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केली जाते त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांना बाजूला ठेवून समिती गठीत केली जाते का? माननीय मुख्यमंत्र्यांना या समितीची माहिती नव्हती का? आम्ही नेमके काय समजावयाचे? म्हणून सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उल्लेख केला की, माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असते तर या बाबतचा उलगडा झाला असता. माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा केलेला आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या संबंधीचा खुलासा केला पाहिजे आणि एकदा यासंबंधीचे चित्र स्पष्ट झाले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने फक्त राजकारण केले जात आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम राज्य शासनाने, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेले आहे. थोडया वेळापूर्वी या ठिकाणी सांगितल्या प्रमाणे एका बाजूला लवासासाठी शेवटपर्यंत प्रयत्न केले जात आहेत. नवी मुंबईमध्ये विमानतळ होण्यासाठी कायदा बदलला जात आहे. सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, गोव्यामध्ये समुद्रामध्ये हॉटेल्स झालेले आहेत. वांद्रे ते वरळी हा जो सेतू मार्ग तयार करण्यात येत आहे तो समुद्रामध्ये करण्यात येत आहे. त्यासाठी लागणारी परवानगी राज्य शासनाने घेतलेली आहे. मग छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाच्या संदर्भात असे का होत आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. रामदास कदम ....

छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा लोकसभेसमोर देखील बसविला गेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त महाराष्ट्राचे नाही तर ते या देशाचे आहेत, या हिंदुस्थानचे आहेत. त्यांचा दिमाखदार भव्य पुतळा लोकसभेसमोर देखील बसविलेला आहे. पण आपली मानसिकता कोठे आहे ? आपण फक्त निवडणुका समोर बघता आणि जाहीरनामे काढता. निवडणुका बघता आणि अर्थसंकल्पामध्ये फक्त घोषणा करता. निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन आपण माननीय राज्यपालांच्या तोंडी अशा गोष्टी टाकणे हा या सभागृहाचा अवमान आहे. यामुळे सदनाचा अवमान होऊ शकतो.

सभापती महोदय, एका बाजूला आपण विमानतळासाठी प्रयत्न करीत आहात आणि त्यासाठी कायदा बाजूला ठेवत आहात. आपली 'आदर्श' इमारत उभी राहते तेव्हा हे सरकार झोपले होते का ? त्या इमारतीला परवानगी नव्हती. एवढी मोठी इमारत बांधली जाते तेव्हा सरकार झोपले होते का ? काही गोष्टी स्पष्ट होणे आवश्यक आहेत. एका बाजूला निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन आपण या स्मारकाची घोषणा करता आणि दुसऱ्या बाजूला या मुंबईमध्ये जे 14 किल्ले आहेत त्या किल्ल्यांचे नेमके काय झाले ? आपल्याला जर शिवाजी महाराजांच्या बाबतीत एवढे प्रेम आहे, एवढी आस्था आहे, एवढी आपुलकी आहे तर या मुंबईमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे जे 14 किल्ले होते त्यांचे काय झाले ? ते किल्ले नामशेष झाले. इतिहासाची ओळख सांगणाऱ्या या 14 किल्ल्यांचे काय झाले हे माननीय मुख्यमंत्र्यांनी, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगावे. महाराष्ट्रामध्ये जे 47 किल्ले आहेत त्यांची पडझड होते. त्यातील जवळजवळ निम्मे किल्ले नामशेष झाले. सरकार कोठे आहे ? छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घेऊन निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन हे शासन वागत आहे. माझी अशी जाहीर मागणी आहे की, या शासनाने तोंड काळे करुन येथून चालते व्हावे. सरकारने राजीनामा द्यावा अशी मागणी करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये विरोधी पक्ष नेते आदरणीय श्री. विनोद तावडे आणि इतर सर्व सहकाऱ्यांनी या अतिसंवेदनशील विषयावर जी चर्चा सभागृहामध्ये घडवून आणली आहे त्या चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी मी उभा आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज असो, राजर्षी शाहू महाराज असो, फुले-आंबेडकर असो, ही सगळी दैवते कोणत्याही विशिष्ट पक्षाची आहेत किंवा ते पक्ष त्या दैवतांच्या आधारावर चालले आहेत किंवा चालविण्याचा प्रयत्न करीत आहेत असे कोणी समजण्याचे कारण नाही. तुम्हा-आम्हालाच नव्हे तर इतिहासाला आणि या जगाला प्रेरणा देणारे आणि शौर्याचा संदेश देणारे ते राजे होते. तो एक असा जाणता राजा होता की ज्यांनी त्या काळामध्ये सुध्दा सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्यांच्या स्मारकाच्या संदर्भामध्ये होणारे राजकारण पाहिल्यानंतर कदाचित वर छत्रपतींना सुध्दा वाईट वाटत असेल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

सभापती महोदय, मला या ठिकाणी मुद्दाम सांगावयाचे आहे की, हे शासन छत्रपतींच्या स्मारकासाठी कटिबध्द आहे. पण आपण नेमके कशाचे राजकारण करण्यासाठी निघालो आहोत, अरबी समुद्रात हे स्मारक व्हावे म्हणून की होऊ नये यासाठी हे राजकारण चालू आहे, छत्रपतींचे स्मारक होणार नाही असे कोण म्हणाले आहे, कोणाच्या तोंडातून हे शब्द बाहेर आले आहेत ? पण गृहित धरुन आपल्या राजकीय पोळ्या भाजून घ्यावयाच्या. छत्रपतींच्या 300 मीटरच्या पुतळयाबाबत आपण काय सांगत आहात, सेना भवनातील पुतळयाबाबत जरा सांगावे. तेथील छत्रपतींच्या पुतळ्याची साईज सांगावी. त्या पुतळयाच्या वर असलेल्या आदरणीय बाळासाहेबांच्या चित्राची साईज आम्हाला सांगावी. छत्रपतींच्या नावाचे राजकारण करुन...(अडथळा) मी फोटो असेच म्हणालो आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना फोटो व पुतळा यातील फरक समजत नाही, हा पागल माणूस आहे काय ? हा माणूस पागल झालेला आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी माझ्याकडे बघून बोलावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी 'बाळासाहेबांचे चित्र' असाच उल्लेख केलेला आहे. म्हणून छत्रपतींच्या बाबतीत हा उसना पुळका कोणी दाखवू नये. छत्रपतींचे नाव घेऊन या महाराष्ट्रात यांनी साडेचार वर्षे राज्य केले. त्यावेळी त्यांना छत्रपतींच्या पुतळ्याची किंवा स्मारकाची साधी आठवण सुध्दा आली नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

सभापती : सन्माननीय सदस्यांना काही बोलावयाचे आहे काय ? ही चर्चा व्यवस्थितपणे चालू आहे. पण या चर्चेच्या वेळी दोन्ही बाजूने काही पथ्ये पाळणे गरजेचे आहे. मग माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे भाषण असेल किंवा सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांचे भाषण असेल. माझी अशी इच्छा आहे की, ही चर्चा चांगल्या पध्दतीने व्हावी. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सुध्दा मी सांगेन की, आपण भाषण करीत असताना संबंधित विषयाला धरुन बोलावे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी 2004 साली राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये काय नमूद केले होते ते वाचून दाखविले आहे. 2004 सालातील अर्थसंकल्पीय भाषणात माननीय मंत्री महोदयांनी काय म्हटले होते ते मी वाचून दाखविले आहे. ही सर्व कागदपत्रे माझ्या घरुन छापून आणलेली नाहीत. 2004 सालापासून 2012 पर्यंत 8 वर्षे काय केले नाही ते आम्ही सांगितले आहे. काँग्रेस भवनमध्ये छत्रपतींचा पुतळा आहे काय, असा उल्लेख आम्ही केला नाही. शिवसेना भवनाचा या स्मारकाशी काय संबंध आहे ?

सभापती : मला असे वाटते की, दोन्ही बाजूने पथ्ये पाळली पाहिजेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, दोन्ही बाजूचा प्रश्न येत नाही. आम्ही काँग्रेस भवनचा उल्लेख केलेला नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आदरणीय सदस्य श्री.भाई जगताप, या सभागृहातील छत्रपती असे म्हणाले की, कारण त्यांना छत्रपतीच म्हणावे लागेल. ते असे म्हणाले की, यामध्ये कोणाचे राजकारण आहे, कोण काय करीत आहे ? त्यावर मी त्यांना असे म्हणालो की, आपण पागल सारखे बोलू नका. सभापती महोदय, आपण ही चर्चा मान्य केली आहे.

सभापती : पागल हा शब्द असंसदीय आहे.

श्री.दिवाकर रावते : मी तो शब्द वापरला ते माझे चुकले आहे. या चर्चेला आपण मान्यता दिल्यानंतर सरकारने ती स्वीकारली आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या सभागृहात आतापर्यंत जे काही झाले त्याबाबत निवेदन केलेले आहे. यात राजकारणाचा कोणता विषय आहे ? आपल्या निर्णयाला सन्माननीय सदस्य राजकारण असे संबोधत आहेत, हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मी सांगू इच्छितो की, दोन्ही बाजूने ही चर्चा अत्यंत उच्च प्रतीची व्हावी अशी माझी इच्छा आहे. मघाशी बोलताना आपण बाळासाहेबांचा उल्लेख केला होता, तो उल्लेख कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी तयारी आहे.

डॉ.दीपक सावंत : आपल्या तयारीचा हा प्रश्न नाही तर माननीय सभापतींनी आपल्याला आदेश दिलेला आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, समोरच्या बाजूला बसलेले सन्माननीय सदस्य किती अस्वस्थ होत आहेत ते मला दिसत आहे.

यानंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आपण सगळयांनी पथ्य पाळणे गरजेचे आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी अस्वस्थ झालेलो नाही. माझा तोल गेलेला नाही. समोरच्या सन्माननीय सदस्यांच्या भाषेत बोलावयाचे झाले तर मी वेडेपणा सुध्दा करीत नाही. मी अतिशय साधी वस्तुस्थिती सभागृहासमोर ठेवली की, माननीय उप मुख्यमंत्री असतील, माननीय मुख्यमंत्री असतील किंवा सरकारच्या बाजूचा सदस्य असेल, त्यांच्यातील एकाने तरी सांगितले काय की....

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य हे दूरदर्शन वाहिनीवरुन बोलले आहेत..

श्री. भाई जगताप : हा वेडेपणा कोणाचा आहे हे दिसून येत आहे....

सभापती : आपण माझ्याकडे बघून बोलावे....

श्री. भाई जगताप : मी आपणाकडे बघूनच माझे विचार व्यक्त करीत आहे. आपण मला संरक्षण द्यावे अशी माझी विनंती आहे...

सभापती : माझे आपल्याला संरक्षण आहे. आता सन्माननीय सदस्य हे आपले म्हणणे शांतपणे ऐकून घेत आहेत. आपण आपले विचार थोडक्यात व्यक्त करावेत.

श्री. भाई जगताप : छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होणार नाही असे सरकारमधील माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मुख्यमंत्री वा सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य यांच्यापैकी कोणीही म्हटलेले नाही. सरकारमधील कोणत्याही मान्यवरांनी असे वक्तव्य कोणीही केलेले नाही म्हणून माझा आक्षेप आहे. राजकारण कोणत्या गोष्टीचे करावयाचे हे सगळयांनी ठरवून घेतले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होईल असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जाहीरपणे सांगितले आहे आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील सांगितले आहे.

श्री. दिवाकर रावते : आदरणीय मुख्यमंत्री विधानसभेच्या सभागृहात आणि दूरदर्शनवर असे म्हणाले की, केंद्र सरकारने परवानगी नाकारली म्हणून अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होणार नाही. हे स्मारक आता कोणत्या ठिकाणी करावयाचे याकरिता जागा शोधण्यासाठी पालक मंत्री, मुख्य सचिव, अनेक अधिकारी हे आजच रवाना झालेले आहेत. केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाने अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारणीसाठी परवानगी नाकारली. त्याबाबतचा खुलासा राज्य सरकारने करावा म्हणून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

या सदनात ही चर्चा उपस्थित केलेली आहे. राजकारण करण्यासाठी ही चर्चा उपस्थित करण्यात आलेली नाही. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना मी सांगू इच्छितो की, या चर्चेचा दर्जा आपणाकडून पाळला गेला पाहिजे. आम्ही या विषयाचे मुळीच राजकारण करीत नाही.

श्री.भाई जगताप : आम्ही तर या विषयाच्या बाबतीत अजिबात राजकारण करीत नाही.

श्री. दिवाकर रावते : या विषयाच्या बाबतीत राज्य सरकारकडून खुलासा मागण्यासाठी आम्ही ही चर्चा उपस्थित केलेली आहे. सभापती महोदय, आपण या चर्चेचा आदर केलेला आहे. त्यामुळे मी आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती : या विषयाच्या बाबतीत या सभागृहात या क्षणापर्यंत सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी काहीही भाष्य केलेले नाही. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभा सभागृहात भाष्य केलेले आहे. विधानसभा सभागृह हे सार्वभौम असल्यामुळे त्या ठिकाणी देखील चर्चा होत असते. या सभागृहाची प्रथा आणि परंपरा अशी आहे की,शक्यतो त्या सभागृहात झालेल्या चर्चेचा रेफरन्स या सभागृहात दिला जात नाही. विरोधी पक्ष सदस्यांचा मुद्दा असा आहे की, या विषयाच्या बाबतीत चर्चा झाली आणि सत्ताधारी पक्ष सदस्यांचे म्हणणे असे आहे की, अशा पध्दतीची चर्चाच झालेली नाही. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल सर्वांना आदर आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातील दैवत आहे. त्यांच्या विषयी जी प्रेरणा आहे, ती दोन्ही बाजूच्या सदस्यांना सारखीच आहे.

श्री. भाई जगताप : या विषयाच्या बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे पाऊण तास भाषण आपण सर्वांनी ऐकले. तसेच मी सन्माननीय सदस्य श्री. रामदासभाई यांचे भाषण देखील पूर्णपणे ऐकले. त्यांनी सरकार विषयी जे शब्द वापरले, ते शब्द या ठिकाणी उच्चारणे मला योग्य वाटत नाही. त्यांनी नालायक असे काही शब्द वापरले. काल या सभागृहात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी शिवाजी महाराजांचे स्मारक होणार नाही असे म्हटलेले नाही.

यानंतर श्री. भोगले...

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

त्यांनी हे सांगितले की, नवीन जागेबाबत काही अडचण निर्माण झाली. त्यासाठी आता दुसरी जागा पाहिली आहे असे माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले. याचा अर्थ असा निघतो की, शासन हे स्मारक उभारण्यास कटिबध्द आहे. त्यामुळे हे स्मारक होणार नाही असे गृहित धरुन राजकारण करु नये. या चर्चेचा दर्जा मी खालावलेला नाही. म्हणून माझी विनंती आहे की, ज्या दैवताचा आपण उल्लेख केला, त्या दैवतासाठी 2004 पासून 2008 पर्यंत निर्णय प्रक्रिया सुरु होती, दरम्यानच्या काळात विरोधी पक्षाने या संदर्भात कधीही आक्षेप घेतल्याचे आम्हाला आठवत नाही.

सभापती महोदय, केंद्रीय पर्यावरण विभागाने ज्या वेळेला सामान्य प्रशासन विभागाकडे सूची दिली, जो फॉर्म भरुन मागविला होता तो फॉर्म वेळेवर का भरुन दिला नाही? झारीतील शुक्राचार्य कोण आहेत याचा खुलासा करणे आवश्यक आहे. छत्रपतींच्या भावनांशी, राज्यातील 11 कोटी जनतेच्या नव्हे तर भारतातील जनतेच्या भावनांशी कोणी खेळण्याचा प्रयत्न केला असेल तर त्या अधिकाऱ्याला जरुर शासन झाले पाहिजे ही मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, या सभागृहात ज्यावेळी चर्चा झाली होती त्यावेळी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी उत्तर दिले होते. मला दोन्ही सभागृहात काम करण्याची संधी मिळाली आहे. छत्रपतींच्या बाबतीत बोलत असताना कोणी अनादर केल्याची आम्हाला माहिती नाही. कधी असे घडलेले नाही. पार्लमेंटमध्ये किंवा राज्याच्या विधिमंडळामध्ये असे कधी घडलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. पार्लमेंटच्या परिसरात छत्रपतींचा पुतळा दिमाखात उभा आहे. ते तुमचे आमचे वैभव आहे. जेम्स लेन प्रकरण घडत असताना ज्यांनी कोणी माहिती पुरविली त्याची सर्वांना माहिती आहे. भांडारकर इन्स्टिट्यूटने जेम्स लेनला माहिती पुरविली हे त्यांनी स्वत: सांगितले. ही चुकीची माहिती कशी पुरविली हे विचारण्यासाठी कोणी का पुढे आला नाही? छत्रपतींच्या नावाने आम्ही राजकारण करतो असे विरोधी पक्षाकडून बोलले जाते. आम्ही असे राजकारण कधीही करणार नाही आणि करण्याची आवश्यकता नाही. दैवताच्या नावाने राजकारण करताच येणार नाही. राजकारण कोणाकडून केले जाते हे महाराष्ट्राच्या जनतेला माहिती आहे. कोण काय करते हे राज्यातील जनतेला चांगले माहिती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

सभापती महोदय, 1995 साली शिवाजी पार्क मैदानावर मंत्रीमंडळाचा शपथविधी पार पडला. 40 लाख लोकांना मोफत घरे देण्याचे आणि 30 लाख लोकांना नोकरी देण्याचे जाहीर करण्यात आले. युती सरकारच्या साडेचार वर्षाच्या कार्यकाळात एकाही व्यक्तीला नोकरी का दिली गेली नाही?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, या विषयावर आपल्याला पुरवणी मागण्या तसेच सर्वसाधारण चर्चेच्या अनुषंगाने आपला मुद्दा स्पष्ट करण्याची संधी मिळणार आहे तेव्हा आपण तो स्पष्ट करावा.

श्री. भाई जगताप : महोदय, सन्माननीय सदस्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा उल्लेख केला तोच मी करीत आहे. सन 2004 मध्ये सभागृहात सांगण्यात आले होते की, शिवाजी महाराजांचे स्मारक होणार आणि मी सुध्दा तेच सांगत आहे. शिवाजी पार्कवर छत्रपतींच्या साक्षीने हे सर्व घडत होते असे म्हटले तर राजकारण होईल काय, असा माझा मुद्दा आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या राज्याचे दैवत आहे व अशा दैवताचे राजकारण कोणीही करु नये अशीच माझी विनंती आहे. जेम्स लेनच्या बाबतीत सुध्दा येथे बोलले गेले. तसे पुस्तक जर राज्यात विकले जात असेल तर त्याची सुध्दा गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. मग त्यात कोण सामान्य प्रशासन विभागाचा अधिकारी अथवा तत्कालीन जो जबाबदार असेल त्याला शिक्षा करण्यासंबंधी कायद्यात सुस्पष्ट अशी तरतूद आहे.

हे खरे आहे की, देशाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या गोष्टींच्या बाबतीत मनाई केलेली आहे पण पुतळा आणि स्मारकांच्या बाबतीत मात्र "सायलेंट" आहे. तसे पाहिले तर सुस्पष्ट गाईडलाईन्स असताना सुध्दा नवी मुंबई येथे एअर पोर्ट आणू शकला हे खरे तर माननीय मुख्यमंत्र्यांचे कौशल्य आहे. म्हणून राज्यातील सर्व जनतेची भावना अशी आहे की, यासंदर्भात आवश्यकता भासल्यास कायद्यामध्ये ज्याप्रमाणे केंद्राच्या धर्तीवर बदल केला त्याच प्रमाणे आपल्या राज्यात सुध्दा बदल करुन अरबी समुद्रात नरिमन पॉईंट पासून एक किलोमीटर अंतरावर शक्यतो त्याच ठिकाणी छत्रपतींचे स्मारक व्हावे असाच उल्लेख मी मुद्दाम करणार आहे. त्यासाठी कायद्याचे पालन आपल्याला करावेच लागणार आहे. उद्या जर कायदा न पाळता केले तर त्याला विरोधी पक्षाकडून टीका होण्याची शक्यता आहे. ते म्हणतील की हे शासन कायद्याचे पालन करीत नाही इतके बेरड झाले. माझी विनंती आहे की, यासाठी केंद्रीय मंत्रीमंडळ तसेच पंतप्रधानांकडे जी रदबदली करता येईल ती शासनाने करावी आणि टाईम बाऊंड पध्दतीने हे स्मारक उभारावे. यासंदर्भातील सर्वच प्रक्रिया जवळजवळ पूर्ण झालेल्या आहेत. दोन वर्षापूर्वी आपण सर्वांनीच ती प्रतिकृती पाहिलेली आहे. या सर्व प्रक्रियांमधून निघाल्यानंतर तेथे फक्त बांधकाम करुन प्रतिकृती

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

उभारणे हेच आवश्यक आहे. हे करुन आपण जनतेला जे वचन दिलेले आहे ते पूर्ण करावे अशी माझी विनंती आहे. एवढे बोलून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल पुन्हा आपले आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, या हिंदुस्थानात प्रथम ज्यांनी आरमार उभारले होते ते छत्रपती शिवाजी महाराज यांनी उभारले होते. सुमारे चारशे वर्षापूर्वी जगात कोणत्याही देशात कोणत्याही राजाकडे समुद्राचे संरक्षण करणारी कोणतीच यंत्रणा नव्हती. ती पहिल्यांदा निर्माण करणारा राजा म्हणून छत्रपतींकडे बघितले जात होते व त्याची इतिहासात नोंद आहे. मी प्रामुख्याने फक्त तीन-चार मुद्यांवरच बोलणार आहे. छत्रपतींचा पुतळा हा नरिमन पॉईंटपासून एक किलोमीटर अंतरावरच का ठेवला पाहिजे त्याचे कारण म्हणजे ब्रिटनची राणी जेव्हा हिंदुस्थानमध्ये आली होती ती गेट-वे ऑफ इंडिया कडून आली होती. ती येणार म्हणून गेट-वे ऑफ इंडिया बांधण्यात आले होते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

त्यामुळे मुंबईच्या प्रवेशद्वारावरच छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला जाईल अशी ग्वाही महाराष्ट्राच्या तमाम जनतेला शासनाने देण्याची आवश्यकता आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा मुंबईत कोठे उभारला जाणार आहे हे शासनाने सांगितले तर त्याला अडथळे येथील असे माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर रित्या सांगितले होते. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याच्या कामी जर कोणी अडथळा आणणार असेल तर त्यांना आम्ही महाराष्ट्रात थांबू देणार नाही. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा नरीमन पॉईंट येथेच उभारला जाईल असे आश्वासन राज्य शासनाने आम्हाला दिले पाहिजे. सभापती महोदय, आपण विधी मंडळाचे ज्येष्ठ सदस्य आहात. पूर्वी या विधानमंडळाच्या जागेवर समुद्र होता. या ठिकाणच्या समुद्रामध्ये भराव टाकून हा परिसर उभा राहिलेला आहे. या ठिकाणी पूर्वी मच्छीमारांची वस्ती होती आता या ठिकाणी कोळी बांधवांची एकच वस्ती असून ती मनोरा आमदार निवासाच्या समोर आहे. या सभागृहाचे माजी सदस्य कै. बंदरकर कोळी बांधवासाठी इ ागडत होते. तत्कालीन मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीत हा परिसर निर्माण इ ालेला आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, आपण कोण कोणती बांधकामे करु शकतो ? खरे म्हणजे आपण जेट्टी बांधू शकतो, जेट्टी बांधून समुद्राच्या किना-याचे संरक्षण करु शकतो. जेट्टी बांधून जेट्टीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारुन त्या ठिकाणचा परिसर सुशोभित केला तर सर्व प्रश्न सुटतील.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातील माहिती घेण्यासाठी मी मंत्रालयात गेलो होतो त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या संदर्भात नोटींग बघितले. खरे म्हणजे या विषयाच्या संदर्भात मंत्रिमंडळाच्या एकाही मंत्र्यांनी आजपर्यंत बैठक घेतलेली नाही, तर अशा प्रकारच्या बैठका बांधकाम खात्याचे सचिव, प्रधान सचिव, कार्यकारी अभियंत्यांनी घेतल्या आहेत. परंतु या विषयाच्या संदर्भात मंत्रिमंडळाच्या एकाही सदस्याने बैठक घेतलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होण्यासाठी शासनाने काहीही काम केलेले नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्याला कायद्यामध्ये बदल करता येतो. सीआरझेडचे नोटींग करणारे जे कोणी अधिकारी आहेत त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास तरी माहिती आहे काय ? छत्रपती शिवाजी महाराज कोण होते याची माहिती सीआरझेडच्या अधिका-यांना आहे काय ? या अधिका-यांना छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अजिबात प्रेम नाही.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात शासनाने आजच्या आज ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. राज्य शासनाचे किंवा केंद्र सरकारचे पर्यावरण खाते अनेक प्रकारची बेकायदेशीर कामे करीत आहे. महाडमध्ये सुध्दा करोडो रुपयांची बेकायदेशीर कामे सुरु आहेत. 300 कि.मी. च्या क्षेत्रामध्ये आपण एक कि.मी.च्या परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करु शकत नाही ही दुर्दैवाची बाब आहे.

सभापती महोदय, मी काल टीव्हीवर पार्लमेंटचे कामकाज बघत होतो त्यावेळेस पार्लमेंटचे सीपीआयचे ज्येष्ठ सदस्य श्री. दासगुप्ता बोलत होते त्यांनी तृणमूल कॉंग्रेसच्या अध्यक्षांचे अभिनंदन केले व दुस-या बाजूने ज्या पक्षाने सरकारला पाठिंबा दिलेला आहे त्याच पक्षाचे खासदार पार्लमेंटमध्ये निदर्शने करत आहेत असेही वक्तव्य केले.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

श्री.जयंत प्र.पाटील....

हे या देशाचे दुर्दैव आहे की, सत्तारूढ पक्षाचे खासदार निदर्शन करताना दिसतात. त्या सरकावर त्यांचा विश्वास राहलेला नाही. सरकार चालूच शकत नाही असे त्यांनी वक्तव्य केले. आज परिस्थिती काय आहे ? हे काम कोणी करायचे यातच खरा वाद आहे. हे काम एमएमआरडीएने करायचे की, बांधकाम खात्याने करायचे यात वाद आहे. एमएमआरडीए काँग्रेस पक्षाकडे आहे आणि बांधकाम खाते आहे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे. मूळ वाद यामध्ये आहे. श्री.मेटे साहेब बोलले त्याला कारण काय आहे ? माझा हा मुद्दा माननीय सभापतींना पटला आहे. कारण ते मनातल्या मनात हसत आहेत. करोडो रूपयाचे काम कोणी करायचे हा मूळ वाद आहे. हे काम राष्ट्रवादी काँग्रेसने करायचे की काँग्रेसने करायचे हा खरा महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे आज राज्यातील जनता सरकारकडे एका वेगळ्या नजरेने बघत आहे. राज्याचे मुख्यमंत्री एक बोलत आहेत, तर राज्याचे उप मुख्यमंत्री दुसरे बोलत आहेत. त्यामुळे हे राज्य आहे की काय आहे ? त्यावर सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप काहीच बोलत नाही. त्यामुळे त्यांना थांबविले होते.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, ज्यावेळी मी काही वक्तव्य करीत होतो, त्यावेळी ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हरकत घेतली होती. त्यामुळे आता हा दर्जा कुठ पर्यंत जाणार आहे ? त्यांना कोणी सांगितले की, असे चालल्यामुळे ते होत नाही. कोणी परमिशन दिली आणि कोणी दिली नाही या तांत्रिक बाबीमध्ये आपण जात आहोत. हे स्मारक कसे होईल या दृष्टीने आपण प्रयत्न करीत आहोत. माझे एवढेच म्हणणे आहे की, ही चर्चा दुसरीकडे नेण्याचा प्रयत्न आपण करू नये.

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी माननीय मुख्यमंत्र्यांची बाजू घेतली तर ते मी समजू शकतो. पण त्यांनी दादांची बाजू घेऊ नये. आपल्या मनात असते तर महाराजांचा पुतळा केव्हाच उभा राहिला असता. तो जर उभा रहात नसेल तर आपला अधिकार आम्हाला द्यावा. या सदनाने मला अधिकार द्यावा मी एक वर्षामध्ये पुतळा उभारून दाखवितो. मी चॅलेंज देतो. मंत्र्यांचे सेक्रेटरी मंत्र्यांचे ऐकत नाहीत. सेवानिवृत्ती घेतल्यानंतर देखील त्यावर ते सही करीत नाही. गेल्या अधिवेशनामध्ये देखील हा मुद्दा उपस्थित केला होता. सेक्रेटरी आपल्याला

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

जुमानत नाही. त्यामुळे आपण आम्हाला बोलायला लावू नका. येथे बरेच काही बोलता येईल. ही चर्चा सभागृहात करायला आम्हाला लाज वाटते. सन्माननीय उप मुख्यमंत्री सांगतात पुतळ्याच्या जागेबाबत घोटाळा होईल. हे बरोबर आहे काय ? ही काय कोणाची खाजगी मालमत्ता नाही. ही जनतेची मालमत्ता आहे. यावर मार्ग कसा काढता येईल हे आपण पहावे. यात आपण मार्ग काढू शकतो. माझ्या सारखा अडाणी माणूस सांगतो की, जेट्टी बांधा. त्यावर पुतळा उभा करावा. एक मिनिटांचे काम आहे. पाच कोटीच्या आत एस्टीमेट करून जेट्टी बांधण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. याचे ज्ञान मंत्रिमहोदयांना आहे. ते त्या खात्याचे मंत्री आहेत. त्यानंतर तेथे महाराजांचा पुतळा उभारावा. मार्ग काढायचा असेल तर राज्याचे सचिव काढू शकतात. अडथळा आणायचा असेल तर ते आणू शकतात. त्यामुळे आपल्याला एक निश्चित अशी वेगळी भूमिका घेऊन येथे काम करावे लागेल. या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी एक ठोस निर्णय घेतला पाहिजे.

मला राजकारणावर बोलावयाचे नाही.

यानंतर सौ.रणदिवे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ही त्यांची सही असली तरी मात्र किल्ल्या माझ्याकडे आहेत हे वक्तव्य आहे काय ? आज पेपरमध्ये वाचले की, आमचे नेते माननीय श्री.गणपतराव देशमुख यांनी 50 वर्षे विधीमंडळाच्या सभागृहामध्ये काम केले आहे आणि त्यांनी याबाबत दु:ख व्यक्त केले आहे. मी देखील दु:ख व्यक्त करतो. कारण मलाही असे वाटते की, या सभागृहामध्ये किंवा या सगळया यंत्रणेमध्ये आपण कुठेतरी अपूरे पडत आहोत. त्यामुळे आम्हाला हे पटत नाही. आम्ही एका तत्वाने, ध्येयाने काम करतो त्यामुळे आम्ही येथे ताठ मानेने बोलू शकतो. सभापती महोदय, हे काय चालले आहे ? सभागृहामध्ये जर या पध्दतीने चर्चा होत असेल तर मग हे राज्य कोणाचे आहे? हे राज्य मंत्र्यांचे नाही. पूर्वी मंत्रालयाचे नाव "सचिवालय" होते. मात्र सध्या तेथे "मंत्रालय" असा जो बोर्ड लावलेला आहे, तो काढून टाकावा आणि परत "सचिवालय" असे नाव ठेवण्यात यावे अशी परिस्थिती आहे. याठिकाणी मी जास्त काही बोलणार नाही. या चर्चेच्या निमित्ताने या महाराष्ट्रातील जनतेला आणि आम्हाला सर्वांना हे कळले पाहिजे की, किमान छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा उभा करण्याच्या निमित्ताने तरी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री हे एकदिलाने काम करीत आहेत. ते एकत्र रहावे एवढीच मी याठिकाणी विनंती करु इच्छितो.

सभापती महोदय, मी निश्चितपणे सांगेन की, याठिकाणी ज्या पध्दतीने चर्चा सुरु आहे, त्यावरुन मला असे वाटत नाही की, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बांधावा की बांधू नये यासाठी या राज्यातील कोणताही राजकीय कार्यकर्ता राजकारण करेल. या विषयाच्या अनुषंगाने राज्य मंत्रिमंडळामध्ये किती वेळा चर्चा झाली आहे ? याचे मला या चर्चेच्या निमित्ताने राज्य शासनाकडून उत्तर हवे आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : एकदाही झाली नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, याबाबत काय झाले ते कळू दे. यासाठी माननीय मंत्री महोदयांची उप समिती नेमली होती काय ? तसेच या कामासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या माननीय राज्यमंत्र्यांनी तरी बैठक घेतली होती काय ? हे मला समजले नाही. याठिकाणी एकच गोष्ट सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, या सभागृहाचे तत्कालीन माजी सन्माननीय सदस्य कै.वसंतराव पवार यांनी औचित्याच्या मुद्याव्दारे छात्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या डिझाईनबद्दल मुद्दा उपस्थित केला होता. आणि त्यावेळी माननीय सभापती महोदय आपण आणि मी पाठिंबा दिला होता. कदाचित आपण ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

विसरला असाल. याठिकाणी याचे डिझाईन करणारी बेन्स्ले डिझायनर स्टुडिओ ही थायलंडची कंपनी आहे, त्याच्या विरोधात सन्माननीय सदस्य कै.वसंतराव पवार यांच्या आर्कीटेक्ट, डिझायनर असलेल्या कन्येने एक लोएस्ट कोटेशन भरले होते. याबाबतीत मी चुकत नसेन तर सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकलेसाहेब देखील बोलले होते. त्यावेळी कै.वसंतराव पवार यांनी मला असेही सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि ते कसे होते हे थायलंडच्या मुलींपेक्षा माझ्या मुलीला जास्त कळेल. परंतु मी ते मांडणे बरोबर नाही त्यामुळे तुम्ही तुमच्या स्टाईलमध्ये हा विषय मांडावा आणि त्याप्रमाणे मी त्यावेळेला तो मुद्दा उचलून धरला होता.सभापती महोदय, मात्र तसे देखील करण्यात आले नाही. त्यावेळी जे संबंधित माननीय मंत्री महोदय होते, त्यांनी सांगितले की, एका महाराष्ट्रीयन मुलीला हे काम द्यावे. परंतु तसे न करता हे काम थायलंडच्याच मुलीला दिले आहे. यावरुन संबंधितांचा याकडे पहाण्याचा जो दृष्टीकोन आहे तो कशा प्रकारचा आहे हे देखील लक्षात घेतले पाहिजे. तसेच या निमित्ताने मंत्रालयातील नोकरशाही कशा प्रकारे काम करीत आहे, कशा प्रकारचा दृष्टीकोन ठेऊन काम करीत आहे याचे चित्र आपल्यासमोर उभे रहाते. म्हणून मी या चर्चेच्या निमित्ताने निश्चितपणे सांगतो की, राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याच्या बाबतीत निश्चित कालावधी ठरवून द्यावयास पाहिजे. किमान 1 वर्षाच्या आत छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे राहील अशा प्रकारचे नियोजन केले पाहिजे आणि राज्य शासनाने या चर्चेच्या निमित्ताने तशा प्रकारचे आश्वासन द्यावे अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी या सभागृहात एका महत्वाच्या सार्वजनिक बाबीच्या संदर्भात नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, या चर्चेला सुरुवात करताना सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी या विषयाच्या संदर्भात सन 2004 ते 2012 पर्यंतचा संपूर्ण इतिहास सभागृहासमोर मांडलेला आहे. एक गोष्ट खरी आहे की, हा प्रस्ताव जरी विरोधी पक्षाकडून मांडण्यात आला असला तरी या मागे प्रशासन यंत्रणेतील आकस आणि आळस या निमित्ताने समोर येतो आहे की काय अशा प्रकारची शंका मनामध्ये निर्माण होते. इच्छाशक्ती आहे किंवा नाही या संदर्भात बरेच बोलले गेले परंतु या सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल असलेला आदर "शिवरायांचे आठवावे रुप, शिवरायांचा आठवावा प्रताप" या शब्दात वर्णन करतो. छत्रपती शिवाजी महाराज हे अनेक दशके आपल्या सर्वांच्या मनावर अधिराज्य करणारे, लोकोत्तर महापुरुष होते. महाराष्ट्रामध्ये अरबी समुद्रात त्यांचे स्मारक असावे, तेही आंतरराष्ट्रीय दर्जाचे, अमेरिकेतील लिबर्टीच्या पुतळयापेक्षाही भव्यदिव्य असावे अशी एक भव्य कल्पना हा मराठी माणसाचा मराठी मनाचा फार मोठा मानबिंदू आहे. या विषयावर बोलत असताना ज्या काही गोष्टी आपल्या समोर आलेल्या आहेत त्याची आवश्यकता अधिक प्रखरतेने आपण लक्षात घेतली पाहिजे.

सभापती महोदय, मध्यंतरी पुण्याच्या एका इतिहासकारांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जवळ जवळ हजार पृष्ठांच्या पत्रव्यवहारावरुन शिवाजी महाराज कसे सेनानी होते, त्यांची हिंदवी स्वराज्याची आखणी कशी होती आणि हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याची त्यांची मनिषा कशी होती या बाबतीत लिहिले आहे. त्या काळात किती तरी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी या हिंदवी राज्याचा विस्तार करण्याची एक फार महत्वाकांक्षी योजना लोकांसमोर मांडली होती. त्या हिंदवी स्वराज्याची धारणा अशी होती की, समाजाच्या प्रत्येक वर्गाचे भले करण्यासाठी मोठे साम्राज्य तयार व्हावे. ते साम्राज्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने पुढे आले तर तो इतिहासातील सगळयात मोठा मानबिंदू ठरेल अशा प्रकारची भावना होती. या सगळया प्रकरणामध्ये जो काही विलंब, दिरंगाई झालेली आहे हा खरोखरच अतिशय दु:खदायक, क्लेशदायक आणि

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. हेमंत टकले. . ..

प्रचंड यातना निर्माण करणारा आहे. याबाबतीत सगळयांच्या भावना सामायिक आहेत. या बाबतीत प्रशासनामार्फत ज्या अडचणी पुढे करण्यात आलेल्या असतील मग ती अडचण पर्यावरण खात्याची असेल, इतर विभागांची असेल, केंद्र शासनाची असेल, या सगळया अडचणींवर मात करता येऊ शकते नव्हे ती करणे हीच खरी या शासनाची कसोटी आहे असे मी मानतो.

सभापती महोदय, नियमामध्ये सूट देणे, भराव टाकणे किंवा आताच्या चर्चेच्या माध्यमातून जेट्टी बांधावी का आणखी काय करावे या बाबतीत जे मुद्दे मांडण्यात आलेले आहेत त्याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. परंतु अक्षम्य असा विलंब या सर्व योजनेला झालेला आहे ही गोष्ट आपल्या सर्वांसमोर निश्चितपणे आलेली आहे. या पुढे जे काही सामाजिक वातावरण, रचना महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने करणे आवश्यक आहे त्यासाठी एक मार्गदर्शक म्हणून स्मारकाच्या रुपाने सगळा शिवकाळ पुन्हा एकदा आपल्यासमोर येण्याची आवश्यकता आहे, तो पुढील पिढयांसाठी जपण्याचीही आवश्यकता आहे या बाबत अनेक देशांचे उदाहरण द्यावयाचे झाले तर आजही साहित्यातील शेक्सपिअरचे स्थान लक्षात घेऊन 400 वर्षा पूर्वीच्या शेक्सपिअरचे, त्याच्या घराचे, तो ज्या ठिकाणी जात असे त्या थिएटरचे ज्या पध्दतीने जतन केले गेलेले आहे आणि ज्या पध्दतीने तेथील जनता अभिमानाने तो वारसा सांगत आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

तसाच अभिमान मराठी माणसांच्या मनामध्ये शिवरायांबद्दल आहे. हे व्यक्तिमत्वच इतके प्रचंड होते की, कितीही मोठे स्मारक केले तरी कमीच पडणार आहे. ते आकाशापेक्षा सुध्दा फार मोठे होते.

सभापती महोदय, मला आठवते की, खूप वर्षापूर्वी आमच्या नाशिकचे श्री. वसंत कानेटकर यांनी शिवरायांवर 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे ऐतिहासिक नाटक लिहिले. त्यांच्या काळात जे कलह होते त्या कलहाचा ओझरता स्पर्श त्या सर्व मोहिमांमध्ये येणाऱ्या अडचणींच्या निमित्ताने त्यांनी त्या नाटकामध्ये दाखविला होता. हे स्मारक कोणासाठी मार्गदर्शक आहे ? हे स्मारक केवळ जनतेसाठीच मार्गदर्शक नाही तर या जनतेचे, या रयतेचे राज्य चालविणाऱ्या शासनकर्त्यांसाठी सुध्दा मार्गदर्शक आहे. ही जाणीव निर्माण करण्यासाठी या स्मारकाची नितांत आवश्यकता आहे. आपण सगळे सदस्य या विषयाच्या बाबतीत सत्ताधाऱ्यांमधील बेबनावाबद्दल, आपसातील कुरघोडीबद्दल बोलतो. या निमित्ताने सत्ताधारी पक्ष राजकारण करतो की काय अशी शंका उपस्थित केली गेली. पण आपण सगळ्यांनी याच्या पलीकडे जाऊन विचार करावयास शिकले पाहिजे असे मला वाटते. शिवाजी महाराज हे कोणत्याही पक्षाचे दैवत नव्हे तर ते उभ्या महाराष्ट्राचे दैवत होते. उभ्या महाराष्ट्राच्या या दैवताच्या बाबतीत सत्ताधारी किंवा विरोधी कोणत्याही पक्षाने राजकारण करु नये.

सभापती महोदय, आपण शिवजयंतीची एक शासनमान्य तारीख ठरविलेली आहे. ती तारीख सगळ्यांना मान्य आहे का असाही प्रश्न आजकाल उपस्थित होतो. आपण दोन दोन शिवजयंत्या साजऱ्या करतो. हा आपल्यामध्ये मतभेद नाही तर मनभेद आहे असे मी मानतो. आपण सगळ्यांनी मिळून जी तारीख ठरविलेली आहे त्या दिवशी शिवजयंती साजरी करावी. परंतु ज्यावेळी जाणीवपूर्वक असा प्रयत्न केला जातो त्यावेळी त्याच्यामागे राजकारण आहे का, त्याच्या मागे वेगळे काही करण्याची भूमिका आहे का असेही प्रश्न निर्माण होतात. आपण या सभागृहातील सदस्य, राज्यकर्ते नेहमी 11 कोटी जनतेचा हवाला देऊन बोलत असतो. या 11 कोटी जनतेला आपल्याबद्दल काय वाटते आणि या विषयी आपण ज्या पध्दतीने वक्तव्य करतो त्याबद्दल काय वाटते

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

याचा जर थोडासा कानोसा घेतला तर आपल्यालाही कळेल की, खरोखर मनापासून वाटत असेल तर आपण यामध्ये राजकारण आणू नये. शिवरायांचे हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक अरबी समुद्रामध्ये उभे करण्यासाठी सगळ्यांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे. प्रशासकीय यंत्रणेकडून ज्या काही त्रुटी राहून गेल्या असतील त्या सगळ्या त्रुटी दूर करण्याची आवश्यकता आहे. वेळ पडल्यास जसे आपण बेळगावच्या प्रश्नाच्या संदर्भात दिल्लीला सगळे मिळून शिष्टमंडळ घेऊन जातो आणि प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतो त्याच पध्दतीने या स्मारकाच्या नियोजित जागेच्या संदर्भामध्ये सुध्दा आपण प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. या लोकोत्तर महापुरुषाची सदैव चिरंतन आठवण राहावी या उद्देशाने आपण सगळ्यांनी जर एकत्र येऊन ठरविले तर हे काम निश्चित कालमर्यादेमध्ये पूर्ण करता येईल.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब आता सभागृहात उपस्थित झालेले आहेत. त्यामुळे शिवजयंतीच्या तारखेचा मुद्दा पुन्हा मांडतो. शिवरायांच्या एकूण कर्तृत्वाबद्दल आणि त्यांनी घालून दिलेल्या शासन यंत्रणेबद्दल बोलत असताना आपण सगळ्यांनी मिळून सभागृहांची संमती घेऊन जर शिवजयंतीची एक तारीख ठरवली असेल तर सगळ्याच पक्षांनी ती शिवजयंतीची तारीख मान्य करुन त्याच तारखेला शिवजयंती साजरी का करु नये ? महाराष्ट्रामध्ये सरकारने जाहीर केलेली शिवजयंती आणि लोक मानत असलेली दुसरी शिवजयंती अशा दोन शिवजयंत्या साजऱ्या करण्याचे काही प्रयोजन आहे का याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. आपण सगळेजण शिवरायांच्या बाबतीत एकमुखाने, एकदिलाने बोलत आहोत किंवा नाही हा प्रश्न निर्माण होतो. आपण सगळे एकत्र बसून निदान एवढा प्रश्न तरी सोडवू शकू. स्मारकाची गोष्ट तर त्याच्या पुढची आहे. मला असे वाटते की, शिवरायांचे सगळे कर्तृत्व, त्यांचे आदर्श आजच नाही तर चिरंतन काळासाठी या राज्यालाच नव्हे तर या देशाला मार्गदर्शक ठरणारे आहे. त्यांची सगळी यंत्रणा मग आरमाराची बांधणी असो, त्यांचे वेगवेगळे किल्ले आणि गड असतील

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

या सगळया गोष्टी खरोखरच आजही इतका कालावधी उलटून गेल्यानंतरही आदर्श म्हणूनच राहतील. मी आदर्श इमारतीबाबत बोलत नाही तर शिवरायांच्या आदर्शबद्दल बोलत आहे. त्यामुळे शिवराय अधिक समजून घेण्याची व पुढच्या पिढीला समजावून देण्याची अतिशय गरज आहे. केवळ प्रतिकात्मक स्मारके असतात किंवा इतर पुतळे असतात तशा प्रकारचे या स्मारकाचे स्वरुप नसावे. त्याचा दर्जा, त्यांच्याबद्दलचे प्रेम, शिवसृष्टी कशा पध्दतीने दाखविता येईल आणि ते सातत्याने लोकांसमोर कसे राहील त्या आदर्शाचा विचार करता आपण सगळयांनी एकत्रपणे येऊन या विषयात ज्या काही त्रुटी राहिल्या असतील त्याच्यावर मात करावी. तसेच विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बरोबर घेऊन शिवरायांचे हे स्मारक लवकरात लवकर साकार होईल या दृष्टीकोनातून एकत्रितपणे प्रयत्न करावेत अशी विनंती करुन व मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून मी येथे थांबतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, त्यावेळी आमच्या पक्षात असलेले जुने शिवसैनिक आणि आताचे सोनिया सैनिक हे सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले बोलत असताना फिदी फिदी हसत होते आणि त्यांना असे म्हणत होते की, रावते साहेब सभागृहात आले आहेत आपण बोलावे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी दोन शिवजयंत्या कशासाठी साजऱ्या केल्या जातात असा चांगला मुद्दा मांडला आहे. आमच्या पक्षात असताना जुन्या शिवसैनिकांना आम्ही साजरी करीत असलेली शिवजयंती आवडत होती आणि आता तिकडे गेल्यावर सरकारी शिवजयंती आवडू लागली आहे. कृतीतील विकृती कशी असते ते मी सांगत आहे. सन्माननीय सदस्य श्री.टकले यांनी सांगितल्यावर मला आनंद वाटला. महाराजांची आपण तिथीप्रमाणे व तारखेप्रमाणे जयंती साजरी करतो. तसे न करता एकाच दिवशी शिवजयंती साजरी करावी असे त्यांचे म्हणणे होते. या शासनाला शिवजयंतीची विस्मृती झाली आहे त्याचे मला दु:ख व खेद होतो. शासकीय दैनंदिनीमध्ये शिवसेना पक्ष ज्या दिवशी शिवजयंती साजरी करतो त्याचा आणि शासन ज्या दिवशी शिवजयंती साजरी करते त्याचाही उल्लेख केलेला नाही. महाराष्ट्र शासनाच्या दैनंदिनीमध्ये कोणत्याही धर्माचा सण चुकविलेला नाही. मी कोणत्याही धर्माचे नाव घेत नाही, कारण त्यामुळे वाद निर्माण

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिवाकर रावते....

होईल. पण या शासनाला छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा विसर पडलेला आहे. हे कटू सत्य आहे. दोन शिवजयंत्यांमुळे किमान दोन वेळा दोघांकडून महाराजांचा उत्सव तरी साजरा होत आहे. सन्माननीय सदस्य श्री.टकले यांनी बोलताना तिकडच्या सदस्यांचे कान टोचले असते तर बरे झाले असते.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, आदरणीय श्री.दिवाकर रावते साहेब यांच्या विषयी माझ या मनात नितांत आदर आहे. पण ते जे बोलले ते या सभागृहाच्या प्रतिष्ठेला अशोभनीय आहे. आपण काहीही बोलू शकता, त्याला प्रती उत्तर आम्ही देऊ शकतो. त्यांनी रेकॉर्डवर बोलावे. (अडथळा) आपण ज्येष्ठ आहात. पण आम्ही आपल्याकडून कोणता आदर्श घ्यायचा ? प्रत्येक वेळी विकृती, फिदी फिदी हसतात असा उल्लेख त्यांच्याकडून केला जातो.

सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी शिवजयंतीचा उल्लेख केला होता. शासकीय शिवजयंती साजरी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने इतिहास तज्ज्ञांची एक समिती गठित केली होती. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे ज्या पक्षाचे सदस्य आहेत त्या पक्षाचे श्री.साबीर शेख हे त्या समितीमध्ये होते. त्यावेळी शिवसेनेने दि.19 फेब्रुवारी ही तारीख मान्य केली होती. मग त्यासंबंधी राजकारण का केले ? हा मुद्दा होता. तुम्ही महात्मा फुले यांची जयंती एकाच दिवशी साजरी करता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती एकाच दिवशी साजरी करता, लोकमान्य टिळकांची जयंती एकाच दिवशी साजरी करता आणि एका बाजूला छत्रपतींना महामानव म्हणावयाचे, छत्रपती शिवाजी महाराज हे अलौकिक होते असे म्हणावयाचे आणि दुसरीकडे छत्रपतींच्या दोन-दोन जयंत्या साजऱ्या करावयाच्या, यात राजकारण नाही काय ? ही एक प्रकारची विकृती आहे.

मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आमचा नामोल्लेख करुन वक्तव्य केले आहे. मी त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे बोलत असताना त्यांना बरोबर आहे, बरोबर आहे असे म्हणत होतो. शिवसेनाप्रमुखांविषयी आपल्या मनात जेवढा आदर आहे तेवढाच माझ्याही मनात आदर आहे.

यानंतर श्री.गिते....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

पण मूळ मुद्दा असा आहे की, शिवसेना भवनावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आहे, तो खालच्या बाजूला आहे आणि शिवसेना प्रमुखांचे छायाचित्र वरच्या बाजूला आहे. आपण लग्नपत्रिका छापतो, त्यावेळी गणपतीचे छायाचित्र खाली छापत नाही. आपण कोणत्याही समारंभाची पत्रिका छापतो, त्यावेळी गणपतीचे छायाचित्र हे वरच्या बाजूलाच छापतो. ज्याला सन्मान दिला पाहिजे, जो सन्मान अपेक्षित आहे, तो सन्मान त्या ठिकाणी नाही. मला असे वाटते की, कदाचित शिवसेना प्रमुखांना माहिती नसेल की, माझ्या छायाचित्राखाली छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविलेला आहे. त्यात काही सुधारणा करता आली तर करा आणि त्यानंतर आमच्या विषयी बोला.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: एक दिवसीय व कसोटी क्रिकेटमध्ये 100 वे शतक पूर्ण केल्याबद्दल क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचे अभिनंदन.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, भारताला ललामभूत असलेल्या सचिन तेंडुलकरचे आज शतकांचे महाशतक साजरे झालेले आहे. हा एक ऐतिहासिक क्षण आहे. आपल्याला पुलकित करणारा क्षण आहे. आपण सर्वांनी तो क्षण साजरा केला पाहिजे. त्यामुळे कटुतेचे जाळे थोडेसे बाजूला सारुन सर्वांनी आनंद साजरा करावा व तसा ठराव आपण आणावा अशी माझी आपणास विनंती आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्यास केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी न देणे.

मु.शी.: अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्यास केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी न देणे या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते,पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री प्रितमकुमार शेगांवकर,चंद्रकांत पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर, केशवराव मानकर, रामनाथ माते, सय्यद पाशा पटेल, डॉ.रणजित पाटील, विनायक मेटे, रमेश शेंडगे, हेमंत टकले, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु....)

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित असताना मला छत्रपती शिवाजी महाराजांविषयी भावना व्यक्त करावयाच्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे ही महाराष्ट्रातील आबालवृध्दांची इच्छा,आकांक्षा आणि भावना आहे. ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने प्रयत्न करावा अशी लोकांची इच्छा आहे. मला असे वाटते की, ती इच्छा राज्य शासन पुढील दोन-अडीच वर्षाच्या कालावधीत पूर्ण करील.

सभापती महोदय, स्वप्नामध्ये राज्य दान केले, हे स्वप्न प्रत्यक्ष साकार करणारा हरिश्चंद्र या भारतामध्ये होऊन गेला. तो हरिश्चंद्र आमचा पूर्वज आणि आम्ही त्याचे वारसदार. हे राज्य दान करा असे मी म्हणणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक जे प्रेरणादायी ठरु शकेल अशा प्रकारचे स्मारक उभा करण्याचा जो संकल्प दोन निवडणुकांमध्ये आपण दिला. तो पूर्ण करण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे, ती जबाबदारी राज्य शासनाने पूर्ण करावी अशी मी या क्षणी अपेक्षा व्यक्त करतो.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, 100 कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प माननीय राज्यपालांनी केलेला आहे. पर्यावरणाचे संतुलन ठेवण्याचा प्रयत्न माननीय राज्यपालांनी संकल्पीत केला असून त्या प्रकारे हे स्मारक बांधून त्या ठिकाणी 5-10 लाख वृक्ष लागवड केली तर मला असे वाटते की, पर्यावरणाचा जो काही मुद्दा उपस्थित झालेला आहे, तो निकाली निघू शकेल आणि पर्यावरणाचे संतुलन सुध्दा त्या माध्यमातून साध्य करता येऊ शकेल. छत्रपती शिवाजी महाराजांची आज्ञापत्रे आपण पाहिली तर त्यात वृक्षाच्या संदर्भात आज्ञा देण्यात आली आहे की, एक वृक्ष तोडला तर दुसरा वृक्ष लावा. एका ठिकाणी दोन वृक्षांची लागवड केली पाहिजे. वृक्षांचे संवर्धन, वृक्षांचे जतन, वृक्ष लागवडीसाठी प्रोत्साहित करण्याचे प्रयत्न राजांनी त्या काळात केला. लोकांना त्यांनी अशा आज्ञा दिल्या की, ही राष्ट्राची संपत्ती आहे. ती संपत्ती जतन करण्याचा आपण प्रयत्न करावा. त्या काळात राजांनी तसे प्रयत्न केले. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये जी अपेक्षा व्यक्त केली आहे, ती साकार करण्याचा प्रयत्न या स्मारकाच्या माध्यमातून राज्य शासनाला करता येऊ शकेल. 100 कोटी पैकी काही लाख वृक्ष या स्मारकाच्या भोवती उभे केले तर त्या वृक्षांची गोड आणि रसाळ फळे निश्चितपणे आपल्या वाटयाला येऊ शकतील. महाराष्ट्र शासन हे छत्रपतींच्या पाऊलावर पाऊल टाकून पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

महोदय, या राज्यात शिवकालीन बंधारे आजही आपल्याला पहावयास मिळतात. रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी पाणी नाही, परंतु रायगडावर पाणी आहे, हे वास्तव असल्या कारणाने महाराष्ट्र शासनाने शिवकालीन बंधारे ग्रामीण भागात केली पाहिजेत असा प्रयत्न केलेला आहे. त्यात शासनाला बरेचसे यश प्राप्त झालेले आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

छत्रपतींचा मोठेपणा हा आम्ही सांगण्याची आवश्यकता नाही. त्यांचा इतिहास डोळयासमोर ठेवला तर कुठे तो आग्रा आणि कुठे रायगड! छत्रपतींचा भूगोल किती चांगला असला पाहिजे याचे विवरण या ठिकाणी देणे आवश्यक आहे. आग्र्याहून रायगडपर्यंत छत्रपतींना येणे शक्य झाले. कारण जागोजागी मावळे उभे होते. नटसम्राटाला मागे टाकेल अशा प्रकारचा अभिनय त्यांनी वठविला आहे. एका अर्थाने महाराष्ट्राचे छत्रपती हे नटसम्राट होते. संभाजी महाराजांचे देहावसान झाले, ते जगामधून निघून गेले, परलोकवासी झाले. त्यानंतर त्यांचे अंत्यसंस्कार छत्रपतींनी केले. तेही एक प्रकारचे नाटक होते. ते छत्रपतींनी अतिशय उत्तम प्रकारे वठविले आणि सगळ्या महाराष्ट्रामध्ये असा संदेश गेला की, संभाजी महाराज गेले. त्यानंतर तो बादशहा, त्यांने संभाजीराजांचा शोध घेणे थांबविले. हा एकप्रकारे अभिनय होता आणि तो नटसम्राटापेक्षाही श्रेष्ठ होता. अशा महाराष्ट्राच्या श्रेष्ठ दैवताचे स्मारक आंतरराष्ट्रीय स्तरावरचे व्हावे ही महाराष्ट्राच्या तरुणांची, आबालवृध्दांची सर्वांचीच इच्छा आहे. छत्रपतींचे कैसे बोलणे, छत्रपतींचे कैसे चालणे, सलगी देणे कैसे हे समजून घेणे आवश्यक आहे.

निश्चयाचा महामेरु
बहुत जनांसी आधारु
अखंड स्थितीचा निर्धारु
श्रीमंत योगी.

असा हा श्रीमंत योगी या स्मारकाच्या रुपाने लोकांसमोर येणे आवश्यक आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, हे स्मारक ताबडतोबीने उभे केले पाहिजे.

सभापती महोदय, या जगामध्ये नेपोलियन होऊन गेला, सिंकदर होऊन गेला. दुसऱ्याची भूमी पादाक्रांत करणारे गिधाडाच्या वृत्तीचे होते. विचार, उच्चार आणि सुसंगतीमध्ये जीवन जगणारे छत्रपती आदर्शवत राज्य करणारे होते. सर्व धर्मियांना समान वाटा दिला जाईल, सगळ्यांवर प्रेम केले जाईल या भावनेतून सगळ्या धर्माच्या प्रती सहिष्णुता छत्रपतींनी प्रत्यक्ष कृतीतून साकार केली. म्हणून छत्रपती आमचे आदर्श आहेत.

सभापती महोदय, समितीच्या अभ्यासदौऱ्याच्या निमित्ताने मध्यंतरी आम्ही कन्याकुमारी येथे गेलो होतो. स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथे धर्म परिषद गाजविली. त्यांचे त्या ठिकाणी स्मारक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

उभे केले आहे. त्या स्मारकाच्या पलीकडच्या खडकावर तेथील एक प्रादेशिक कवी, ज्यांना तेथील संत तुकाराम म्हटले जाते, त्यांचे स्मारक स्वामी विवेकानंदांच्या स्मारकाच्या पलीकडच्या खडकावर उभे केले आहे. तेथे पर्यावरणाचा प्रश्न निर्माण झाला नाही का? त्या राज्य शासनाने प्रयत्न केला नाही का? या सगळ्या गोष्टींचा विचार या निमित्ताने करणे आवश्यक आहे. मला असे वाटते की, आता पर्यावरणाच्या निमित्ताने जे झारीतील शुक्राचार्य बसले आहेत त्यांच्या डोळ्यामध्ये गवताची काडी टोचून छत्रपतींचे स्मारक उभे करण्याच्या आड तुमचा बोरु कागदावर जास्त फिरवू नका आणि छत्रपतींच्या स्मारकाला अडथळा आणू नका असे सांगण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, पुन्हा एकदा मी राज्य सरकारला कळकळीची विनंती करतो की, कशाला विरोधी पक्षाला संधी देत आहात? सरकारवर टिकाटिप्पणी करावी आणि महाराजांच्या नावावर आम्ही राजकारण करतो असे म्हणण्याची संधी त्यांना का द्यावी. राजकारणाशिवाय त्यांना काही जमत नाही. छत्रपतींचे नाव आमच्या जाहीरनाम्यामध्ये आहे. तो जाहीरनामा आम्ही लोकांसमोर प्रसिध्द केला आहे. आम्ही असे म्हणत नाही "जय भवानी, जय शिवाजी, टाका वर्गणी." आम्ही हा प्रकार करीत नाही. छत्रपतींच्या ज्या काही गुणांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक पातळीवरचे जे अभ्यासक आहेत त्यांना सुध्दा करता यावा म्हणून या स्मारकाकडे पाहिल्यानंतर त्यांनाही प्रेरणा मिळू शकेल असे स्मारक उभे करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गनिमी कावा करणारे नेतृत्व कसे आहे? महाभारतात श्रीकृष्णाने ज्या कृष्णलीला केल्या त्याला कृष्णकृत्य म्हटले जाते. सत्याचा निर्वाळा सर्वांसमोर देण्यासाठी कृष्णाने तो कावा केला. असेच अष्टावधानी अष्टपैलू व्यक्तिमत्व छत्रपती महाराजांचे होते. म्हणून या छत्रपतींचा आदर्श लोकांपुढे सकृत्दर्शनी आला पाहिजे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

भगवंत हा प्रत्यक्ष साकार झाल्याशिवाय, सगुण रुपात दिसल्याशिवाय तरणोपाय नसतो. तशा सगुण रुपात साकार होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक साकार करावे, उभारावे अशीच लोकांची आकांक्षा आहे, अपेक्षा आहे एवढीच अपेक्षा व्यक्त करतो आणि मी थांबतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (औरंगाबाद विभाग शिक्षक): महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व्हावे अशी सर्वच सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे तीच अपेक्षा मी सुध्दा व्यक्त करणार आहे. सन 2004 सालापासून दोन्ही निवडणुकांच्या जाहीरनाम्यात काँग्रेस पक्षाच्या वतीने तसे नमूद केले होते. अनेक वेळा सभागृहात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून किंवा माननीय अर्थमंत्र्यांनी केलेल्या भाषणातून हा उल्लेख केलेला आहे. पण खऱ्या अर्थाने शासनाला असे स्मारक उभे करावयाचे काय अशी शंका माझ्यासारख्या सदस्याला वाटते. गेली पाच वर्षे या सभागृहात मी सातत्याने मागणी करीत आहे की, सिंधुदुर्ग किल्ल्यात पेशवेकालीन व जगाच्या पाठीवर एकमेव असलेल्या शिवाजी महाराजांच्या मंदिरात मोठ्या प्रमाणात गळती होत असून त्याची दुरुस्ती करावी व त्यासाठी शासनाने तरतूद करावी. माननीय अर्थमंत्री श्री. सुनील तटकरे यांनी त्या वेळेस सांगितले होते की, यासंबंधीचा प्रस्ताव तयार करुन मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यासाठी प्रयत्न करीन अन्यथा सी.एफ. मधून एक कोटी रुपये देईन असे वचन सुध्दा दिले होते. त्यानंतर 24 जूनच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या कामासाठी 50 लाख रुपये राखून ठेवावेत असा निर्णय सुध्दा झाला होता. पण प्रत्यक्षात फक्त 5 लाख रुपये देण्यात आले त्यामुळे हे काम अर्धवट पडलेले आहे. मी या निमित्ताने विनंती करतो की, या मंदिराची दुरुस्ती तातडीने करावी. ही दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाने करावयाची की पुरातन विभागाने करावी यासंदर्भात शासनाने समन्वय साधून हे काम तातडीने करावे. शासनाला खरोखरच छत्रपतींबद्दल आपुलकी असेल, पुळका असेल तर अशी दुरुस्ती तातडीने व पुढाकार घेऊन पुरातत्व खात्याकडे प्रस्ताव पाठवावा व ही दुरुस्ती करावी.

महोदय, ज्याप्रमाणे आपण कृष्ण जन्माष्टमी किंवा रामनवमी साजरी करतो त्याच प्रमाणे या मंदिरात प्रत्यक्ष छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती 12.30 वाजता साजरी केली जाते. अशी संस्कृती असलेल्या राज्यामध्ये आणि जगाच्या पाठीवर एकमेव असलेल्या मंदिराच्या दुरुस्तीबाबत गेल्या पाच वर्षात अनेक वेळा वेगवेगळ्या आयुधांच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करुनही त्यासाठी तरतूद केली जात नाही याचे दु:ख वाटते. येथील लोक म्हणतात की शासनाला शिवाजी महाराजांबद्दल प्रेम आहे काय, कारण जे अस्तित्वात असलेले मंदिर सुसज्ज करु शकत नाही आणि नसणारे लोकांना दाखवून मते मिळविण्याचे काम करते, हे सर्व थांबले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होईल तेव्हा होवो, त्याला पर्यावरण विभागाची परवानगी जेव्हा मिळेल तेव्हा

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

मिळू दे पण पर्यावरणाची कोणतीही अडचण नसलेले सिंधुदुर्ग किल्ल्यातील छत्रपतींचे मंदिर तातडीने दुरुस्त झाले पाहिजे अशीच माझी मागणी आहे. या मंदिराची दुरुस्ती केली तर सिंधुदुर्ग जिल्ह्यासारख्या पर्यटन जिल्ह्यात पर्यटकांचा व इतिहास संशोधकांचा ओघ वाढू शकेल व पर्यायाने परकीय गंगाजळीत वाढ होईल. म्हणून माझी विनंती आहे की, या किल्ल्यात असलेले खरेखुरे मंदिर तातडीने दुरुस्त करुन सुसज्ज करावे. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय्, विरोधी पक्ष नेते सन्माननीय श्री. विनोद तावडे यांनी नियम 97 अन्वये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या संदर्भात अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. शिव चरित्र किंवा शिवाजी महाराजांबद्दल गौरवास्पद विचार बाबासाहेब पुरदंरे किंवा माननीय शिवसेना प्रमुखांच्या मुखातून अजूनही शोभून दिसतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात या सभागृहात राजकारण करु नये असे या ठिकाणी बोलण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, नियम 97 अन्वयेच्या चर्चेमध्ये सन 2008 मध्ये शासनातर्फे अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य-दिव्य स्मारक बांधण्याची करण्यात आलेली घोषणा, त्यानुसार छत्रपती शिवाजी महाराजांचे आश्वारुढ पुतळयाचे 309 फूटाचे स्मारक बांधण्यासाठी 350 कोटी रुपयांची तरतूद करण्याची घोषणा करुन त्याबाबतची निविदा काढण्यात येणे, तथापि, सागरी किनारा नियमावलीचे उल्लंघन होत असल्याने केंद्रीय पर्यापवरण विभागाने स्मारक बांधकामास परवानगी न देणे या विषयाच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेते ,सर्वश्री. रामदास कदम, भाई जगताप, हेमंत टकले यांनी विचार उपस्थित केलेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य-दिव्य स्मारक उभारण्याची घोषणा करण्याची ताकद कोणत्यातरी सरकारमध्ये हवी होती ती घोषणा आघाडी सरकारने केल्याबद्दल मी आघाडी शासनाचे अभिनंदन करतो. निवडणुकांना सामोरे जात असतांना जाहीरनामे, वचननामे, वचकनामे प्रत्येक पक्ष जनतेसमोर ठेवत असतात. त्या प्रमाणे आमच्या पक्षाने आपले ध्येय धोरणात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य दिव्य स्मारक उभारले जाईल अशी घोषणा केली होती.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयासाठी एक छोटीसी जेट्टी बांधून, पळवाट काढून आपल्याला स्मारक उभारता येईल. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, अशा प्रकारची पळवाट काढून, 5 कोटी रुपयांमध्ये जेट्टीवर स्मारक उभारण्याची कल्पना कोणत्याही सदस्यांनी मांडू नये असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी म्हटले आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांसारखे व्यक्तिमत्व या पूर्वी कधी झाले नाही आणि यापुढेही होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर....

छत्रपती शिवाजी महाराज हे या राज्याची आणि देशाची शान असून त्यांच्यासाठी 5 कोटी रुपयात जेट्टी बांधून त्यावर छत्रपतींचे स्मारक होऊच शकत नाही आणि यामध्ये अशा प्रकारच्या पळवाटा काढून मार्गही काढता येणार नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी केंद्रीय पर्यावरण खात्याने ज्या काही अटी घातलेल्या आहेत त्या अटींची पूर्तता शासनाने करणे आवश्यक आहे. अटींची पूर्तता करण्यामध्ये प्रशासन कमी पडले असे आपल्याला म्हणावे लागेल. अशा प्रकारचे वेगवेगळे सागरी प्रकल्प झालेले आहेत. सागरी प्रकल्प पूर्णत्वास नेतांना केंद्रीय पर्यावरण विभागाची मान्यता लागत असते ही मान्यता मिळाली नसेल तर ती मिळवली पाहिजे. ही परवानगी मिळवण्यासाठी माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांनी तसेच शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. तशा प्रकारची परवानगी शासनाने आणावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, उप मुख्यमंत्र्यांनी घोषणा केल्या बरोबर त्याच विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी ताबडतोब दुसरी घोषणा केली. या घोषणेवर चर्चा करतांना मला असे विचारावयाचे आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवाची एक तारीख का बरे नसावी ? छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माची तारीख एक नसल्यामुळे जनतेला आणि कार्यकर्त्यांना किती त्रास होतो याचा आपण कधी विचार केला आहे काय ? कोणत्या पक्षाचे कार्यकर्ते कोणत्या दिवशी शिव जयंती साजरी करतात व सरकार कोणत्या दिवशी शिवजयंती साजरी करते हा विरोधाभास लोकांसमोर गेलेला आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

श्री.किरण पावसकर....

शिवजयंतीची तारीख व तिथी यासंबंधी विचारवंतांनी आपले विचार मांडले आहेत. श्री.बाबासाहेब पुरंदरे हे एक तारीख सांगत आहेत. शिवचरित्र सांगणारे एकच तारीख सांगतात. दोन तारखा सांगत नाहीत. ह्या तारखा आपण आपले वेगळेपण टिकविण्यासाठी ठरवत आहोत काय ?

सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब आल्यानंतर तारखेचा मुद्दा मांडावा असे ठरविले होते. आपण ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहात. आपण तिघेही तिकडेच होतो. आमच्या विषयीही आपण चांगले म्हणाल. आज आपण तिकडे आहात, आम्ही इकडे आहोत. आपणही विकृती, प्रकृती बद्दल विचार मांडलेत. प्रकृती, विकृती, आणि त्यापुढे संस्कृती देखील आहे. त्याच्यापुढे तर एक सुसंस्कृती आहे. श्री.विनोबा भावे यांनी प्रकृतीची व्याख्या करताना असे सांगितले आहे की, आपल्याला भूक लागली असेल तर ती प्रकृती असते. विकृती म्हणजे काय, मी आता जेवलो आणि लगेच जेवण नसताना देखील जेवण पाहिजे असेल तर ती विकृती असते. मी उपाशी आहे आणि माझ्या समोरचा माणूस देखील उपाशी आहे, तो जेवला नाही. मी उपाशी असताना माझे ताट आल्यानंतर त्याला देतो यास संस्कृती म्हणतात. त्याही पेक्षा सुसंस्कृती वेगळी आहे. प्रकृती, विकृती, संस्कृती यावर बोलण्यासारखे भरपूर आहे. आता आम्ही सुसंस्कृतीमध्ये आलो आहोत. त्यामुळे यासंबंधी नक्कीच सुसंस्कृती सांगता येईल.

शिवजयंतीवरून मी आणखी एक बाब सांगणार आहे.....(अडथळा)... ही आघाडीची सुसंस्कृती आहे. पर्यावरण विभागाच्या सर्व परवानगी घेऊन त्या ठिकाणी स्मारक बांधले जाणार आहे, अशी सुसंस्कृती असेल. सरकार हे करून दाखवेल.

सभापती महोदय, मुंबई विमानतळाला नाव देताना केंद्रात भाजप शिवसेनेचे सरकार होते. केंद्राची मान्यता घेण्यासाठी शिवसेनाप्रमुखांनी देखील भरपूर प्रयत्न केले. त्या विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्यात आले. सगळ्यांना गौरव वाटेल असे हे काम आहे. काही ठिकाणी वैयक्तिक नावे विमानतळांना देण्यात आलेली आहेत. मुंबईतील आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील एका विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराज असे नाव देण्यात आले

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

आहे. हे गौरवण्यासारखे आहे. तेथे एका पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. ते देखील दोन दिग्गजांच्या हस्ते झाले. पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी आणि शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते त्या पुतळ्याचे अनावरण झाले. त्यानंतर सातत्याने 8 ते 10 वर्षे त्या विमानतळावर मी शिवजयंती साजरी केली. शिवसेनेच्या कुठल्या कुठल्या नेत्यांनी यावे याची लिस्ट दाखविल्यानंतर शिवसेनेच्या कार्याध्यक्षांनी आपले नाव त्यात कधीच टाकले नाही, ही गोष्ट वेगळी आहे. पण मी तेथे स्वत: 8 ते 10 वर्षे शिवजयंती साजरी केली.

सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब आपण मराठीवर भरपूर वेळ बोलता, श्री शिवाजी महाराजांवर आत्मीयतेने बोलतात म्हणून मी आपल्याला विनंती करणार आहे. विमानतळावर ज्या पुतळ्याचे अनावरण दोन दिग्गजांच्या हस्ते करण्यात आले त्या पुतळ्याची सध्याची स्थिती, सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब आपण बघून यावी. झोपडपट्टीतील मुले आपल्या सकाळच्या क्रिया-कर्मासाठी जातात तेथे एकीकडे तो पुतळा ठेवण्यात आला आहे. जीव्हीके कंपनीला दोन एअर स्टे बांधायचे होते म्हणून तो पुतळा हलविण्याबाबतचा प्रस्ताव आला होता. मी तेथे असताना युनियनच्या माध्यमातून सांगितले होते की, ज्यावेळी आपण हा पुतळा हलवाल त्यावेळी संपूर्ण एअरपोर्ट बंद ठेवण्यात येईल. माझा प्रश्न एवढाच आहे की, आपण एवढे आत्मीयतेने, पोटतिडकीने बोलत आहात. आज अशा ठिकाणी पुतळा गेला आहे की,.....

आज जीव्हीके कंपनीने तोंडात काय कोंबून ठेवले आहे..... शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार घातल्याशिवाय ज्यांच्या भाषणाला सुरूवात होत नाही, असे लोक आज तो पुतळा एका कोपऱ्यात उभा असताना त्यावर काहीच का बोलत नाही ? जीव्हीके सारख्या एका मोठ्या कंपनीने असे काय तोंडात कोंबले आहे, त्यामुळे आपल्याला काहीच बोलता येत नाही ? शिवाजी महाराजांच्या विषयी आपल्या मनात जेवढा आदरभाव आहे, तेवढाच आदरभाव आमच्या देखील मनात आहे. मघाशी आपण म्हणालात तसे मी म्हणणार नाही. आपण म्हणालात की, जय शिवाजी, जय भवानी, टाक वर्गणी. असे मी म्हणणार नाही. अशा प्रकारे पुतळ्याचा अनादर होत असेल तर ते बरोबर नाही.

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

आज आपण होणाऱ्या स्मारकासंबंधी पुष्कळ बोलत आहोत. स्मारक कसे असावे यावर बोलत आहोत. सरकार परवानगी आणण्यास कुठे कमी पडले यावर बोलत आहोत. काम का होत नाही, याबद्दल आमच्या देखील भावना दुखावल्या जातात. आज छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव नुसते देशात नाही, महाराष्ट्रात नाही तर संपूर्ण जगामध्ये सांगितले, घेतले जाते. आज छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई असे नाव घेतले जाते.

यानंतर सौ.रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

छत्रपती आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरामध्ये असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अनादर होत असेल तर आपण त्याबाबत कधी आवाज उठविणार आहोत आणि आता पर्यंत याबाबतीत आवाज का उठविला गेला नाही हा मुद्दा आहे. पूर्वी त्याठिकाणी शिवजयंती साजरी होत होती, परंतु आता ती का होत नाही हा प्रश्न आहे म्हणजेच जे पुतळे उभे केले आहेत त्याकडे लक्ष द्यावयाचे नाही, त्याठिकाणी पहावयाचे नाही आणि जे झाले नाही त्याबाबतीत आत्मीयतेने एवढया गोष्टी बोलल्या गेल्या आहेत.

सभापती महोदय,याठिकाणी जेम्स लेनच्या पुस्तकाबाबत सांगण्यात आले आणि त्याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनीही सांगितले आणि मी देखील या मुद्याबाबत चर्चा करु इच्छितो. जेम्स लेनच्या पुस्तकावर माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी बंदी घातली आणि त्यांनी सविस्तर असे उत्तर दिलेले आहे की, होय, आम्ही जेम्स लेनच्या पुस्तकावर बंदी घातलेली असून ते पुस्तक कोणालाही बाजारामध्ये विकता येणार नाही. पण मघाशी माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे म्हणाले त्याबाबत त्यांना एवढेच विचारता येईल की, त्यावेळी जेवढे जेम्स् लेनचे नाव पुढे आले तेवढेच भंडारकर या प्रकाशकाचे नाव पुढे आले. मग श्री.भंडारकर यांच्यावर संघाने खरोखरच बंदी घातली काय ? त्यांच्यावर कोणती तरी कारवाई व्हावी अशी मागणी करण्यात आली काय ? कारण जेम्स लेनला सर्व माहिती कोणी पुरविली याची बातमी देखील बाहेर आली. आपण जेव्हा सभागृहामध्ये या विषयाबाबत बोलतो, तेव्हा दोन बोटे दुसऱ्यांकडे असली तरी तीन बोटे स्वत:कडे असतात, त्यातील हा नमुना आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य-दिव्य आणि चांगल्या प्रकारचे स्मारक व्हावे आणि ते देखील समुद्र किनाऱ्यावरच व्हावे. तसेच त्यासाठी मरीन लाईन्स् येथील जी जागा बघितलेली आहे, ती योग्य प्रकारची आहे आणि भविष्यामध्ये अशाही पर्यावरणाच्या संबंधातील वेगवेगळया परवानग्या आणून आणखीही विकासाची कामे करावी लागणार आहेत. ती करीत असताना छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक मोठे आणि चांगल्या पध्दतीने व्हावे यामध्ये सत्ताधारी बाजूकडील सन्माननीय सदस्यांच्या आणि विरोधी पक्षाकडील सन्माननीय सदस्यांच्या मनात कुठेही वेगळी भावना असेल असे मला वाटत नाही. पण राजकारण करीत असताना शिवाजी महाराजांच्या नावाने आणि त्यांच्या पुतळ्याच्या मुद्याचा वापर करुन राजकारण कोण करीत आहे आणि घडवित आहे याविषयी महाराष्ट्रातील जनतेला आणि या देशातील जनतेला चांगल्या प्रकारे माहिती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर . . . .

यामध्ये राजकारणाचा विषय न आणता मी एवढेच सांगेन की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या ठरविण्यात आलेल्या जागेबाबत सरकारला किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांना कुठे कमतरता भासली असेल तर प्रशासकीय कामावर वचक ठेवला पाहिजे आणि यासंदर्भात केंद्र शासनाकडून परवानगी आणण्यामध्ये किंवा केंद्र शासनाला त्यांच्या अटी किंवा शर्ती मान्य करण्यामध्ये जर प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून काही चुका झाल्या असतील तर सरकारने याबाबत विचार करावा आणि त्याच जागेवर भव्य दिव्य स्मारक व्हावे एवढीच इच्छा व्यक्त करुन मी माझे शब्द संपवितो. धन्यवाद.

. . . .3 एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, याठिकाणी नियम 97 अन्वये शिवस्मारक उभे करण्याच्या संबंधातील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला आहे. मी चार-पाच मिनिटांमध्ये विषय मांडणार आहे. कारण अनेक सन्माननीय सदस्यांनी निरनिराळे विषय, निरनिराळे राजकीय विषय देखील मांडले.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : मी सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांना सांगू इच्छितो की, त्यांचे भाषण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली आणि सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांना भाषण करावयाचे आहे आणि आपल्याला ही चर्चा 6.00 वाजता संपवावयाची आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ठीक आहे.या महाराष्ट्रातील जनतेने वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचली त्यावेळी लोकांना संताप देखील आला आणि तीव्र दु:ख देखील झाले की, महाराष्ट्रामध्ये पर्यावरण विभागाच्या कारणामुळे किंवा अन्य कारणामुळे शिवस्मारक होऊ शकत नाही.महाराष्ट्रातील जनतेच्या मनामध्ये या सरकारबद्दल तीव्र असा संताप निर्माण झाला आहे. मग स्मारकाबाबत जी कारणे दिली जात आहेत, त्यामध्ये खरे किती आहे, खोटे किती आहे, कोणी काय सांगितले हा राजकारणाचा भाग सोडला तरी छत्रपती शिवाजी महाराज ज्यांनी या देशाला, महाराष्ट्राला वेगळा आदर्श दिला त्यांचे स्मारक या देशामध्ये, या राज्यामध्ये होत नाही. त्यामुळे एक संताप जनतेमध्ये निर्माण झाला म्हणून आज आपण या सदनामध्ये हा विषय उपस्थित केला. एका बाजूला जनता पहात आहे की, येथे निरनिराळया प्रकारची अवैध बांधकामे होत आहेत, निरनिराळया प्रकारच्या इमारती होत आहेत, निरनिराळया प्रकारची हॉटेल्स् अवैधपणे होत आहेत. म्हणून शिवस्मारक देखील अवैधपणे व्हावयास पाहिजे असे नाही. परंतु प्रतापगडाच्या खाली अफझ ालखानाचे थडगे आहे त्याठिकाणी अतिक्रमण झाल्याचे सरकारला चालते आणि शासन ते अतिक्रमण हटवू शकत नाही आणि सरकारसमोर कायदेशीररित्या शिवस्मारक उभारण्यासाठी मात्र अनेक प्रश्न कसे निर्माण होतात हा महाराष्ट्रातील जनतेसमोर प्रश्न निर्माण झालेला आहे. एका बाजूला ज्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना ठार मारण्याचा विडा उचलला.

यानंतर कु.थोरात . . ..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर. . .

त्या प्रतापगडाच्या पायथ्याशी त्याचे थडगे असून ते आणखी वाढत आहे त्या ठिकाणी अतिक्रमण होत आहे असे असताना त्या ठिकाणी शिवप्रेमी गेले तर त्यांच्यावर निरनिराळया प्रकारची बंदी घातली जाते. महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक करण्याच्या बाबतीत पर्यावरणाचे कारण तसेच इतर निरनिराळया प्रकारची कारणे सांगितली जात आहेत. महाराष्ट्र शासनाने, माननीय मुख्यमंत्री यांनी याबाबतीत कुठलेही कारण सांगितले जाणार नाही, महाराष्ट्र शासनाने ज्या ठिकाणी हे स्मारक करण्याचे ठरविले आहे त्याच ठिकाणी हे स्मारक निश्चितपणे करण्यात येईल असे सांगावयास पाहिजे. जर या शासनामध्ये अशा प्रकारे सांगण्याची हिंमत नसेल तर महाराष्ट्रातील अकरा कोटी जनता हे स्मारक करुन दाखवेल.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक करण्यात यावे, त्यासाठी लागणारी परवानगी देण्यात यावी अशा प्रकारची विनंती करण्यासाठी आम्ही या ठिकाणी उभे राहिलो नाहीत. या स्मारकाच्या संदर्भात प्रशासनाने बैठका घेतल्या परंतु या महाराष्ट्रातील सुपुत्रांनी, मंत्र्यांनी पुढाकार का घेतला नाही. आम्ही रोज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाला नमस्कार करतो असे असताना माननीय मुख्यमंत्री यांनी या बाबतीत पुढाकार का घेतला नाही? होय, मी हे काम करीन असे माननीय मुख्यमंत्री यांनी का सांगितले नाही? सन 2005 पासून सन 2011 पर्यंत हा सगळा प्रश्न प्रलंबित राहिलेला आहे, असे असताना या संदर्भात विरोधी पक्ष राजकारण करीत आहे की काय असे सांगण्यात येत आहे. पण या मागे शासनाचे राजकारण आहे. हा केवळ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवस्मारकाचा विषय नाही तर महाराष्ट्रात अशा प्रकारे अनेक विषयांच्या संदर्भात या शासनाकडून अनास्था दाखविली जात आहे. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी सांगितल्याप्रमाणे रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर येथील संभाजी महाराजांच्या स्मारकाचा या शासनाने असाच खेळखंडोबा केलेला आहे. आजही त्या ठिकाणी संभाजी महाराजांचे स्मारक योग्य पध्दतीने उभे राहू शकलेले नाही. सन 2006 सालापासून आम्ही सर्वजण या बाबतीत पाठपुरावा करीत आहोत. पण कधी पैसे नाहीत तर कधी त्या ठिकाणच्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अडचणी निर्माण झालेल्या असतात तर कधी काम करण्यास दिरंगाई होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या, संभाजी महाराजांच्या स्मारकांच्या बाबतीत अशा पध्दतीने अनास्था दाखविण्यात येत असेल तर महाराष्ट्राची जनता या शासनाला कधीच माफ करणार नाही. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर. . .

सभापती महोदय, महाराष्ट्रात अनेक पुतळे उभारण्यात आलेले आहेत. आपण विधानभवनातून बाहेर पडल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. त्या पुतळयाची काय अवस्था आहे. म्हणजे एका बाजूला रोज त्यांचे नाव घ्यावयाचे, त्यांच्या प्रेरणा आणि त्यांच्या स्फूर्तीतून या राज्यामध्ये काम करावयाचे आणि त्यांचे पुतळे उभे केल्या नंतर या पुतळयांची मात्र योग्य पध्दतीने देखभाल केली जात नाही. निरनिराळया तालुक्यांमध्ये क्रांतीकारकांची आणि स्वातंत्र्य सैनिकांची स्मारके उभी करण्यात आलेली आहेत. त्या स्मारकांची काय अवस्था आहे हे शासनाने स्वत: जाऊन बघावे. हा केवळ राजकारणाचा भाग नाही तर खऱ्या अर्थाने हा आमच्या अस्मितेचा प्रश्न आहे. हा आमच्या स्वाभिमानाचा प्रश्न आहे. आज शिवस्मारकाला पर्यावरणाची किंवा इतर कुठल्याही प्रकारची परवानगी मिळत नाही पण हा कार्यक्रम सन 2005 ते सन 2011 पर्यंत लांबला नसता तर हा प्रश्न निर्माण झाला नसता. सी.आर.झेड.चे नियम त्यानंतर कडक झालेले आहेत. सन 2005 मध्ये या बाबतीत पुढाकार घेतला असता आणि खऱ्या अर्थाने या संदर्भात आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या घेतल्या असत्या तर आज या ठिकाणी हा प्रश्न उपस्थित झाला नसता. आज त्या ठिकाणच्या शिवस्मारकाला भेट देण्यासाठी आपण सर्वजण जाऊ शकलो असतो. परंतु शासनाच्या अनास्थेमुळे या राज्यातील पुतळे असतील, या राज्यातील निरनिराळया ठिकाणची क्रांतीकारकांची स्मारके असतील, या राज्यातील संभाजी महाराजांचे स्मारक असेल, या राज्यातील किल्ल्यांच्या संदर्भातील विषय असेल त्यांचे नीट जतन होत नाही. या राज्यातील इतिहासाची जपणूक करण्याची जबाबदारी शासनाची आहे. परंतु या बाबतीत शासनाने पुढाकार घेतल्याचे दिसत नाही. केवळ वल्गना होतात, निरनिराळया प्रकारची आश्वासने दिली जातात, निरनिराळया प्रकारच्या घोषणा केल्या जातात मग त्या निवडणुकीच्या काळीतील असोत किंवा अन्य काळातील असोत. कधीही पैसे कमी पडू देणार नाही, अमुक करु, तमुक करु अशा प्रकारे या सभागृहात सांगण्यात येते. हे सभागृह दिशादर्शन करण्यासाठी आहे पण या ठिकाणी आमची दिशाभूल केली जाते आहे की काय अशा प्रकारची वक्तव्य या शासनाकडून ऐकावयास मिळतात.

सभापती महोदय, या ठिकाणी शिवस्मारक झाले पाहिजे. शासनाला ते करावयाचे नसेल तर महाराष्ट्रातील अकरा कोटी जनता हे स्मारक उभे करील. शासनाने नाही म्हटले तर हा विषय थांबणार नाही. अकरा कोटी जनतेच्या पुढाकाराने हे स्मारक होईल. परदेशात अशा प्रकारची स्थळे

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर. . .

ही पर्यटन स्थळे होतात. प्रबोधन स्थळे होतात, प्रेरणेची स्थळे होतात. स्फूर्तीची ठिकाणे जतन केली जातात. परंतु छत्रपती शिवरायांच्या स्मारकाच्या बाबतीत शासनाकडून अशा प्रकारची अनास्था दाखविली जात असेल तर ते योग्य नाही. सभापती महोदय, मी सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले त्यावेळी अनेक स्वकीयांनी त्या साठी आपले प्राण दिलेले आहेत त्याचप्रमाणे त्यांच्या नात्यागोत्यातील अनेक लोकांनी त्यांच्यासमोर तलवारी उपसल्या आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ...

शिवाजी महाराज गेल्यानंतर सुध्दा मोगलांच्या राज्यात संभाजी असो, संताजी-धनाजी असो, त्यांनी पंधरा वर्षे या राज्यामध्ये औरंगजेबाला एकही किल्ला मिळू दिला नाही अशा प्रकारचा पराक्रमी इतिहास आपल्याकडे आहे. पण ही अनास्था कोठपर्यंत जावी ?

मी आपल्याला एक उदाहरण सांगतो. या ठिकाणी सांस्कृतिक कार्य विभागाचे माननीय मंत्री महोदय बसलेले आहेत. आमच्या कोकण कला अकादमी संस्थेने 'शिवबा' नावाचे नाटक 85 कलाकारांना घेऊन निर्माण केले. त्या नाटकामध्ये तीनही वयोगटातील शिवाजी निर्माण केले. 85 कलाकारांना घेऊन गावोगावी हे नाटक मिशन म्हणून केले जाते. गोवा सरकार या नाटकाचे प्रयोग घेऊ शकते पण महाराष्ट्र शासन प्रयोग घेण्याचे तर राहू द्या महाराष्ट्र शासनातील एकाही मंत्र्यांला हे नाटक बघावेसे वाटत नाही. अशा प्रकारची देखील अनास्था आहे. एका बाजूला हे लोकांपर्यंत पोहोचविण्याची भूमिका घेऊन महाराष्ट्रातील लोक प्रयत्न करीत आहेत पण या ठिकाणी महाराष्ट्र शासनाची पदोपदी अनास्था दिसते. गोवा सरकार या नाटकाचे प्रयोग घेऊ शकते. पैशाचे जाऊ द्या. आम्हाला पैसे नकोत. मिशन म्हणून आम्ही हे नाटक केलेले आहे. परंतु आपण जर अशा प्रकारची अनास्था दाखवित असाल तर आम्हाला गोवा सरकारपुढे मान खाली घालावी लागते. गोवा सरकार जेव्हा आम्हाला विचारते तेव्हा आम्हाला सांगावे लागते की, सरकारने आम्हाला अजून काहीही सांगितलेले नाही. अशा अनेक प्रकारच्या अनास्था या सरकारच्या माध्यमातून आपल्याला बघावयास मिळतात. शेवटी हे शिवस्मारक झाले पाहिजे ही श्रींची इच्छा आहे. सरकारला हे करावेच लागेल. त्यातील जे काही अडथळे आहेत ते सर्व बाजूला करुन केवळ प्रशासनातील लोकांवर न टाकता सरकारने यामध्ये पुढाकार घेऊन हे शिवस्मारक उभे केले पाहिजे. आम्ही महाराष्ट्रातील भूमिपुत्र आहोत, शिवप्रेमी आहोत असे जर म्हणत असाल तर आपण पुढाकार घेऊन हे शिवस्मारक झाले पाहिजे अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रामध्ये भव्यदिव्य स्मारक व्हावे, त्यापासून जनतेने स्फूर्ती घ्यावी, प्रेरणा घ्यावी या उद्देशाने शासनाने 2008 मध्ये हे स्मारक बांधण्याचे जाहीर केले होते. दुर्दैवाने काही अडचणींमुळे ते स्मारक होऊ शकले नाही. माननीय पर्यावरण मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. मी एवढेच सांगेन की, माननीय पर्यावरण मंत्र्यांनी गोव्यामध्ये, केरळमध्ये, कर्नाटकमध्ये जाऊन त्या ठिकाणी झालेली मोठमोठी हॉटेल्स, मोठमोठी बांधकामे पहावीत. महाराष्ट्र हे एकच राज्य असे आहे की ज्या ठिकाणी अधिकारी काटेकोरपणे कायद्याचे पालन करतात असे मी म्हणणार नाही पण नको त्या गोष्टी या ठिकाणी जास्त बघतात. ते नकारात्मक दृष्टीकोनातून बघतात. 2008 सालापासून आजपर्यंत हे स्मारक का झाले नाही याचा सुध्दा विचार आपण करणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना सांगू इच्छितो की, 1995 मध्ये आपणसुध्दा सत्तेमध्ये होतो. परंतु दुर्दैवाने ही बुध्दी आपल्याला झाली नाही. त्यावेळी जाहीर केले होते पण ते करावयास पाहिजे होते.

श्री. दिवाकर रावते : त्यावेळी काय झाले यापेक्षा या शासनाने स्मारक बांधण्याचे जाहीर केले आहे त्याबाबत आपण बोलावे.

श्री. राजन तेली : त्यावेळी आपण आमचे नेते होता. आपण या बाबत राजकारण करावयास नको. एक चांगला निर्णय राज्य सरकारने घेतला होता पण दुर्दैवाने ते झाले नाही. त्याला अधिकारी कारणीभूत आहेत. माझी निश्चित खात्री आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी नवी मुंबईतील विमानतळ मंजूर करुन आणले. जैतापूरचा प्रकल्प आपल्याला मान्य नसेल. वर्षानुवर्षे तो प्रकल्प होत नव्हता पण या राज्याच्या हिताच्या दृष्टीने त्यांनी तो प्रकल्प मंजूर करुन आणला. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री ज्यावेळी उत्तर देतील त्यावेळी ते सांगतील आणि माझी अशी खात्री आहे की, या प्रकल्पाला लवकरात लवकर पर्यावरण खात्याची परवानगी मिळेल. माझी माननीय पर्यावरण मंत्र्यांना सुध्दा विनंती आहे की, आपण याकडे लक्ष दिले पाहिजे. अधिकारी काही सांगतात, आपण त्यांचे ऐकता कामा नये.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

सीआरझेडच्या माध्यमातून चुकीचे निर्णय घेतले जातात. सीआरझेडसाठी कोकण किनारपट्टीची शासनाने हेलिकॉप्टरमधून पाहणी केली होती. त्यानंतर लाईन्स आखल्या गेल्या त्या अन्यायकारक आहेत. काही अधिकाऱ्यांना समुद्र कसा असतो ते माहीत नाही. तेथील परिस्थिती माहिती नसताना येथे बसून निरनिराळे निर्णय घेतले जातात. याचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. सीआरझेड म्हणजे नेमके काय आहे, या कायद्याला बाधा न येता कोणकोणती कामे करता येतात हे कोणीही समजावून घेतलेले नाही. देशात सीआरझेडचा कायदा आहे मग गोव्यात बांधकाम कसे होते, कर्नाटक राज्यात का होऊ शकते ? कर्नाटक राज्यात मुरुडेश्वर येथे एक हॉटेल आहे. ते हॉटेल समुद्रात पिलर्स टाकून बांधलेले आहे. संपूर्ण देशात पर्यावरणाचा नियम लागू असेल तर मग कर्नाटक, केरळ, गोवा, तामीळनाडू या राज्यांना हा नियम लागू नाही काय ? फक्त महाराष्ट्राला हा नियम लागू आहे काय, याचाही विचार करणे आवश्यक आहे. हे स्मारक म्हणजे हॉटेल नाही. या राज्याची अस्मिता आहे, हे स्मारक पाहिल्यानंतर तरुणांना स्फूर्ती मिळावी याच उद्देशाने 309 फूटांचे स्मारक बांधण्याचा, एक चांगला प्रकल्प उभा करण्याचे शासनाने योजले होते. या प्रकल्पासाठी राज्यातील अधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन हे काम सुरु करावयास पाहिजे होते, पण दुर्दैवाने ते झाले नाही.

या निमित्ताने मी सांगेन की, या राज्यात 107 गड, किल्ले आहेत. या ठिकाणी सिंधुदुर्ग किल्ल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्या किल्ल्यात आजही लोक राहत आहेत. महाराजांनी 400 वर्षांपूर्वी तो किल्ला बांधला आहे. काही सन्माननीय सदस्यांना मी जे बोलणार आहे ते कदाचित पटणार नाही. राज्यात सिंधुदुर्ग हा एकमेव पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला आहे. या स्मारकासाठी शासन खर्च करणार आहे त्यावेळी पर्यावरणाचे जरुर पालन करावे. त्यापूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यात महाराजांचे स्मारक आहे तेथे 309 फूटांचे स्मारक प्रथम करावे. त्या ठिकाणी दरवर्षी 9-10 लाख पर्यटक येत असतात. त्यामुळे विजयदुर्ग असेल, सिंधुदुर्ग असेल किंवा राज्यातील सर्व गड किल्ले असतील ते पुरातत्व विभागाच्या ताब्यात आहेत ते राज्य शासनाच्या ताब्यात येण्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे की नाही ? गुजरात सरकारने पुरातत्व विभागाच्या ताब्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.राजन तेली.....

असलेले सर्व किल्ले सरकारच्या ताब्यात घेतले आहेत, राजस्थान सरकारने तेच केले आहे. आपण त्यासाठी का प्रयत्न करीत नाही असा प्रश्न आहे. हे गड किल्ले शासनाच्या ताब्यात घ्यावेत अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो. इटली या देशाने इ.स.पूर्वीचा इतिहास जतन करुन ठेवलेला आहे. आपले दुर्दैव असे आहे की, 350-400 वर्षांपूर्वीचा छत्रपतींचा इतिहास आपण पुसून टाकत आहोत. छत्रपतींनी जे केले ते आपल्याला उभ्या आयुष्यामध्ये कधीही शक्य होणार नाही. त्यावेळचे बांधलेले किल्ले आपण सांभाळू शकत नाही. हे स्मारक होण्यासाठी शासनाने चालना द्यावी. परंतु छत्रपतींनी बांधलेले जे गड किल्ले आहेत, मग सिंधुदुर्ग असेल, विजयदुर्ग असेल अशा किल्ल्यांची चांगल्या प्रकारे डागडुजी करावी व देशाला, जगाला पर्यटनाच्या माध्यमातून चांगली संधी द्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, दिनांक 19 फेब्रुवारी या दिवशी शिवजयंती साजरी करण्याचा निर्णय युती सरकारच्या काळात झाला होता. श्रीमती रेखाताई खेडेकर यांनी त्यावेळी अशासकीय ठराव मांडला होता. आदरणीय प्रमोद नवलकर साहेब यांनी त्या ठरावाला उत्तर दिले होते. या मुद्यामध्ये राजकारण येता कामा नये. त्यावेळी आदरणीय नवलकर साहेब असे म्हणाले होते की, "मी सभागृहाला असे आश्वासन देऊ इच्छितो की, शासनाचे मन मोकळे आहे. या सभागृहाने ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याची मी नोंद घेतली आहे. माझ्या स्वत:च्या भावना व माझे मत मी या ठिकाणी व्यक्त करणार नाही. आपणा सर्वांच्या भावना व्यक्त होत असताना त्या वर्तमानपत्रातून व साहित्यिकांकडून, इतिहासकारांकडून पुन्हा पुन्हा व्यक्त होत असतात. या संदर्भात सर्व धर्माच्या लोकांनी निर्णायक कृती केलेली आहे. म्हणून मी विनंती करतो की, समिती नेमण्याऐवजी श्री.गजानन भास्कर मेहेंदळे यांच्याबरोबर बसून इतिहासकारांनी जे संदर्भ लिहिलेले आहेत ते संदर्भ घेऊन त्यानंतर या वादावर अखेरचा पडदा टाकण्याचा निर्णय जुलैच्या अधिवेशनामध्ये किंवा शक्य असेल तर माननीय मुख्यमंत्र्यांशी बोलून, इतिहासकारांशी बोलून, श्री.मेहेंदळे यांच्याशी चर्चा करुन जनमत व सभागृहाने व्यक्त केलेल्या मताचा कल कशा पध्दतीने घ्यावयाचा हे माझ्यावर सोपविले तर समिती नेमण्याची गरज नाही. जुलैमध्ये किंवा त्यापूर्वी शासन अखेरचा निर्णय घेईल.

यानंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली .....

या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी एक मताने आपल्या भावना व्यक्त केल्या त्यामुळे समितीचा आग्रह न धरता सन्माननीय सदस्या श्रीमती रेखाताई खेडेकर यांनी आपला ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो. कारण ती तारीख आणि त्याची अंमलबजावणी या ठरावाच्या नंतर झालेली आहे.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी इच्छा व्यक्त केली की, एकच शिवजयंती साजरी करायला पाहिजे तिच्या मध्ये राजकारण नव्हते. या करिता मी माननीय मंत्री महोदयांना या चर्चेच्या निमित्ताने एवढेच सांगेन की, आपल्याकडे जे पर्यावरण खाते आहे त्याच्या माध्यमातून हा विषय चांगल्या पद्धतीने हाताळला गेला पाहिजे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या चर्चेचे उत्तर दिल्यानंतर लवकरात लवकर कालबद्ध कार्यक्रमाच्या माध्यमातून एक-दोन वर्षाच्या आत लोकांना शिव छत्रपतींचे स्मारक पहायला मिळेल अशी अपेक्षा मी व्यक्त करतो व आपण मला माझे विचार मांडण्याची परवानगी दिल्याबद्दल आपल्याला मनापासून धन्यवाद देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे(पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 97 अन्वये माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे व इतर वि.प.स., यांनी "अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य-दिव्य स्मारक बांधण्याची करण्यात आलेली घोषणा" या विषयावर उपस्थित केलेल्या विषयावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, या विषयावर या सभागृहामध्ये आता पर्यंत बरीच चर्चा झालेली आहे. या संदर्भात मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना शासनाचे 2-3 मुद्यांकडे लक्ष वेधण्यासाठी विनंती करेन. मला असे वाटते की, वरिष्ठ सभागृहामध्ये जितक्या वरच्या पातळीवर चर्चा व्हायला पाहिजे तेवढे मुद्दे सुदैवाने गेल्या दोन तासामध्ये येथे आलेले आहेत. या सगळ्या मुद्यांची नोंद प्रशासन व शासनाने घेण्याची आवश्यकता आहे. मंत्री पातळीवर असलेली उदासिनता, प्रशासनाच्या पातळीवर असलेली उदासीनता आणि या प्रश्नाचे राजकारण करण्याची मानसिकता या तिन्ही गोष्टी सदनामध्ये प्रस्तुत झालेल्या आहेत. मी या निमित्ताने अशी विनंती करेन की, आता या तिन्ही गोष्टींना फाटा देऊन हा विषय पूर्णत्वाला कसा न्यायचा या करिता युद्ध पातळीवर प्रयत्न व्हायला पाहिजेत.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सन्माननीय मंत्री श्री. देवतळे साहेबांना असे सांगू इच्छितो की, आपल्या मंत्री मंडळाला आपल्या कारर्किर्दीमध्ये एक मानाचा तुरा खोवण्याची एक चांगली संधी या निमित्ताने मिळत आहे. आपण जर जीव ओतून हे काम केले तर आपण ते यशस्वी करु शकाल आणि आपण ते कराल या अपेक्षेने मी या संदर्भात काही सूचना करु इच्छितो.

महोदय, मघाशी काही सन्माननीय सदस्यांनी एक मुद्दा मांडला तो म्हणजे आपण उत्साहाच्या भरामध्ये किंवा नियोजन म्हणून सुद्धा अनेक स्मारके उभी करतो. परंतु, त्या स्मारकांची निगा, देखभाल, डागडुजी या कडे पूर्णपणे दुर्लक्ष करतो. या करिता हे स्मारक उभे करत असताना त्या स्मारकाची पुढे चिरंतन पद्धतीने निगा कशी राखली जाईल, तिचे व्यवस्थापन नीटपणाने कसे हाताळले जाईल याचाही विचार या निमित्ताने प्रशासनाने केला पाहिजे अशी मी आपल्याला पहिली सूचना करु इच्छितो.

महोदय, जगामध्ये जी तीन अलौकिक व्यक्तिमत्वे होऊन गेली त्यामध्ये नेपोलियन बोनापार्ट, महात्मा गांधी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा समावेश होतो. या तिघांच्याही

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे .....

व्यक्तिमत्वावर प्रचंड साहित्य लिहिले गेले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील साहित्य जसे आपल्या देशामध्ये लिहिले गेले तसे परदेशामध्ये सुद्धा लिहिले गेले. परंतु, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळामध्ये बखरीच्या रुपामध्ये लिहिले गेलेले हे सगळे साहित्य आजही महाराष्ट्रामध्ये संकलित स्वरुपात उपलब्ध नाही. या करिता या शिवस्मारकाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर जेवढी ग्रंथसंपदा आहे ती संकलित असणारे एक उत्तम ग्रंथालय सुद्धा प्रस्तावित करण्याची योजना यामध्ये अंतर्भूत असली पाहिजे. या देशातील आणि देशा बाहेरील सर्व अभ्यासकांना छत्रपतींच्या जीवनावर अभ्यास करण्याची जेव्हा जेव्हा इच्छा असेल, संधी मिळेल ते उपयुक्त ठरु शकेल.

महोदय, ग्रंथालय हे संदर्भासाठी असते. परंतु, त्यामध्ये दुसरे असे सूत्र आहे की, आज तुम्ही आम्ही सर्वजण पाहत आहोत, अभ्यासतो आहोत, अनुभवतो आहोत आणि कित्येक वेळेला व्यथित सुद्धा होत आहोत. आपण व्यथित का होतो याचे कारण साधे आहे ते म्हणजे या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाचे इंटरप्रिटेशन असे ज्याला आपण इंग्रजीमध्ये बोलतो त्याचा मराठी शब्द अन्वयार्थ असा आहे, तर त्यांच्या जीवनातील घटनाक्रमाचा अन्वयार्थ लावण्याचे काम आमच्या देशातील सगळे विद्वान आहेत करीत आहेत. परंतु, त्यांच्या जीवनाचा जो मूळ आशय आणि विषय आहे त्याचा अतिरेक करावयाचा आणि आपल्या सोयीचा अन्वयार्थ लावावयाचा...

नंतर श्री. भोगले .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे.....

असा एक प्रचंड खटाटोप या देशामध्ये सुरु आहे. म्हणून मूळ ध्येयातून ज्या राष्ट्रीय भूमिकेतून छत्रपतींनी काम केले त्या भूमिकेलाच फाटा देणे असेल, जातीकरण करणे असेल, त्यांना वेगळ्या प्रकारचे दूषण देण्याचा विचार असेल हे सगळे अन्वयार्थ लावण्याचा वेगवेगळ्या अभ्यासकांचा चालू असलेला खटाटोप तुम्हा आम्हाला व्यथित करणारा आहे. म्हणून मी शासनाला दुसरी एक सूचना करु इच्छितो की, या दृष्टीने एक उत्तम संशोधन शाळा त्या ठिकाणी असली पाहिजे.

सभापती महोदय, नेमेचि येतो पावसाळा तसे छत्रपतींच्या जीवनावरील स्मारक उभे करायचे म्हणजे तुमच्या आमच्या मनामध्ये भव्य अश्वारुढ पुतळा एवढेच चित्र असू शकते. परंतु मला असे वाटते की, छत्रपतींच्या जन्मापूर्वीच्या ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास, त्यांच्या जीवनाचा संपूर्ण घटनाक्रम आणि त्याचा झालेला परिणाम हे सगळे दाखविणारी एक उत्तम शिवसृष्टी या निमित्ताने उभी केली पाहिजे. अन्यथा शिवस्मारक पहावयास येणारा भावी पिढीतील तरुण फक्त अश्वारुढ पुतळा पाहील. मध्यंतरी मी वृत्तपत्रात एक बातमी वाचली होती. स्व.विठ्ठलराव विखे-पाटील यांचा पुतळा ज्या शैक्षणिक संकूल परिसरात उभा आहे तेथे वावरणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला गेला की, हा पुतळा कोणाचा आहे? तेथे शिकणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्याला हा पुतळा विखे-पाटलांचा आहे हे सांगता आले नाही. म्हणजे पुतळ्याचे नाव सुध्दा सांगता आले नाही. व्यक्ती कोण आहे हे सांगता आले नाही. चारित्र्य आणि चरित्र सांगण्याचा विषयच मिटला होता. आम्ही केवळ पुतळे उभे करणार आणि विषयाकडे दुर्लक्ष करणार असू तर आम्ही आपली बौध्दिक दिवाळखोरी सिध्द करु. असे होऊ नये म्हणून मी शासनाला विनंती करतो की, उत्तम प्रकारची शिवसृष्टी निर्माण केली पाहिजे. जी शिवसृष्टी छत्रपतींच्या जीवनावर प्रकाश टाकणारी असली पाहिजे. या ठिकाणी देशाच्या बाहेरुन येणारे अभ्यासक आहेत. छत्रपती आणि महात्मा गांधी या दोन्ही व्यक्तींचा अभ्यास करण्यासाठी पौर्वात्य आणि पाश्चिमात्य देशातून सुध्दा अभ्यासक येत असतात. त्यांची इच्छा असते परंतु त्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळत नाही. त्यांना निरनिराळ्या विद्यापीठांचे दरवाजे ठोठावे लागतात. त्यांनाही प्रेरणा देता येईल अशा प्रकारची उत्तम संशोधन शाळा या दृष्टीकोनातून तयार केली जावी अशा प्रकारची शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, शिवस्मारक पहावयास येणारे स्मारक पाहून झाल्यानंतर बाहेर जाणार आहेत. बाहेर पडत असताना मी संदेश कोणता घ्यावा, छत्रपतींच्या जीवनाबद्दल आम्ही काय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे.....

मिळविले, काय पाहिले, काय अनुभवले याचा सार्थ शुभसंदेश त्या ठिकाणी असावा. ज्याप्रमाणे ज्ञानेश्वरीच्या शेवटी पसायदानाचा उल्लेख आहे तसा छत्रपतींच्या जीवनातील काही सार घेऊन जाणारे, अभ्यासणारे स्मारक उभे झाले तर आम्ही हे पाहिले, हे अनुभवले, माझ्या जीवनामध्ये परिवर्तन करण्याकरिता मी प्रेरणा घेऊन निघालो अशा प्रकारचा संदेश त्यातून मिळेल अशा प्रकारचे काम करता येईल. असा विचार करुन शिवस्मारक उभे केले तर ते भावी पिढीला चांगली प्रेरणा देणारे असेल. म्हणून या संदर्भात देशभरातील समाजातून, विचारवंतांकडून सुध्दा शिवस्मारकाबाबत चांगल्या सूचना संकलित करुन तशा प्रकारचे स्मारक उभे केले जावे अशा प्रकारची शासनाला विनंती करतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : सभा□ह्यापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□ह्याची बैठ□ आता स्थ□□ होऊ□ सोमवार, दिनांक 19 मार्च, 2011 रोजी स□ळी 11.00 वाजता पु□ भरेल.

(सभा□ह्याची बैठ□ सायंकाळी 05 वाजू□ 54 मि□□टां□, सोमवार, दि□□ 19 मार्च, 2011 च्या स□ळी 11.00 वाजेपर्य□त स्थ□□ झाली)

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही